# स्मरणिका २०२१

# महाराष्ट्र फाउंडेशन
## अमेरिका
## पुरस्कार २०२०

Invest in future
of
those with no future...
so
they can
REINVEST

। साहित्य पुरस्कार ।    । समाजकार्य पुरस्कार ।

**महाराष्ट्र फाउंडेशन** (अमेरिका)
यांच्यासाठी
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**, पुणे
व **साधना ट्रस्ट** (पुणे)
यांनी
साहित्य आणि समाजकार्य
पुरस्कारांच्या (२०२०) निमित्ताने
या स्मरणिकेचे प्रकाशन मार्च २०२१ मध्ये केले आहे.
*(फक्त खाजगी वितरणासाठी)*

□

संपादक
**मुकुंद टाकसाळे**
taksalemukund@gmail.com / 9850817210

अंकनिर्मिती
**प्रदीप चंपानेरकर**
द्वारा रोहन प्रकाशन
४३० शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

मुखपृष्ठ
**राजू देशपांडे, शेखर गोडबोले**

अक्षरजुळणी
**मुग्धा दांडेकर,** थ्रीडी ग्राफिक्स, पुणे

मुद्रितशोधन
**प्रभा वझे**

मुद्रणस्थळ
**न्यू पॉइंट**, अप्पा बळवंत चौक, पुणे ४११०३०.

# पुरस्कारांचे मानकरी आणि स्वरूप

| साहित्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| ■ दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्कार<br>**महेश एलकुंचवार** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ वाङ्मय प्रकार पुरस्कार (विज्ञान कथा)<br>**सुबोध जावडेकर** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (ललित)<br>**किरण येले** ('तिसरा डुळा' कथासंग्रह) | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ ग्रंथ पुरस्कार (अपारंपरिक/वैचारिक)<br>**प्रदीप पुरंदरे** ('पाण्याशप्पथ') | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ रा. शं. दातार नाट्य पुरस्कार<br>**श्याम पेठकर** ('तेरवं') | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

| समाजकार्य पुरस्कार | पुरस्काराचे स्वरूप |
|---|---|
| ■ समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार<br>**गजानन खातू** | दोन लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ विशेष कृतज्ञता पुरस्कार<br>**जतीन देसाई** | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार<br>**के. वीरमणी** (अध्यक्ष : द्रविड कळघम, चेन्नई) | एक लाख रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)<br>**सुधीर अनवले** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)<br>**अरुणा सबाने** | पन्नास हजार रुपये व स्मृतिचिन्ह |
| ■ युवा पुरस्कार<br>**चेतन साळवे** | पंचवीस हजार रुपये व स्मृतिचिन्ह |

# अंतरंग


- संपादकीय / ५
- पुरस्कार-प्रवर्तकाचं मनोगत : सुनील देशमुख / ७
- अध्यक्षांचं मनोगत : राजीव भालेराव / ९
- ‘मासूमीय’ : डॉ. मनीषा गुप्ते, डॉ. रमेश अवस्थी / ११
- पुरस्कारप्राप्त मान्यवरांविषयी...
  - महेश एलकुंचवार : ओंकार गोवर्धन / १४
  - गजानन खातू : युवराज मोहिते / २९
  - जतीन देसाई : प्रकाश अकोलकर / ४१
  - सुबोध जावडेकर : अवधूत परळकर / ५२
  - आसरियार डॉ. के. वीरमणी : व्ही. कुमारसेन : अनुवाद : सुश्रुत कुलकर्णी / ६१
  - किरण येले : प्रवीण दशरथ बांदेकर / ६८
  - श्याम पेठकर : दासू वैद्य / ७८
  - प्रदीप पुरंदरे : निशिकांत भालेराव / ८६
  - अरुणा सबाने : प्रमोद मुनघाटे / ९३
  - सुधीर अनवले : जयप्रकाश दगडे / १०१
  - चेतन साळवे : योगिनी खानोलकर / १०८
- पुरस्कार सन्मानितांची व्हीडिओवरील भाषणे...
  - महेश एलकुंचवार / २१
  - गजानन खातू (मुलाखत : मनीषा गुप्ते) / ३५
  - जतीन देसाई / ४७
  - सुबोध जावडेकर / ५८
  - किरण येले / ७३
  - श्याम पेठकर / ८३
  - प्रदीप पुरंदरे / ९१
  - अरुणा सबाने / ९८
  - सुधीर अनवले / १०५
  - चेतन साळवे / ११२
- निवड समिती / ११५
- महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था / ११६
- पुरस्कार निवडीचे निकष / १२४
- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’विषयी / १२६

# संपादकीय

महाराष्ट्र फाउंडेशनचे साहित्य आणि सामाजिक क्षेत्रांतले पुरस्कार हा एक वर्षभर चालणारा उपक्रम आहे. या योजनेसाठी पडद्यामागे अनेक लोक राबत असतात. भारतातील निवडसमित्यांमधील सदस्य – मग ती निवडसमिती साहित्यिक पुरस्कार देणारी असो वा सामाजिक – त्यांतील काही नावं पुढं आणतात. त्यावर भरपूर चर्चा होते. क्वचित वादावादीही. पण या वादाचं स्वरूप वृत्तवाहिन्यांवरील कंठाळी आणि घसाफोड वादांसारखं नसतं. ते अर्णवी नसतं, तर आर्जवी असतं. ‘वादे वादे जायते तत्त्वबोध:’ अशा स्वरूपाचा आनंददायक असा हा वाद असतो. आपण निवडलेली नावं जास्तीत जास्त निर्विवाद असावीत यासाठी तो वाद असतो.

खरं तर ही सारी प्रक्रियाच आनंददायक असते. त्यात साऱ्या महाराष्ट्राचा– महाराष्ट्रातील कानाकोपऱ्याचा विचार केलेला असतो. आजवर ज्यांना पुरस्कार मिळालेले आहेत त्यांच्या नावांची यादी आपण जर सहज नजरेखालून घातली (ती या स्मरणिकेत दिलेली आहे) तर आपल्या लक्षात येईल की, महाराष्ट्रातील सर्व भागातील – अगदी खेड्यापाड्यांतील, तालुक्याच्या गावांतील साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांपासून पुण्या-मुंबईतील-महानगरांतील साहित्यिक-कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांचा विचार महाराष्ट्र फाउंडेशनने जाणीवपूर्वक केलेला आहे. ‘पुण्या-मुंबईकडील’ हा शब्दप्रयोग ज्या अर्थाने वापरला जातो, तो अर्थ अर्थातच आम्हाला अभिप्रेत नाही. जयंत पवार यांच्या कथांमध्ये ज्या पद्धतीची महानगरी संवेदना आहे, तिच्याशी नातं सांगणारी साहित्यकृती, आम्हांला जवळची वाटते. या वर्षी निवडलेला किरण येले यांचा कथासंग्रह आम्हाला काय म्हणायचं आहे ते अधिक स्पष्ट करणारा आहे.

या यादीत कोणत्याही अस्मितेचे अतिरेकी झेंडे फडकवणारे, अभिनिवेश असणारे विचारवंत वा साहित्यिक वा सामाजिक कार्यकर्ते आपल्याला आढळणार नाहीत. पुरोगामी तरीही व्यापक उदारमतवादी, मानवतावादी अशी चिरंतन मूल्यं डोळ्यांसमोर ठेवून आमची वाटचाल चालू आहे. या वर्षी साहित्यातील जीवनगौरवसाठी महेश एलकुंचवार यांची केलेली निवड आणि त्यांनी दिलेलं भाषण त्या दृष्टीने पाहण्याजोगं आहे. समाजकार्य जीवनगौरवासाठी निवड केलेले गजानन खातू यांचं भाषणही ‘पारंपरिक पुरोगामी’ विचारांना धक्का देणारं आहे. असे धक्के समाज निरोगी राहण्यासाठी, समाजात विचारमंथन व्हावं यासाठी आवश्यकच असतात.

करोना महामारीने झालेल्या उलथापालथीत आमच्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या संकेतस्थळाचं (वेबसाइटचं) काम नको इतकं रेंगाळलं. परंतु आता पुन्हा सारे व्यवहार सुरळीत होऊ पाहताहेत. तेव्हा हे काम आता मार्गी लागेल. याच कामाचा एक भाग म्हणजे र.धों.कर्वे यांचं 'समाजस्वास्थ्य'चे सर्व अंक यथामूल स्वरूपात आम्ही आमच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणार आहोत. र.धों.च्या सहकारी शकुंतलाबाई परांजपे यांनी हे सारे अंक पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाला दिलेले होते. हे अंक वेबसाइटवर महाराष्ट्र फाउंडेशनच्या संकेतस्थळावर उपलब्ध व्हावेत, यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू प्रा. नितीन करमळकर यांची मोलाची मदत झाली. जयकर ग्रंथालयाच्या प्रभारी संचालक डॉ. अपर्णा राजेन्द्र यांनी प्रत्यक्ष कामात खूपच सहकार्य केलं. 'समाजस्वास्थ्य'चे काही अंक डॉ. समीर कुलकर्णी यांनीही उपलब्ध करून दिले.. संकेतस्थळाचं काम आम्ही एमकेसीएल (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) या संस्थेच्या सहयोगाने करत आहोत.
एमकेसीएल संस्थेच्या स्थापनेपासून (म्हणजे २००१पासून) २०२०पर्यंत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक राहिलेले आणि आता मुख्य सल्लागार असणारे डॉ. विवेक सावंत आणि एमकेसीएल नॉलेज फाउंडेशनचे मुख्य संचालक अधिकारी उदय पंचपोर यांच्या उत्साही पुढाकाराने हे संकेतस्थळ आकाराला येतं आहे, याची आम्हाला कृतज्ञ जाणीव आहे. सर्वांचेच मन:पूर्वक आभार.

स्मरणिकेची देखणी निर्मिती रोहन प्रकाशनाचे प्रदीप चंपानेरकर व त्यांचे सहकारी यांनी केली आहे. या निर्मितीतला दर्जेदार मुखपृष्ठाचा वाटा राजू देशपांडे यांचा आहे.
मुलाखतीचे व भाषणांचे व्हीडिओ करण्यासाठी विनायक पाचलग आणि त्यांचे सहकारी यांनी मोलाची मदत केलेली आहे. नागपूरच्या 'राजकारणे मीडिया वेव्हज् प्रा. लि.'चे राजकारणे आणि त्यांचे सहकारी यांनी महेश एलकुंचवार आणि नागपूरच्या दोन पुरस्कारसन्मानित व्यक्तींच्या भाषणांचं व्हीडिओ चित्रीकरण करून दिलेलं आहे.
स्मरणिकेच्या मागील पानावर वापरलेल्या महेश एलकुंचवार यांच्या छायाचित्राचं श्रेय विवेक रानडे, नागपूर यांचं आहे आणि सुबोध जावडेकर यांच्या छायाचित्राचं श्रेय कुमार गोखले यांचं आहे. या स्मरणिकेत पुरस्कारसन्मानित व्यक्तींबद्दल ज्या ज्या लेखकांनी लिहिलेलं आहे त्यांचे, त्याचप्रमाणे त्यांच्या भाषणांना लेखनरूपात उतरवणारे, वीरमणींवरील इंग्रजी लेखाचा अनुवाद करून देणारे या साऱ्यांचा फारच मोठा हातभार या स्मरणिकेला लागला आहे. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.

स्मरणिकेबाबत आणि संकेतस्थळाबाबत आपल्या सूचनांचं सदैव स्वागतच आहे.

– संपादक

# पुरस्कार-प्रवर्तकाचं मनोगत



नमस्कार,

सर्वप्रथम सर्व पुरस्कारविजेत्यांचं मन:पूर्वक अभिनंदन. हे पुरस्कार, आम्हाला त्यांच्याविषयी वाटणारा आदर आणि त्यांच्याविषयी वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिले जात आहेत. कारण जे प्रतिभावंत आपली सारी प्रतिभा पणाला लावून आणि जे सामाजिक कार्यकर्ते आपलं सारं आयुष्य झोकून समाजसुधारणेची कास धरतात, ते काही असे पुरस्कार मिळवण्यासाठी काम करत नसतात. त्यामुळे अशा लोकांची रोलमॉडेल्स समाजासमोर ठेवणं हा, आणि आमची कृतज्ञता व्यक्त करणं हा, या पुरस्कारांच्या मागचा हेतू आहे.

आता मी फक्त एकाच मुद्द्यावर बोलणार आहे, आणि तो म्हणजे या पुरस्कार योजनेचे निकष. हे निकष जागतिक, नैतिक अशा मूल्यांशी आणि महाराष्ट्र फाउंडेशनच्या मिशनशी कसे पूरक आहेत हे मला तुम्हाला थोडं स्पष्ट करून सांगायचं आहे. आता आपण प्रथम भारतीय संस्कृतीचे काही निकष बघितले, किंवा काही ध्येयं बघितली तर 'वसुधैवकुटुंबकम्', 'हे विश्वची माझे घर' हेच त्यामागचं मूळ तत्त्व आहे. म्हणजे ग्लोबलिझम, बंधुभाव, वैश्विक विचार, शांतता आणि सौहार्द यांत भारतीय संस्कृतीचं सार साठवलेलं आहे. आता तुम्ही महाराष्ट्र फाउंडेशनकडे पाहिलंत तर आमचं ब्रीदवाक्य काय आहे? तर 'सोशल अँड इकानॉमिक जस्टीस फॉर ऑल'. लक्षात घ्या, फॉर ऑल. सर्वांसाठी सामाजिक आणि आर्थिक न्याय. म्हणजे त्यात जाती, धर्म, देश या सर्व प्रकारच्या भेदभावांच्या पलीकडे जाऊन सर्वांचं भलं होणं, सर्वांना न्याय मिळणं हे महाराष्ट्र फाउंडेशनचं ब्रीदवाक्य आणि तत्त्व आहे. म्हणजे आमची सगळी जी काही कामं आहेत ती या निकषांवर चालतात.

आणि आता आपण या महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार योजनेविषयी बघितलं – सामाजिक आणि साहित्यिक – तर पुन्हा त्यांत त्याचे जे निकष आहेत ते लिहून ठेवलेले आहेत. प्रत्येक वेळेला त्या स्मरणिकेत आम्ही ते पुन्हा पुन्हा छापतो. याचं कारण म्हणजे ते निकष स्वातंत्र्य, समता, न्याय आणि उपेक्षितांच्या, अन्यायग्रस्तांच्या वेदना, त्यांचे हाल यांना वाचा फोडणं अशाच स्वरूपाचे आहेत. त्यांना समाज विषमतेनं वागवतो, तीवर प्रकाश पाडणं, त्यातून काही चांगलं निर्माण होईल अशी अपेक्षा करणं, अशाच प्रकारचे आमचे निकष आहेत. म्हणजे जे साहित्य आम्ही निवडतो ते 'स्पेसिफिक फोकस' म्हणतात तसं आहे. ज्यामुळे समाजसुधारणेला मदत होते, ज्यामुळे समाजाच्या काही वैशिष्ट्यांवर आणि अन्यायांवर प्रकाशझोत जातो. अशा प्रकारचं साहित्य,

मग त्याचं माध्यम, मिडियम ऑफ एक्सप्रेशन काहीही असू शकेल. कुणी नाटकातून, कुणी कवितेतून, कुणी निबंधातून, कुणी अग्रलेखातून – परंतु विचार हा समाजसुधारणेचा असेल. तेही, वेल्फेयर असं जे काम असतं, रोटी, कपडा, मकान देणं हे अतिशय चांगलं आणि आवश्यक आहे; परंतु त्यापलीकडे जाऊन सामाजिक कार्यकर्ते जेव्हा काम करतात, समाजसुधारणेचा विचार करतात, ते काम अधिक चिरंतन स्वरूपाचं – लास्टिंग किंवा परमनंट – असतं. अन्न दिलं तर एक दिवसाची गरज भागते, पण दुसऱ्याच दिवशी तो मनुष्य त्याच लायनीत उभा असतो. समाजसुधारणा केली, शिक्षण दिलं, उपेक्षितांना न्याय दिला, उपेक्षितांना हक्क दिले तर तो समाज कायमचा सुधारतो, सुखी होतो, त्या समाजात शांतता येते.

म्हणजे महाराष्ट्र फाउंडेशनचं हे समाजकार्य आणि साहित्याविषयीचे निकष आहेत, ते न्याय आणि सत्याला धरून तर आहेतच, परंतु ते महाराष्ट्र फाउंडेशनच्या ब्रीदवाक्याशी अतिशय मिळतेजुळते आहेत. आणि अगदी आनंदाची गोष्ट म्हणजे भारतीय संस्कृतीची जी मूळ तत्त्वं आहेत – ग्लोबलिझम आणि विश्वबंधुत्व यांच्याशी अतिशय मिळतेजुळते आहेत. त्यामुळे हे एकसंध असं वाटतं. भारतीय संस्कृती, महाराष्ट्र फाउंडेशनचं ब्रीदवाक्य आणि ज्याला आयडियल्स म्हणतो ते आणि या पुरस्कार योजनेचे निकष हे सारं एकमेकांशी पूरक आणि मिळतंजुळतं आहे. आणि या तत्त्वांमुळेच खरं तर समाज सुधारणार आहे. आणि अशा प्रकारच्या कार्याची आजमितीला नितांत गरज आहे. कारण साऱ्या जगात आपल्याला वाटलं होतं की, विश्वबंधुत्व येईल, लिबरल डेमोक्रसी वर येईल, तसं झालं नाही. साऱ्या जगात सध्या उलट होतं आहे. ज्याला ट्रायबलिझम म्हणतो तो टोळीवाद – जो जातीवरून असेल, धर्मावरून असेल, देशाच्या आयडेंटिटीवरून असेल – तो अत्यंत बोकाळलेला आहे. त्यामुळे एका बाजूने जागतिक टेक्नॉलॉजीचा फायदा घेणारा आणि दुसऱ्या बाजूनं कूपमंडुक वृत्तीचा एक बंदिस्त समाज, इनवर्ड लुकिंग म्हणतात, असा समाज सध्या निर्माण होतो आहे. आणि जगभर त्याचे डेमी डिक्टेटर्स फोफावलेले आहेत. अशा काळात विश्वबंधुत्वाचा आणि वैश्विक मूल्यांचा पुरस्कार करणं ही नितांत गरज आहे. आणि ते हे सर्व आपले पुरस्कारविजेते आपलं आयुष्य झोकून, आपली प्रतिभा पणाला लावून करत असतात, यामुळेच समाजाला आशेचे किरण मिळतात आणि समाज सुधारतो. नमस्कार.

– सुनील देशमुख
(पुरस्कार-प्रवर्तक)
sunild@aol.com/+1-203-952-8488

# अध्यक्षांचं मनोगत



‘सर्वांसाठी सामाजिक आणि आर्थिक न्याय’हा आमचा ध्यास आहे. या ध्यासाचा पाठपुरावा महाराष्ट्र फाउंडेशन दोन पद्धतीने करतं. एक म्हणजे सेवाभावी संस्थांचे योग्य प्रकल्प निवडून त्यांना आर्थिक मदत करतं. दुसरं म्हणजे समाज कार्यकर्त्यांना आणि पुरोगामी लेखकांना पुरस्कार देतं. हे पुरस्कार देताना जुन्या जाणत्या साहित्यिकांचा सन्मान करणं आणि नव्या लेखकांना प्रोत्साहित करणं हा एक हेतू असतो त्याचबरोबर आपलं आयुष्य झोकून जे समाजकार्य करतात, त्यांचा सन्मान करणं, त्यांना प्रोत्साहन देणं हाही हेतू असतो.

सर्व पुरस्कारसन्मानित व्यक्तींचं हार्दिक अभिनंदन. त्यांच्या लेखनाला आणि समाजकार्याला अभिवादन. या पुरस्कारांमुळे त्यांच्या कार्याला आणि निर्मितिक्षमतेला अधिक ऊर्जा मिळेल असा विश्वास मी व्यक्त करतो.

२०२१साठी महाराष्ट्र फाउंडेशनने पाच सामजिक प्रकल्पांना मदत करण्याचं जाहीर केलं आहे.

हे प्रकल्प आहेत – ‘महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ’ म्हणजे ‘मासूम’चा सर्विकल कॅन्सर चाचणी कँप, प्रगती अभियान, ‘हॅलो मेडिकल फाउंडेशन’चा ‘मानसमित्र प्रकल्प’, ‘राजस्थान बाल शिक्षण संस्थे’चं ‘हुनर घर’ आणि ‘टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स’चा ‘प्रयास प्रकल्प’. ह्या प्रकल्पांमुळे आदिवासी मुला-मुलींना शिक्षण मिळणार आहे, गावातल्या बायकांची सर्विकल कॅन्सरची चाचणी करणं सुकर होणार आहे, हवालदिल शेतकऱ्यांचं मनोबल वाढणार आहे, गुन्हेगारांच्या कुटुंबाचं पुनर्वसन करण्यास हातभार लागणार आहे आणि ग्रामीण भागात नोकऱ्या उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनने आत्तापर्यंत ‘कोविड रिलिफ’साठी १००,००० डॉलर्सचा निधी उभारला आहे त्यापैकी अर्ध्याहून अधिक निधी विविध सेवाभावी संस्थांना वितरीत केला आहे आणि उर्वरित निधी वितरीत होण्याच्या मार्गावर आहे. ह्या महामारीची वैश्विक व्यापकता लक्षात घेऊन हा निधी भारतातच नाही, तर अमेरिकेत आणि मेक्सिकोतही उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. कोविडचे परिणाम दीर्घकाळ राहणार आहेत म्हणून महाराष्ट्र फाउंडेशन ‘कोविड रिलिफ’साठीचं निधी-संकलन पुढेही चालूच ठेवणार आहे.

२०२०सालात कोविड महामारीप्रमाणेच वर्षाच्या सुरुवातीला झालेले ब्रेक्सीट, अमेरिकेतील उफाळलेला वंशवाद, राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीत समोर आलेलं जनमानसाचं ध्रुवीकरण, नंतर सत्तांतराला केलेला हिंसक विरोध आणि आर्थिक फटक्यांमुळे बदलणारा राष्ट्रांचा प्रभाव अशा जागतिक पातळीवरच्या राजकीय घटनांचे पडसाद पुढची काही वर्षं आपल्याला जाणवत राहणार आहेत.

ही महामारी आपण निभावली ती शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या बळावर. डॉक्टरांनी आणि नर्सेसनी कठीण काळात आपल्याला साथ दिली. फार्मास्युटिकल्सच्या शास्त्रज्ञांनी अत्यंत कमी वेळात लस शोधून ती उपलब्ध करून दिली. तंत्रज्ञानामुळे लोकांचं कार्यालयीन कामकाज सुरू राहिलं आणि महत्त्वाचं म्हणजे शक्य तिथे शिक्षण सुरू राहिलं.

पहिल्या जागतिकीकरणाच्या लाटेत आपण अर्थकारणाने एकमेकांशी बांधलो गेलो. कोविडच्या महामारीमुळे जगातल्या प्रत्येकाचं स्वास्थ्यदेखील आता एकमेकांवर अवलंबून आहे हे सिद्ध झालं आहे. शेवटी आपण एकमेकांवर किती अवलंबून आहोत, आपण एकमेकांसाठी किती जबाबदार आहोत याचं भान मनाशी ठेवून एक नवी सुरुवात करण्याची संधी या महामारीने आपल्याला दिलेली आहे, असं मी मानतो. महाराष्ट्र फाउंडेशनने सततच अशा सकारात्मक वृत्तीचा पुरस्कार केलेला आहे.

पुन्हा एकदा सन्मानित सर्व व्यक्तींचं मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. धन्यवाद.

– राजीव भालेराव

अध्यक्ष, महाराष्ट्र फाउंडेशन, (अमेरिका)

president@maharashtrafoundation.org/rajivpost@gmail.com/7324047408

# ‘मासूमीय’





महाराष्ट्र फाउंडेशन आणि मासूमच्या सर्व हितचिंतकांना संयोजकांकडून जिंदाबाद!

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांनी स्थापन केलेल्या ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ या संस्थेच्या वतीने १९९४पासून मराठी साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय व अनुकरणीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना पुरस्कार देऊन गौरवलं जातं. १९९६पासून ‘समाजकार्या’च्या क्षेत्रातील तशाच उल्लेखनीय व अनुकरणीय व्यक्तींना पुरस्कार दिले जातात. २०१९ सालापर्यंत या पुरस्कारांचं संयोजन मुंबई येथील ‘केशव गोरे स्मारक ट्रस्ट’च्या वतीने करण्यात येत होतं. पहिली १५ वर्षं त्यांना ‘लोकवाङ्मय गृह’ आणि अन्य काही संस्थांची साथ होती. नंतरची १० वर्षं पुणे येथील ‘साधना ट्रस्ट’च्या सहकार्याने हे संयोजन करण्यात आलं होतं.

गेल्या वर्षीपासून भारतातील संयोजनाची जबाबदारी ‘मासूम’ (महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ – MASUM) या संस्थेकडे आलेली आहे. साहित्य पुरस्कारांचं हे सत्ताविसावं आणि सामाजिक पुरस्कारांचं हे रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. पंचवीस वर्षांहून अधिक समृद्ध परंपरा असलेली ही योजना आमच्याकडे कार्यान्वित करण्यासाठी आली, याचा आम्हाला मनापासून आनंद होतो आहे.

दर वर्षी पुरस्कार सोहळा हा ‘महाराष्ट्र फाउंडेशन’च्या प्रतिष्ठेला साजेसा केला जातो. या वर्षी पहिल्यांदा यात खंड पडला आहे कोव्हिड-१९ मुळे. गेल्या वर्षभरात करोनाच्या साथीने जो जगभर धुमाकूळ घातला त्याने काही प्रमाणात आमच्याही कामात व्यत्यय आला, नाही असं नाही; परंतु या सर्व अडचणींवर मात करून आम्ही दोन्ही क्षेत्रांतले पुरस्कार घोषित केले. मात्र या वर्षी समारंभ करणं शक्य नव्हतं हे स्पष्ट झालं. आमचे अमेरिकेतील प्रवर्तक, ‘महाराष्ट्र फाउंडेशन’चे अध्यक्ष, निवड समितीतले सदस्य आणि अन्य सभासद यांना इथे भारतात येणं व्यवहारत: अशक्य होतं, तसंच पुरस्कार-सन्मानित व्यक्ती आणि त्यांचे चाहते यांनाही या साथीच्या काळात पुण्यात येणं धोक्याचं होतं. पुरस्कार समारंभाला महाराष्ट्रातून जी प्रचंड सहभागिता आणि गर्दी असते, त्यामुळे करोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होण्याचा धोका होता, तो नजरेआड करणं शक्य नव्हतं. तेव्हा आम्ही पुरस्कार सोहळा या वर्षी न घेता पुढच्या वर्षी घेण्याचं ठरवलं आहे. त्याची रूपरेषा आम्ही यथावकाश जाहीर करूच.

इथे 'मासूम' विषयी थोडं सांगायला हवं. मासूम (MASUM) ही संस्था १९८७ पासून पश्चिम महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगर जिल्ह्यांमधील दुष्काळी भागात कार्यरत आहे. स्त्रीवादी दृष्टिकोन, संवैधानिक हक्क आणि मानवतावाद ही मूल्यं जोपासण्यासाठी वंचित घटकांमधील स्थानिक नेतृत्व तयार करणं, तसंच राज्य व राष्ट्रीय पातळीवर सामाजिक संस्थांचं प्रशिक्षण घेणं असे अनेक उपक्रम 'मासूम'तर्फे करण्यात येतात. केशव गोरे स्मारक ट्रस्ट आणि साधना ट्रस्ट यांसारख्या पुरोगामी संस्थांचा वसा पुढे नेण्याची जबाबदारी 'महाराष्ट्र फाउंडेशन' ने 'मासूम'वर सोपवली आहे याचं भान आम्हाला नक्कीच आहे. या पुरस्कारांना गेल्या पाव शतकात प्राप्त झालेली विश्वासार्हता जपण्याचा आणि ती काही अंशी वाढवण्याचा प्रयत्न आम्ही आमच्या 'मासूम'च्या सहकाऱ्यांसह करणार आहोत. ही जबाबदारी आमच्याकडे सोपवल्याबद्दल महाराष्ट्र फाउंडेशनचे सध्याचे अध्यक्ष राजीव भालेराव आणि या पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांना मन:पूर्वक धन्यवाद.

आतापर्यंत एकूण ३२८ पुरस्कार प्रदान केले गेले आहेत. (या स्मरणिकेत ही यादी आपल्याला पाहता येईल.) सबंध महाराष्ट्रातले कानाकोपऱ्यातले कार्यकर्ते आणि साहित्यिक या यादीत आहेत. दरवर्षी साहित्य आणि समाजकार्य या दोन्ही क्षेत्रांत मिळून आठ ते अकरा पुरस्कार प्रदान केले जातात. साहित्यामध्ये जीवनगौरव व ग्रंथ पुरस्कार (ललित, वैचारिक व अपारंपरिक) सुरुवातीपासून कायम राहिले आहेत, शिवाय वाङ्मय-प्रकार, प्रकाशक, नियतकालिकं, अनुवाद, बालसाहित्य यांसाठीही वेळोवेळी पुरस्कार दिले गेलेले आहेत. त्याचप्रमाणे समाजकार्याच्या क्षेत्रात जीवनगौरव (व्यक्तीला वा संस्थेला) आणि कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन, संघर्ष, रचनात्मक कार्य, सामाजिक प्रश्न, असंघटित कष्टकरी या प्रकारांत) सुरुवातीपासून प्रदान केले गेले आहेत. खेरीज विशेष कार्य पुरस्कार, कृतज्ञता पुरस्कार, युवा पुरस्कार असेही पुरस्कार वेळोवेळी देण्यात आलेले आहेत. शिवाय मागील सात वर्षांपासून 'डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृती पुरस्कार' प्रदान केला जातो, त्यासाठी गेल्या वर्षीपासून महाराष्ट्राबाहेरील व्यक्ती किंवा संस्था यांचाही विचार केला जातो.

२०२० या वर्षासाठी एकूण अकरा पुरस्कार प्रदान केले जात आहेत. साहित्यामधील 'दिलीप वि. चित्रे जीवनगौरव पुरस्कार' या वर्षी महेश एलकुंचवार यांना देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे दोन ग्रंथ-पुरस्कार (ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक ग्रंथासाठी) आणि 'रा.शं. दातार नाट्य पुरस्कार' देण्यात येत आहे. आसाराम लोमटे हे 'साहित्य पुरस्कार निवड समिती'चे अध्यक्ष होते. ओंकार गोवर्धन हे 'रा.शं. दातार पुरस्कार समिती'चे अध्यक्ष होते. समाजकार्य आणि साहित्य पुरस्कार निवड समित्यांमधील मान्यवर सदस्यांची नावं या स्मरणिकेमध्ये नमूद केली आहेत. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. पुरस्कारनिवडीच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये भारतातील आणि अमेरिकेतील समित्यांसमवेत सुनील देशमुख यांच्याबरोबरीने सक्रिय राहिल्याबद्दल शोभाताई चित्रे यांचे अगदी मनापासून आभार.

२०२० सालचा 'समाजकार्य'मधला 'जीवनगौरव पुरस्कार' गजानन खातू यांना देण्यात येत आहे. महेश एलकुंचवार काय किंवा गजानन खातू काय, अशा व्यक्तींना पुरस्कार देताना अप्रत्यक्षरीत्या

‘महाराष्ट्र फाउंडेशन’चाच गौरव होत असतो. डॉ दाभोलकर स्मृती पुरस्कार ‘द्रविड कळघम’चे डॉ. वीरमणी व समाजकार्यांचा विशेष कृतज्ञता पुरस्कार जतिन देसाई यांना देण्यात आला आहे. यांखेरीज दोन कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन क्षेत्रातील व संघर्ष क्षेत्रातील) आणि एक युवा पुरस्कार या वर्षी देण्यात येत आहेत.

२०२० सालच्या सर्व पुरस्कारसन्मानित व्यक्तींचं सामाजिक कार्य आणि प्रतिभावंत लिखाण आम्हाला नक्कीच समृद्ध करणारं आहे. दर वर्षी पुरस्कारांसाठी योग्य व्यक्ती निवडणं हे आनंददायक आणि आव्हानात्मक काम असतं. ही निवडप्रक्रिया तशी वर्षभर चालू राहणारी असते. त्यासाठी भारतात व अमेरिकेत वेगवेगळ्या निवडसमित्या असतात. शिवाय महाराष्ट्रातील जाणकारांकडून शिफारशी मागवल्या जातात. या पुरस्कारांसाठी कसलेही अर्ज मागवले जात नाहीत, मात्र कोणी स्वत:हून (पण अर्थातच स्वत:ची नव्हे) शिफारशी केल्या तर त्यांचा निवडसमिती विचार करू शकते.

या पुरस्कारांची निवडप्रक्रिया गेल्या वर्षीपासून ‘मासूम’कडे आली असली तरीही अनेक व्यक्तींचा हातभार मोलाचा असतो. ही जबाबदारी पार पाडत असताना मुकुंद टाकसाळे यांचं असंख्य पातळ्यांवर मिळालेलं सहकार्य आणि सततचं उत्साही योगदान शब्दांत मापणं निव्वळ अशक्य! या स्मरणिकेचं संपादनसुद्धा त्यांनीच केलेलं आहे. ‘साधना’ साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ आणि त्यांचे सहकारी, ‘मासूम’चे रवींद्र ठिपसे आणि अन्य सहकारी, तसेच राजू बहाळकर अशा अनेक साथीदारांचं मोठं सहकार्य लाभलेलं आहे. स्मरणिकेची देखणी निर्मिती रोहन प्रकाशनाचे प्रदीप चंपानेरकर व त्यांचे सहकारी यांनी केली आहे. या निर्मितीतला दर्जेदार मुखपृष्ठाचा वाटा राजू देशपांडे यांचा आहे. त्याचप्रमाणे मुलाखतींचे व्हीडिओ करण्यासाठी विनायक पाचलग आणि त्यांचे सहकारी यांनी मोलाची मदत केलेली आहे. सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद.

आपणा सर्वांची आम्हाला साथ आहे, त्याच बळावर आम्ही या जबाबदारीला सामोरं जात आहोत.

– डॉ. मनीषा गुप्ते
महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM – मासूम)
manishagupte@gmail.com/9890870120
– डॉ. रमेश अवस्थी
संस्थापक आणि सहसमन्वयक, ‘मासूम’
rameshawasthi@gmail.com/9960807276

---

महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (MASUM - मासूम)
४२ - बी१, कुबेरा विहार, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११ ०२८
दूरध्वनी : ०२०-२६९९५६२५/२६९९५६३३
Email : masumindia@gmail.com

# आत्मस्वराचा गौरव

महेश एलकुंचवार यांना जीवनगौरव पुरस्कार मिळणं ही फार आनंद देणारी गोष्ट आहे. आपल्या आवडत्या नाटककाराला सन्मानित केलं जाणं; भारतातल्या मोठ्या, महत्त्वाच्या नाटककाराला सन्मानित केलं जाणं; आणि आपल्या लेखनातून कायमच जगण्याच्या उत्कटतांचा वेध घेणाऱ्या नाटककाराला जीवनगौरव पुरस्कार मिळणं; असे अनेक आनंद यात सामावलेले आहेत.

महेश एलकुंचवार हे कायमच आपल्या सर्व लेखनातून; नाटक, ललितबंध, भाषांतर या सगळ्यांमधून जगण्याचा, नात्यांचा, माणसांचा आणि स्वत:चा शोध घेत आलेले आहेत. किंबहुना संपूर्ण उत्कटतेने जगणं हाच त्यांचा अग्रक्रम राहिलेला आहे. लेखन हे जगण्याचं बाय प्रॉडक्ट असल्याचं ते कायम म्हणतात.

स्वातंत्र्योत्तर काळातील पिढीचे महत्त्वाचे नाटककार म्हणून आपण सगळेच जण त्यांना ओळखतो. परंपरांच्या ठाम अधिष्ठानावर आपली मांडणी करणं हा या पिढीचा एक महत्त्वाचा विशेष आहे. पण यातही महेश एलकुंचवार वेगळे उठून दिसतात ते त्यांच्या आत्मस्वरामुळे. अगदी पहिल्या 'सुलतान' या एकांकिकेपासून ते २०१९ साली मौजेत आलेल्या 'बिंदुनादकलातीत' या ललित लेखापर्यंत हा आत्मस्वर कायमच जाणवत आलेला आहे. त्यांच्या सुरुवातीच्या एकांकिकांमध्ये, नाटकांमध्ये हा स्वर तीव्र आहे, बोचरा आहे. पाहणाऱ्याबरोबरच लिहिणाऱ्यालाही हा स्वर रक्तबंबाळ करत असावा असं वाटत राहतं. या नाटकांमधली त्यांची पात्रं आपल्या असण्याच्या शोधात आणि आपल्या असण्याच्या अर्थात अत्यंत तीव्रतेने चाचपडताना दिसतात. या पात्रांमध्ये एक न्यून आहे. काहीतरी आयुष्यव्यापी कमतरता आहे. सल आहे.त्यातली काही पात्र कलाकारही आहेत, पण त्यांना आपली कला, आपले कलाउद्देश अत्यंत खोटे वाटत आहेत. आणि मग याचा परिणाम म्हणून ही माणसं मोठमोठ्या पोकळ गोष्टी बोलून आपला रितेपणा भरू पाहतात, स्वत: विद्ध होत होत दुसऱ्यांनाही रक्तबंबाळ करतात. आतून आणि बाहेरून जखमी होत राहतात. इतकं सगळं असूनही या माणसांना कुठेतरी निकोप, निर्मळ, सत्त्वशील, प्रामाणिक आयुष्य जगण्याची इच्छा आहे. आपल्यातल्या न्यूनतेमुळे भयग्रस्त आणि कमकुवत झालेल्या या माणसांची शाब्दिक आणि प्रसंगी शारीरिक हिंसा आपल्या अंगावर काटा आणत नाही.



छायाचित्र : विवेक रानडे

ती आपल्याला घायाळ करते. करुण करते. याचं महत्त्वाचं कारण म्हणजे महेश एलकुंचवार आपल्या पात्रांना प्रेम देतात, सहानुभूती देतात, मानवी स्खलनाला कुठलीही आदर्शवादी फूटपट्टी न लावता त्या माणसांना त्यांच्या सर्व गुणदोषांसकट स्वीकारतात. आणि मग हे आर्त दु:ख आपल्याला अस्वस्थ करतं. याच सुरुवातीच्या नाटकांमध्ये प्रस्थापिततेविरुद्धचा प्रक्षोभ आहे. हीन आणि सवंग अभिरुचीचा धिक्कार आहे. साहित्य, नाट्य आणि एकंदरीतच जीवन-व्यवहारातल्या दांभिकतेला तीव्र आक्षेप आहे. बंडखोरी आहे. मध्यमवर्गीय कल्पनांना सणसणीत धक्के दिलेले आहेत. काही ठिकाणी उघड उपहास आणि कुचेष्टा पण आहे. पण यात फक्त थिल्लरपणे टोप्या उडवणं नाही. किंबहुना हा भाग महेश एलकुंचवार यांच्या संपूर्ण लेखनात कुठेही जाणवत नाही. पण त्यांच्या लेखन पूर्वार्धात आक्रमकता आहे, तीव्र आग्रह आहे. आपल्याच शोधापायी मनात निर्माण झालेली अशांतता आणि विव्हलता इथे सतत ठिबकत राहते. 'यातनाघर', 'वासनाकांड', 'गार्बो' ही या काळातील महेश एलकुंचवार यांच्या नाटकांची काही ठळक उदाहरणं म्हणून पाहता येतील.

यानंतर महेश एलकुंचवार जवळजवळ नऊ वर्षं काहीही लिहीत नाहीत आणि त्यानंतर 'वाडा चिरेबंदी' आणि 'प्रतिबिंब' एकामागोमाग एक लिहितात. आणि मग 'मग्न तळ्याकाठी', 'युगांत', 'आत्मकथा', 'वासांसि जीर्णानि', 'सोनाटा', 'एका नटाचा मृत्यू' ही सर्व नाटकं येतात. या मधल्या वर्षांमध्ये काय झालं याच्याशी आपल्याला अर्थातच कर्तव्य नाही, पण यानंतरच्या त्यांच्या नाटकात 'असण्या'च्या अर्थाबरोबरच, 'असण्या'च्या शोधाबरोबरच 'असण्या'चा स्वीकारही दिसतो. लेखकाने भवतालाला कवेत घेतलं असल्याचं जाणवतं. एकंदरीत वैश्विक पसाऱ्यातली मानवी आयुष्याची मर्यादा आणि तिचं भानही जाणवतं. हा सहनशील स्वीकारही आपल्याला पीळ पाडतो, अनेकदा त्यातून प्रश्नही निर्माण होतात आणि आपण अंतर्मुख होतो. यामध्ये देखील महेश एलकुंचवार यांना पडलेले प्रश्न आहेतच. काही प्रश्न तर तेच आहेत, पण ते आता आणखी मोठा पट पुढे पाहू लागतात. स्वत:बरोबर वाचकाचं, प्रेक्षकाचं भानही विस्तारतात. 'वाडात्रयी' पासून तर त्यांच्या परंपराभानाचा पोत









**नाट्यत्रयी...**



वाडा चिरेबंदी



मग्न तळ्याकाठी



युगान्त

*(तीनही छायाचित्रे : नाट्यत्रयीचे दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांच्या सौजन्याने)*

किती घट्ट आहे हेही जाणवतं. 'वाडा चिरेबंदी' मधली पडझड, 'मग्न तळ्याकाठी'मधला बंधुभाव आणि आर्तता, 'युगान्त' मधला भयाण वास्तवाचा सहनशील स्वीकार हा याच भूमिका अधोरेखित करतो.

एलकुंचवारांची नाटकं आम्हाला काय देतात? तर मुळात ती आमच्यासमोर हाडामांसाची जिवंत रसरशीत पात्रं उभी करतात. त्या पात्रांची उत्कट सुखदु:खं, तडफड आमच्यासमोर उभी राहते. भावभावनांचा एकसंध आलेख आमच्यासमोर उभा राहतो. त्यांची पात्र नटांपुढे आव्हान उभं करतात, त्यातली नाट्यमयता दिग्दर्शकांना आव्हान देते आणि त्यांच्या नाटकांतून तयार होणारी भावना आणि जाणीव प्रेक्षकांना आवाहन करते. एलकुंचवारांची नाटकं या सर्व पातळ्यांवर आम्हाला श्रीमंत करतात.

मराठीत ललित लेखनाची मोठी परंपरा आहे. या परंपरेचे अनेक प्रकार आहेत. त्यांतला एक प्रकार म्हणजे प्रदीर्घ लेखाद्वारे मुक्तचिंतन साधून काही महत्त्वाची प्रेरणा व जाणीव मांडणं हा होय. हा काहीसा अनवट मार्ग आहे. महेश एलकुंचवार यांनी हाच मार्ग जवळ केलेला आहे. त्यांचा ललित लेख, प्रत्येक ललित लेख हा प्रदीर्घ आहे. यामध्ये शोध आहे, प्रश्न आहेत, क्वचित उत्तरं आहेत; पण सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे यात अनेक माणसं आहेत आणि त्या माणसांबद्दलची अपार कृतज्ञता आहे.ही माणसं आपल्याला किती श्रीमंत आणि समृद्ध करून गेली, ती नसती तर आपण आज असे नसतो ही भावना या ललितबंधांचा पाया आहे. यामध्ये प्रत्यक्ष भेटलेली जवळची माणसं तर आहेतच, पण संपूर्ण आयुष्याची दिशाच जणू बदलून टाकणारे काही कलाकारही आहेत. काही

अत्यंत कमी काळासाठी भेटलेली, पण मनावर कायमचा खोल परिणाम करून गेलेली माणसं आहेत. त्यांत गाणी आहेत. काही नाटकांतील, पुराणांतील, महाकाव्यांतील, चित्रपटांतील व्यक्तिरेखा आहेत आणि या यातील सर्व पात्रांशी महेश एलकुंचवार यांचा वास्तव आणि कल्पित पातळीवरील मुक्त संवाद आहे. हा संवाद आपल्याला आकर्षून घेतो, अंतर्मुख करतो, तर कधी लख्ख प्रकाश पाडतो. यात महेश एलकुंचवार यांची अतिशय लखलखीत अशी भाषा आहे. आपला तोल जराही न हलू देता, फुकाचं अलंकरण न करता नेमका अर्थ तितक्याच नेमक्या शब्दांतून व्यक्त करणारी ही भाषा आहे. एका स्वतंत्र लेखाचा विषय व्हावा इतकं हे समृद्ध भाषाभान आहे. पण असं असूनही केवळ भाषा हा या लेखांचा एकमेव महत्त्वाचा मुद्दा कधीच होत नाही. या लेखांमध्ये महेश एलकुंचवार संगीताबद्दल बोलतात, चित्रांबद्दल बोलतात, परंपरांबद्दल बोलतात, साधनेबद्दल बोलतात, याचबरोबरीने ते दु:खाबद्दल बोलतात, करुणेबद्दल बोलतात, एकुटवाणेपणाबद्दल बोलतात, अध:पतनाबद्दल देखील बोलतात. याच लेखांमध्ये, 'या जगाशी आपला सूर जुळला नाही की काय', 'आपण एकटेच आहोत की काय', 'आपण असेच राहणार की काय' अशी अत्यंत विव्हल करणारी जाणीव पसरून राहिलेली आहे. या चिरंतनाच्या आणि अमूर्ताच्या शोधामुळे आपण एकाच वेळी अस्वस्थ आणि समृद्ध होतो.

महेश एलकुंचवार यांचा भारतीय परंपरांचा, भारतीय संगीताचा, पाश्चात्त्य संगीताचा, चित्रकलेचा, भारतीय तत्त्वज्ञानांचा, उपनिषदांचा असा एकंदरीतच अभ्यास, त्यांचा दृष्टिकोन आणि या सर्व अभ्यासाचे आणि दृष्टिकोनाचे त्यांच्या लेखात येणारे संदर्भ हा एक फार प्रभावी असा भाग आहे. अभिजाततेच्या संस्कारांबरोबर आपलं व्यक्तिमत्त्व कसं घडवावं याचा एक नमुना आपण महेश एलकुंचवार यांच्या सर्व लेखांमध्ये पाहू शकतो.

याला जोडूनच एलकुंचवार यांचा कलाविचार येतो. एलकुंचवारांच्या कलाविचारात साधनेला, तपस्येला अतिशय महत्त्व आहे. शोध घेणं ही सर्वांत महत्त्वाची निकड आहे. प्रायोगिक असणं हा नैसर्गिक निर्णय आहे. लौकिक यशापयश अतिशय कमी महत्त्वाचं आहे. कुठल्याही दिखाऊपणाला,


















अनावश्यक झगमगाटाला त्याच्यात स्थान नाही. कलाकारांनी कायम आपल्या अंत:प्रेरणा तपासून पाहत स्वत:ला आणि स्वत:तील कलेला, कलाकाराला घडवत राहावं असा अतिशय मूलभूत विचार ते कायम जगलेले आहेत व मांडतही आलेले आहेत.

इतका मोठा पट मांडणारा महेश एलकुंचवार यांचा असा हा ‘आत्मस्वर’ आहे. आपले प्रश्न मांडण्यासाठी किंवा आपल्या आतल्या प्रश्नांची उकल करण्यासाठीच आपण लिहितो असं ते कायमच म्हणत आलेले आहेत. ‘आजूबाजूच्या वास्तवाकडे ते डोळेझाक करून फक्त स्वत:च्या आतल्या प्रश्नांना महत्त्व देतात’ असा एक आक्षेप महेश एलकुंचवार यांच्याबद्दल कायम घेतला जातो. पण महेश एलकुंचवार यांना आपल्या लेखनातून आणि जगण्यातूनही कधीच असं ढोबळ पुरोगामित्व मिरवण्याची गरज वाटलेली नाही, वाटतही नाही. कुठल्याही विचारसरणीचा वाहक होणं त्यांनी जाणीवपूर्वक नाकारलं आहे.

यातून एक प्रश्न उद्भवतो तो असा की, इतका तीव्र आत्मस्वर जपणाऱ्या लेखकाचं आणि समाजाचं नातं असतं का? आणि असेल तर ते काय प्रकारचं असतं? मला वाटतं, महेश एलकुंचवार जी जाणीव देतात, दृष्टिकोन देतात, जे भाषाभान देतात, ते माणसाला समृद्ध करणारं आहे. त्याला भावनिक आणि मानसिक बदलाबद्दल जागरूक आणि जागृत करणारं आहे. आणि यासकट माणसातल्या चिरंतनाला आवाहन करणं, स्वत:ला शक्य तितक्या निकोप स्वरूपात मांडणं हे समाजाप्रती, सामूहिक संवेदनांप्रती दिलेलं मोठंच योगदान असतं. आणि या सर्व गोष्टी देऊन आमचं भावजीवन लख्ख आणि स्निग्ध करणाऱ्या महेश एलकुंचवार यांना माझा दंडवत.

– ओंकार गोवर्धन
govardhanomkar30@gmail.com/9822018945

## ‘माझं नातं सार्वभौम जीवनाशी’ – महेश एलकुंचवार



छायाचित्र : विवेक रानडे

दिलीप वि. चित्रे स्मृती साहित्य जीवनगौरव पुरस्काराच्या निमित्ताने **महेश एलकुंचवार** यांचं व्हीडिओवर केलेलं भाषण.

नमस्कार,

महाराष्ट्र फाउंडेशनने यंदाचा जीवनगौरव पुरस्कार मला देऊ केलेला आहे. त्यासंबंधीची बातमी मला मुकुंद टाकसाळे यांनी जेव्हा परवा कळवली, तेव्हा मला फार बरं वाटलं अणि आनंदही झाला. याचं कारण असं की, माझ्या आधी जीवनगौरव पुरस्कार मिळवणारी जी लेखकमंडळी फाउंडेशनतर्फे आतापर्यंत गौरवान्वित झालेली आहेत, ती फार मोठी आहेत. अगदी तेंडुलकर, पु.ल. देशपांडे यांच्यापासून आपण सुरुवात केली अगदी पाडगावकरांपर्यंत, डहाके, अवचट ह्यांच्यापर्यंत, तर या सगळ्या लोकांच्या रांगेत आपल्याला कुणीतरी

बसवतं आहे, ही कल्पना फार समाधानाची असते. आणि त्याचा आनंद मला झालाच. कारण या पुरस्काराला महाराष्ट्रामध्ये एक मोठी प्रतिष्ठा आहे. आणि हा पुरस्कार देताना अत्यंत साक्षेपाने, विचारपूर्वक, माणसांचं एकूण कर्तृत्व पाहून दिलेला असतो अशी समजूत आहे. त्याच्यामुळे योग्य त्या माणसांना तो पुरस्कार दिला जाईल याची योग्य ती काळजी घेतली जाते, याची फार खात्री महाराष्ट्रात सगळ्यांना आहे. त्यामुळे या पुरस्काराचं मूल्य मोठं आहे. आणि तो माझ्याकडे आला याचा मला खरोखरच फार आनंद झाला. आणि हे बोलणं औपचारिक नाही, हे खरं आहे.

परंतु या अनुषंगानं मी आता जे काही बोलेन, ते कदाचित तुम्हाला अप्रस्तुत किंवा मी अयोग्य ठिकाणी बोलतो आहे, असं वाटण्याची शक्यता आहे. पण तरीही मी काही गोष्टी बोलतो. इतर लेखक मंडळींना जेव्हा असे पुरस्कार मिळतात, तेव्हा मला त्यांचं काम माहितीच असतं आणि मला आनंदच होतो. आणि खूप मोठं काम केलेली माणसं आपल्याकडे असतात. मला स्वत:ला जेव्हा लेखक म्हणून काही पुरस्कार मिळतो, आतापर्यंत मिळालेले आहेत काही, तर तेव्हा मी स्वत:ला नेहमी विचारतो की, मी लिहितो ही गोष्ट तर खरी आहे,पण मी लेखक आहे का? इतर लेखकांच्या लेखकपणाबद्दल मला खात्री असते, तशी मला माझ्या लेखकपणाबद्दल खात्री नाही. याचं कारण असं की, माझ्यावर एकूण शब्द, शब्द आणि लेखक यांचं नातं, लेखकाच्या जबाबदाऱ्या, शब्दामुळे त्याच्यावर आलेल्या जबाबदाऱ्या या सगळ्यांचे संस्कार जे झालेले आहेत ते फार खोलवर आहेत. आणि त्यांची सुरुवात माझ्या घरातच झालेली आहे. माझे वडील संस्कृतचे विद्वान होते. संस्कृत त्यांनी मला खूप शिकवलं – माझ्या वयाच्या चौथ्या वर्षांपासून. त्यामुळे शब्द आणि मी यांचं जे नातं आहे आणि शब्दांची जी मागणी माझ्याकडून आहे, ती पूर्ण पाडण्याकरता मी कितपत तयारी केलेली आहे, त्या मागण्या पुऱ्या करताना मी कितपत पुरा पडलेलो आहे, असे प्रश्न माझे मलाच मी विचारतो आणि माझ्या लक्षात येतं की, आपण खूप अपुरे पडतो आहोत.

लेखकाचं आणि शब्दाचं नातं आधी लेखकाला जर कळलं तर मग पुढच्या गोष्टी सुरू होतात. पुढे त्याचा लेखनक्रम, जीवनक्रम, जे काही असेल ते, सुरू होतं. एक तर मला आयुष्यात लेखन हे ‘करिअर’ आहे किंवा लेखन ही ‘कारकीर्द’ आहे असं कधी वाटलंच नाही.अत्यंत जिव्हाळ्याच्या गोष्टीची ‘कारकीर्द’ होऊ शकत नाही. कारण तुम्हाला तिथून आनंदापलीकडे काहीच मिळवायचं नसतं. त्यामुळे लेखन ही माझ्यासाठी ‘कारकीर्द’ नव्हती. लेखन करताना आपण लेखक आहोत की नाही अशी शंका मला यावी याचं कारण ‘शब्द म्हणजे काय’ हे माझ्या वडिलांनी मला एकदा काही सूक्तं म्हणून दाखवली त्यातून कळलं. त्यांपैकी काही मी थोडंसं म्हणून दाखवतो. आजकाल झालं आहे काय की, तुम्ही संस्कृतमध्ये बोललात किंवा तुम्हाला संस्कृत येतं असं कळलं की, ताबडतोब तुम्ही एका विशिष्ट गटामध्ये ढकलले जाता. तुम्ही ‘उजवे’ आहात असं सांगितलं जातं. अगदी माझं गंगेवर प्रेम आहे, यमुना नदीची मिथकं मला आवडतात, मला थोडंफार संस्कृत येतं, एवढ्या एका कारणानं मी ‘उजवा’ ठरू शकतो. आणि हे या प्रकारचं ध्रुवीकरण महाराष्ट्रातच काय, पण भारतातच इतकं टोकाचं झालेलं आहे, की, कुठलीच बाजू न घेता सगळ्या चांगल्या गोष्टींबद्दल आपण आदर ठेवणं आता दिवसेंदिवस कठीण व्हायला लागलेलं आहे. तुम्हाला इथे बसावं लागतं, नाहीतर तिथे बसावं लागतं. अदरवाईज यू डोण्ट बिलाँग. तुम्हाला जागा नाही.

हा मुद्दा नंतर, परंतु शब्दांचं नातं सांगतो की, शब्द आपण मागूनच घेतलेले आहेत. 'वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता' आणि 'मनोमेवाचिप्रतिष्ठितम्'. 'माझ्या मनात तू शब्द होऊन, वाणी होऊन तुझी प्रतिष्ठापना होऊ दे'. ही झाल्यानंतर मग माझी जबाबदारी काय? मला शब्द मिळाले. 'वाचो विभान्ति निखिला'. चारही अंगांनी वाचा किंवा वाणी, 'निखिला विभान्ति' म्हणजे पूर्ण प्रकाशित झाली आहे माझ्यासाठी. आता जर एवढं मोठं दान माझ्या पदरात पडलेलं आहे; की, चारही अंगांनी विकसित झालेली, प्रकाशित झालेली वाणी जर माझ्या ओंजळीत पडलेली आहे,तर मग माझी जबाबदारी काय त्या वाणीबाबत? तर, 'अनेनाधितेनाहोरात्रान् संदधामि ऋतं वदिष्यामि, सत्यम् वदिष्यामि।' अहोरात्र डोळ्यात तेल घालून अत्यंत कठोरपणे या शब्दांची मी निगराणी करेन, यांचा गैरवापर करणार नाही. मी सत्यच बोलेन. 'ऋतं वदिष्यामि.' सत्यच बोलेन. ही मूळ प्रतिज्ञा असते लेखकाची. ही वैदिक काळातली आहे. औपनिषदिक. आणि ही प्रतिज्ञा तंतोतंत पाळायची तर लेखकाला फार शुद्ध असावं लागतं.

मी लेखक होणार हे मला माहिती नव्हतं. माझ्या आई-वडिलांनाही माहिती नव्हतं. परंतु हे मला त्यांनी शिकवलं आणि तेव्हापासून शब्दांचं जे महत्त्व आहे, शब्दांचं जे आपलं नातं आहे,त्याचा संस्कार कुठेतरी माझ्यावर झालेला होता आणि त्याच्यामुळे मी लिहितो. लिहावंसं वाटतं म्हणून मी लिहितो आहे. पण ही जी प्रतिज्ञा आहे, प्रतिज्ञा म्हणण्यापेक्षा मी हे जे वचन दिलेलं आहे शब्दांना, ते पार पाडण्यामध्ये मी कितपत यशस्वी झालो आहे याबद्दल मला नेहमी शंका येतात. आपण लोकानुरंजनाकरता शब्द उधळले का? आपण आपल्या स्वत:ला काही मिळावं म्हणून शब्द उधळले का? आपल्याला आपल्याबद्दलचं काही गाऱ्हाणं सांगायचं आहे, आत्मकरुणा व्यक्त करायची आहे म्हणून शब्द उधळले का? आपल्यालाच सत्य सापडलंय, आपलंच बरोबर आहे असा हट्टी आव आणतोय का मी? इतरांचं हनन करण्यासाठी ते शब्द मी वापरतोय का? शब्द वापरताना मुळात माझे हेतू शुद्ध आहेत का? अशा विविध टप्प्यांवर, विविध पातळ्यांवर जेव्हा आपण स्वत:ची तपासणी करू लागतो, तेव्हा लक्षात येतं की, आपण आपलाच पराभव खूप वेळा केलेला आहे. तेव्हा स्वत:ला लेखक म्हणवून घेण्याची हिंमत नाही आहे माझी. माझा लेखक होण्याचा प्रयत्न चालला असेल कदाचित. मी लिहितो, सातत्याने लिहितो आहे मी, परंतु लेखकपणाचं जे एक अत्यंत व्रतस्थ असं जीवन जगावं लागतं आणि त्यासाठी ज्या गोष्टींशी आपल्याला कायम बांधिलकी ठेवावी लागते, त्या माझ्या आयुष्यात मी किती पाळू लागलो आहे, याचा अंदाज मी कायम घेत असतो. त्यामुळे मला जेव्हा असे मोठाले सन्मान मिळतात तेव्हा मला खरोखरच संकोचल्यासारखं होतं. उलट कधी कधी असं वाटतं की, इतकं छोटं काम केल्यानंतर आपल्या अवतीभवतीच्या लोकांचं समाधान होऊन ते आपला जीवनगौरव करतात किंवा इतरांचंही करतात. तर आपण जरा थांबून आपल्यासुद्धा लेखकांकडून काय मागण्या आहेत, हे सामान्य वाचकाने ठरवायला पाहिजे.

असं झालं आहे सध्या.हा थोडा वेगळा मुद्दा घेतो आहे मी, परंतु माझं आणि शब्दांचं नातं काय आहे आणि मला ते किती थोडं रेसभर देखील इकडेतिकडे हलू देत नाही, हे कळलेलं आहे. आणि तिथे मी कायम अपुरा पडत गेलेलो आहे. त्याच्यामुळे मी लेखकपणाचा टिळा स्वत:ला लावून घ्यायला जरा नाखूष असतो. परंतु लोक आपल्याला प्रेमाने काहीतरी देतात; आणि लोकांच्या प्रेमाचा सन्मानच

करावा. कारण प्रेम ही सहसा न मिळणारी गोष्ट आहे. ती मिळते आणि मी ती अत्यंत आदरपूर्वक, कृतज्ञतापूर्वक घेतो. परंतु म्हणून या वेळेला मला असं वाटलं की, या व्यासपीठावरून शब्द आणि लेखक यांचं नक्की नातं काय असतं आणि मग त्यांना त्याच्यातून त्यांची बाकीची नाती कशी लक्षात येतात याविषयी बोलावं. त्यांचं सामाजिक नातं काय शब्दांशी, त्यांचं राजकीय नातं शब्दांशी काय, आध्यात्मिक नातं काय, ही सगळी नाती त्याने तपासून पाहायला पाहिजेत. आणि समाजानेही तपासून पाहायला पाहिजेत असं मला वाटतं.

हा मुद्दा मोठ्या विस्ताराने बोलण्यासारखा आहे, पण मी ते सांगतो. एका वेगळ्या मुद्द्यावर येतो आता. मी आत्ता बोललो की, मी जरा संस्कृत बोललो की, अतिशय कडव्या ध्रुवीकरणामुळे मी एकदम ‘उजवा’ ठरतो,किंवा दुसऱ्या कुठल्या तरी कारणाने एकदम डावा ठरतो. मला हे कधी कळत नाही. याचं कारण असं की, मी कुठलाही आदर्शवाद, आयडिऑलॉजी जीवनधर्म म्हणून कधी स्वीकारलेली नाही. या माझ्या विधानात तुच्छता नाही बरं, अजिबात तुच्छता नाही. निरनिराळ्या आयडिऑलॉजीज् असतात. आदर्शवाद असतात. त्या अत्यंत सद्हेतूने, विचारपूर्वक जन्मलेल्या असतात. सद्हेतूने निर्माण केलेल्या असतात. त्याच्यात जगाचं भलं व्हावं असंही लोकांना वाटत असतं. परंतु हळूहळू आपल्या असं लक्षात यायला लागतं की, त्या अपुऱ्या पडत आहेत. या विचारसरणींमुळे काही तात्कालिक प्रश्न सुटतात.काही काळापुरते सुटतात. ते जातात. नवीन प्रश्न येतात. आणि तोपर्यंत त्या विचारसरणीला हळूहळू एक बंदिस्तपणा येऊ शकतो. जे धर्मांचं झालेलं आहे, तेच आपल्याकडे विचारसरणींचं झालेलं आहे. दरवेळेला एखादा नवीन विचार आला की, असं वाटतं की, हां, आता मानवजातीच्या कल्याणाची गोष्ट आपल्याला सापडली. पण तसं होत नाही. याचं कारण असं की, या विचारसरणीसुद्धा इन्स्टिट्यूशनलाइझ होतात. त्यांची पीठं बनतात. आणि त्या पीठांचे जे कुणी अधिकारी असतात आणि त्यांचे जे कुणी अनुयायी असतात, ते तितकेच कडवे होतात, जितके कुठल्या धर्माचे होतात. ‘ते’ आणि ‘आपण’ असा विचार होऊ लागतो. एकात्मतेसाठी प्रयत्न करणारेच हळूहळू नकळत विभाजन करतात. मग तुम्हाला त्या अनुयायांमध्ये बसावं लागतं किंवा मग तुम्हाला दुसरी कुठली विचारसरणी बरी वाटत असेल तिथे बसावं लागतं. खरं तर हल्ली सोयीची विचारसरणी कुठली आहे ते पाहूनच लोक तिथे जातात – लेखकसुद्धा. मला स्वत:ला कुठलीही विचारसरणी जवळ करावीशी वाटली नाही. याचं कारण त्या मला अत्यंत आदरणीय वाटल्या, त्यांची जगाचं कल्याण करण्याची प्रतिज्ञा मला माहिती असली, तरीसुद्धा मला त्या कायम अपुऱ्या वाटलेल्या आहेत. काही काळ दे ब्रिंग रिड्रेस टू पीपल, काही काळ त्या सुखाचा आभास निर्माण करतात. काही काळ काही सुखं दाखवतात. सुधारणाही होतात. महाराष्ट्रातली आपल्याकडची जी रिफॉर्मेशनची चळवळ आहे, त्याचे परिणाम दिसतातच आपल्याला. त्यामुळे मला तिच्याबद्दल पूर्ण आदर आहे. परंतु म्हणून मी एखाद्या विचारसरणीशी स्वत:ला घट्ट बांधून घेईन ही शक्यताच मला दिसत नाही. त्या बाबतीत मी एकांडा आहे. कारण मला कळपात राहणं शक्य नाही. कारण त्याच्यात राहिलं तर त्याचे सर्व नियम पाळावे लागतात. आणि ते दरवेळेला बरोबरच असतात असं नाही. पुष्कळदा असं होतं की, या विचारसरणींमध्ये साचलेपण येतं. त्या पुढे सरकत नाहीत, त्यांच्यात काळानुरूप बदल होत नाहीत. पण हट्टाग्रह कायम राहतात. आणि ते इतके टोकाचे असतात की, कधी कधी दोन मित्र एकमेकांना

समजून घेऊ शकत नाहीत. अंतरं कमी होण्याऐवजी वाढू लागतात. तेव्हा माझ्यासारख्या माणसाची फार पंचाईत होते. माझी एक अतिशय जवळची समाजवादी मैत्रीण आहे. व्यक्ती म्हणून आमच्यामधला स्नेह खूप खोल आणि अगदी चांगला आहे. परंतु काही मुद्द्यांच्या वेळेला तिची पहिली प्रतिक्रिया असते, की 'तो 'हिंदू' आहे फार.' हे मी दोनतीन वेळा ऐकून घेतल्यानंतर 'मी हिंदू आहे फार' म्हणजे नक्की काय असा प्रश्न पडला.म्हणजे मी जन्मलेला हिंदूच आहे, पण तसा आहे म्हणून त्याचा मी कधी बडिवार केला नाही, आणि 'नाही म्हणून' ते नाकारण्याची गरज नाही.

पण हिंदूंची सुद्धा एक ज्ञानपरंपरा होती. ज्ञानपरंपरेला धर्म नसतो. ज्ञानपरंपरेला देव नसतो. तिला काहीच चिकटत नाही. ज्ञानपरंपरा हे निखळ सुंदर, तेवतं काम असतं मानवसमूहाचं. आणि ती जेवढी मला प्रिय आहे, तेवढीच मला पाश्चात्त्य ज्ञानपरंपराही प्रिय आहे. तेव्हा निव्वळ मला हीसुद्धा ज्ञानपरंपरा प्रिय आहे, एवढ्याने जर मी 'हिंदू','उजवा' होत असेन, तर मला असं वाटतं की, आपल्या स्वत:च्या विचार करण्यावर आपण फार मोठ्या मर्यादा आणून टाकतो. अशी मर्यादा मला स्वत:वर घालून घ्यायची नाही आहे.

एक लक्षात घ्या; शतकानुशतकं निरनिराळ्या विचारसरणी निर्माण झाल्या. सगळ्यांचे हेतू अत्यंत उदात्त आणि चांगले होते. परंतु तरीही मानवजातीचं कुठलंही दु:ख दूर झालेलं नाही. याचं कारण असं, या सगळ्यांच्या मर्यादा आहेत. अत्यंत कृतज्ञ भाव ठेवूनसुद्धा हे कबूल करावं लागेल की, या सगळ्यांच्या मर्यादा असतात. आणि त्या मर्यादाच जेव्हा शृंखला बनतात तेव्हा आपली मनं कोती, अनुदार होतात. आपली मनं शुद्ध असली तर कुठल्याही आदर्शवादाची गरजच काय? तेव्हा लेखकाने आपलं मन जास्तीत जास्त शुद्ध ठेवावं. सगळ्यांनीच आपापलं मन आधी शुद्ध करावं. समाज मग आपोआपच आदर्श होईल.

तेव्हा या सर्वच विचारसरणी ज्या एका अनादि-अनंत छत्राखाली येतात, त्या छत्राशी मी माझं नातं जोडण्याचा प्रयत्न करतो. आणि ते छत्र म्हणजे जीवन. सार्वभौम जीवन. आता झालं आहे काय की, तुम्हाला अवतीभवतीचे प्रश्न दिसत नाहीत का, ज्वलंत प्रश्न दिसत नाहीत का, त्याच्याबद्दल तुम्ही लिहिलं पाहिजे असा हट्टच धरलेला असतो लोकांनी. ते जर तुम्ही केलं नाही, तर तुम्ही लेखक नाही. अमुक केलं नाही, तर तुम्ही लेखक नाही. तुम्ही काय केलं पाहिजे आणि काय केलं नाही पाहिजे, हे लेखकांपेक्षा लोकांनीच ठरवूनच टाकलेलं आहे. तर ज्वलंत प्रश्नांना लेखकांनी भिडलं पाहिजे, अवतीभवतीचं वास्तव दाखवलं पाहिजे ही गोष्ट खरीच आहे,पण त्याच वेळी लेखकावर एक बंधन आपण घालतो आहोत ह्याचं भान असावं. एरव्ही लेखक आपण एक व्यक्ती म्हणून त्यांना, प्रश्नांना भिडत असतोच. आपल्यामध्ये किती सच्चेपणा आहे, किती इन्टेग्रिटी आहे, त्याच्याप्रमाणे आपण त्यांच्याशी मुकाबला पण करत असतो. परंतु माझं लेखनाचं एक सत्य, लेखनाचं एक जग आहे. ते स्वायत्त आहे. ते त्या सार्वभौम जीवनाशी बांधील आहे. आणि ते थोडंसं वेगळं असू शकतं. तुम्हाला ऐकू येतात तेच ड्रम्स मला ऐकू येतील असं म्हणण्याचं काहीच कारण नाही. पण इथं असहिष्णुतेचा अगदी कडेलोट होतो. म्हणून मला फार दु:ख होतं.

एक लक्षात घ्या की, आपण महाभारताकडे जाऊ. महाभारतातलं युद्ध हा एक ज्वलंत प्रश्न होता. सख्खे चुलतभाऊ एकमेकांशी भांडत आहेत. केवढं मोठं युद्ध. त्याच्याबद्दल त्या काळाचा

ज्वलंत प्रश्न म्हणून व्यासांनी लिहिलं. पण ते हे लिहीत असताना, युद्ध चालू असताना बाजूच्या एका पडक्या मंदिरामधल्या एका घंटेमध्ये एक चिमणी आपल्या बाळासाठी एक घरटं बांधत होती, हे सुद्धा व्यास न विसरता लिहितात. ही घटना तितकीच मोठी आहे , जेवढं महाभारताचं युद्ध आहे, तेवढीच. तेव्हा लेखकाला जीवनाचं संपूर्ण सामग्र्य, जीवनाची संपूर्ण समग्रता आपल्याला कळली पाहिजे, आपल्या आवाक्यात आली पाहिजे, अशी इच्छा तरी लेखकाने बाळगावी. आणि ती डागाळू नये म्हणूनच कोणत्यातरी एका आयडिऑलॉजीचा वसा घेणं तसं धोक्याचं आहे.मध्यंतरी माझी एक डाव्या विचारसरणीची मैत्रीण भेटली. आता ती सुद्धा माझ्या वयाची, तिशीच्या घरातली आहे. कसं काय चाललं आहे असं तिला विचारल्यावर ती म्हणाली, 'सगळं झालं असेल, जग बदललं असेल,पण मी माझी मतं नाही बदलली.' मी म्हटलं, 'साठ वर्षांत स्वत:ची मतं बदललीच नाहीस तू? मुख्य म्हणजे साम्यवादातच किती तऱ्हा आणि किती प्रकार जगभर निर्माण झाले. त्याच्याबद्दलचा भ्रमनिरासही झाला. पण साठ वर्षांत एकदाही तुला तुझं मत बदलावंसं सोड, पण तपासून पाहावंसं वाटलं नाही. म्हणजे हे तुझं थांबणं आहे, का त्या मतप्रणालीचा, विचारप्रणालीचा दोष आहे, हे तुला तपासून पाहावंसं वाटत नाही?' बरं, तुम्हाला रिझल्ट्स दिसत आहेत. दिसतंय तुम्हाला की, आपण कुठे गेलो आणि आपल्या हाती काय आलं.

त्यामुळे मी असं हे स्वीकारणार नाही. विशेषत:, लेखक म्हणून. माझा स्वायत्तपणा लहान असेल, माझा जीव लहान आहे. मी कितीही म्हणालो की, सगळं जीवन आपल्या आवाक्यात यावं, तरी तेवढा माझा आवाका नाही हे मला माहिती आहे.पण असं वाटण्याचं माझं स्वातंत्र्य मला ठेवता आलं पाहिजे. ते स्वातंत्र्य माझं मी ठेवणार, तो माझा हक्क आहे. मग तुम्ही मला 'उजवा' ठरवा, 'डावा' ठरवा, वाईट लेखक म्हणा, चांगला लेखक म्हणा, प्रतिगामी-पुरोगामी, काहीही. त्याने मला फारसा फरक पडत नाही. कारण मुळात लेखनाची 'कारकीर्द' हीच माझ्या डोक्यात कधी नव्हती.

तेव्हा विचारसरणींचा आग्रह सामाजिक कार्य करताना उपयोगी पडत असेल, परंतु कलावंताचं नातं या सगळ्याच्या पलीकडे जाऊन एका समग्रतेशी असतं. आणि त्या समग्रतेच्या नात्याचा शोध घेताना तो लेखक किती प्रामाणिक राहिला आहे, आणि किती शक्तीने त्याला भिडला आहे, हे पाहणं जास्त महत्त्वाचं आहे. रशियामध्ये जेव्हा कम्युनिझम होता, तेव्हा त्या प्रकारचं वाङ्मय लिहिणाऱ्या माणसांचं फार कौतुक होतं. अमेरिकेमध्ये कॅपिटॅलिस्ट पद्धतीबाबत हेच म्हणता येईल. या गोष्टी अत्यंत तात्कालिकच म्हटल्या पाहिजेत. या गोष्टींनी जर आपली जीवनदृष्टी झाकोळली जाणार असेल तर, इतरांचं मला माहिती नाही,पण लेखकाने जरा सावधपणाने विचार करायला पाहिजे की, मी कुठल्या कुठल्या गोष्टींना माझ्या जीवनावर, विचारांवर आक्रमण करू देणार? मी अमुक हे पाळलं नाही, तर 'आय वोण्ट बिलाँग' असं हल्ली फार झालंय. या समुदायात नाही, त्या समुदायात नाही, त्या समुदायात नाही, मला कुठेही जागा नाही. हरकत नाही. मी एकटाच राहीन. तर तेवढी किंमत द्यायची तयारी पाहिजे लेखकाची.

आणि खरं म्हणजे एकटं राहणं फारच सुखाचं असतं, जर आपल्याला काही कारकीर्द किंवा काही करिअर करायची नसेल. सध्या करिअर हा शब्द फार झालेला आहे. करिअर म्हणजे काय, तर प्रसिद्धी, पैसे आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या गोष्टी वगैरे. हा विषयच डोक्यात नसला आणि

आपल्याला माझं नातं शब्दांशी काय, माझं नातं माझ्या विषयाशी काय, माझा विषय काय, एकदम मूल्यनिर्णयात्मक होण्याऐवजी आपण समग्रतेचा विचार करतो का, याविषयी जर कल्पना स्वच्छ असल्या, तर लोक आपल्याला 'डावा' म्हणतात, की लोक आपल्याला 'उजवा' म्हणतात, चांगला म्हणतात, वाईट म्हणतात, या गोष्टींनी काही परिणाम होण्याचं कारण नसतं.

याच्यावर परत एक आक्षेप होऊ शकतो की, तुम्हाला सगळ्या गोष्टींपासून पळ काढायचा असतो. तुम्हाला कुठल्याही गोष्टींचा सामना करायचा नसतो. हा आरोप फारसा खोटा आहे असंही नाही. हे कवच अंगावर घेऊन माणसं पुष्कळदा स्वत:चा बचाव करतात, हे बघतो मी. परंतु मग त्याची परीक्षा अशी आहे की, व्यक्ती म्हणून तुमच्या व्यक्तिजीवनामध्ये तुम्ही जेव्हा निरनिराळ्या प्रश्नांना भिडता, त्या वेळेला तुम्ही काय भूमिका घेता, यावरून तुमचं जगणं खरं-खोटं हे आपल्याला कळू शकतं. पण जेव्हा लिखाणाशी आपला संबंध येतो, किंवा एखाद्या लेखकाच्या लेखनाबद्दल आपण विचार करू शकतो, तेव्हा त्याची भूमिका काय हे सुद्धा समजून घेणं आवश्यक आहे. मी आता कठोरपणे बोलायचं तर असं म्हणतो की, आपण अशा भूमिका समजून घ्यायला लागलो, तपासू लागलो की, लक्षात येतं की, अनेकांच्या भूमिका स्वच्छच नसतात त्यांच्याशी किंवा असतात त्या तकलादू असतात.

लेखनाची 'कारकीर्द' करावीशी वाटते, असं वाटणं ही भूमिका कशी असू शकते कुणाची, हे मला कळू शकत नाही. इथे माझा टीकेचा उद्देश नाही, अधिक्षेप करण्याचा उद्देश नाही. पण मी लेखनाची 'कारकीर्द' केली आहे आणि तुम्ही त्याची नोंद घ्या अशी अपेक्षा करणं ही, लेखकाला काय किंवा कुठल्याही कलावंताला, भ्रष्ट करणारी गोष्ट आहे असं मला फार वाटतं.

तेव्हा मी जे बोललो आहे, ते कितपत सुसंगत आहे मला माहिती नाही. परंतु मला तरी बोलायला इतकं चांगलं व्यासपीठ कुठे मिळणार? कारण हा जबाबदार माणसांनी आयोजित केलेला कार्यक्रम असतो.जबाबदार माणसांनी माणसं निवडलेली असतात. आणि कार्यक्रम जबाबदार माणसंच पाहतात, ऐकतात. त्याच्यामुळे मी आज बोलायचं ठरवलं होतं. माझं सगळं म्हणणं बरोबर असेल असं नाही. त्याच्यात खूप त्रुटी असतील किंवा ते संपूर्णपणे चुकलेलंसुद्धा असू शकेल. परंतु या चुका करण्याचा आणि या प्रकारे विचार करण्याचा अधिकार मला मिळावा, एवढं स्वातंत्र्य माझं मला अबाधित ठेवता यावं असं मला फार वाटतं. त्याचे जे काही परिणाम आहेत ते भोगायलासुद्धा मी आनंदाने तयार असतो. मुळात परिणाम असतील हेच माझ्या डोक्यात येत नाही. एखादं निर्णयस्वातंत्र्य आपण राबवलं तर त्याचे परिणाम काय होणार हे आपण मुळात स्वीकारलेलंच असतं. फार तर काय, तर मला वाईट लेखक म्हणतील, हाच फक्त दुष्परिणाम झाला तर झाला. तसं जर झालं तर आपोआपच इतर अनेक गोष्टींपासून माझी सुटका होईल. हा विनोदाचा भाग झाला. तरी मला स्वत:ला असं वाटतं की, लेखकाने स्वत: आपलं समष्टीशी, विचारसरणींशी, विचारधारांशी या सगळ्यांशी नातं काय हे पाहिलं की, मग आपल्या लक्षात येतं की, आपलं नातं फक्त समग्रतेशी आहे. जीवनाच्या समग्रतेशी आहे. आणि ती व्यक्त करताना आपल्याला आपलं बळ सतत वाढवत राहणं, आपला आवाका सतत वाढवत राहणं या गोष्टी कराव्या लागतात. कारण तो आनंदाचा भाग असतो. आणि आपला जो वकूब असेल त्याप्रमाणे त्या गोष्टी वाढतात. आणि त्याप्रमाणे आपली निर्मिती सिद्ध होते.

मी माझ्या मनातलं आज इतकं स्पष्टपणे प्रथमच जाहीर व्यासपीठावरून बोललेलो आहे. त्यात किती सुसंगतपणा आहे, किती असंगतपणा आहे, हे मला माहिती नाही. कारण मी हे तयार केलेलं भाषण नाही.यात काही विसंगती असतील, वैचारिक दोष असतील, त्रुटी असतील. त्या तुम्ही मला कळवल्या तर मला त्या समजून घ्यायला खूप आनंद होईल. कारण विचार एकट्याचा कधी होत नाही. लोकांच्या सहकार्यानेच तो पुढे जातो आणि दुरुस्त होतो. तेव्हा एवढं बोलतो आणि मी इथेच थांबतो.

मी परत तुमचे आभार मानतो.फार मनापासून आभार मानतो. आणि माझी लेखक म्हणून काय भूमिका आहे, ती गुंतागुंतीची आणि कदाचित घोटाळ्याची असली तरीसुद्धा शक्य तितक्या स्वच्छ शब्दात सांगण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. तो तुम्ही स्वीकाराल अशी आशा आहे.

धन्यवाद!!

maheshelkunchwar@gmail.com/9823273943

---

** व्हीडिओ भाषणाचं शब्दरूप :*
*शुभदा चंद्रचुड / smcmrc@gmail.com/9881402798*

# स्वप्न जगणारा चैतन्यदायी माणूस...

समाजकार्य
जीवनगौरव पुरस्कार
**गजानन खातू**



I have a Dream... मार्टीन ल्युथर किंगचं ते भाषण सहा दशकं जगावर प्रभाव ठेवून आहे. स्वप्न कुणाला नसतं? शिक्षण, करियर, नोकरी, धंदा, कौटुंबिक विकास हे तर आम आदमीचं स्वप्न आणि त्यासाठीच धडपड. पण स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या समाजव्यवस्थेचं स्वप्न पाहणारे, त्यासाठी झोकून प्रयत्न करणारे खरे परिवर्तनाचे दूत असतात. परिवर्तनाच्या चळवळींतील असाच चैतन्यदायी स्त्रोत म्हणजे गजानन खातू!

गेली सहा दशकं खातूभाई परिवर्तनाच्या चळवळीत सक्रीय आहेत. स्वातंत्र्यानंतर देशात औद्योगिक विकास सुरू झाला आणि समाजसुधारणांचे वारेही वाहू लागले.

प्रत्येकाच्या आशाआकांक्षा वाढल्या होत्या. दलित-शोषित, अल्पसंख्य, महिला यांचे प्रश्न पुढे ऐरणीवर आले. जात-वर्गव्यवस्थेविरुद्ध आवाज उठू लागला. साहित्य-कला-आविष्कार यांतून नवे हुंकार प्रकट होऊ लागले. यातूनच सामाजिक परिवर्तनाची लढाई जोम धरू लागली. जमीनदारी, दलित-महिला अत्याचार यांविरुद्ध संघटना सक्रिय झाल्या. आंदोलनं सुरू झाली. राजकारणातल्या साचेबंदपणाला आव्हान मिळत गेलं. समाजातील सर्वच थरांतील कार्यकर्ते या आंदोलनात झोकून देत उतरले. काहींनी प्रभावीपणे संघटनांची बांधणी केली, काही नेतृत्व करते झाले. तर या नव्या हुंकाराला व्यापक दिशा देण्यासाठी काहींनी शांतपणे होकायंत्राचं काम केलं. विचारांची रसद पुरवत आंदोलन कसं टिपेला न्यावं, प्राप्त परिस्थितीत काय स्ट्रॅटेजी करावी, हे सांगणाऱ्या मोजक्या माणसांत खातूभाईंनी आजवर निभावलेली भूमिका महत्त्वाची होती.

खातूभाईंच्या सामाजिक कामाची सुरुवात झाली ती राष्ट्र सेवा दल या संघटनेतून. ना. सू. हर्डीकर यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात सेवाभावी कामासाठी सुरू केलेल्या या संघटनेला साने गुरुजी, एस. एम. जोशी, ग. प्र. प्रधान, नानासाहेब गोरे, मधू लिमये अशांनी ठोस वैचारिक अधिष्ठान दिलं. पुढे परिवर्तनातील अनेक लढ्यांना आणि नेतृत्वाला या चळवळीने घडवलं. खातूभाई याच मुशीतून घडले. विचाराधिष्ठित परिवर्तनाचं स्वप्न पाहणारा माणूस कधी स्वस्थ बसत नसतो.

'क्राम्प्टन'मधील आपली नोकरी सोडून खातूभाई 'अपना बाजार'च्या सहकार चळवळीत उतरले. श्रमिकांनी सुरू केलेल्या 'अपना बाजार'ची, जनरल मॅनेजर म्हणून धुरा हातात घेतानाच ही चळवळ चहू बाजूंनी फोफावली. हे पहिलंच डिपार्टमेण्टल स्टोअर विस्तारू लागलं. अपना बाजारच्या शाखाही वाढत गेल्या. स्वच्छ, दर्जेदार धान्य आणि किफायतशीर किंमत याची सांगड घातली. प्रोसेसिंग उद्योगाला सुरुवात झाली. जागतिक बाजारपेठेचा अभ्यास करत खातूभाईंनी अत्याधुनिकीकरण करत ग्राहकांचा विश्वास संपादन केला. सहकारी दूध डेअऱ्यांनाही प्रसंगी चाप बसवला. अपना बाजारचा दबदबा तयार झाला. खातूभाईंनी लिहिलेल्या 'अपना बाजारची गोष्ट' या पुस्तकात (अक्षर प्रकाशन) या अद्भुत गोष्टी आहेत. अपना बाजारच्या या चळवळीतून खातूभाईंचं काम 'अमूल'मॅन कुरियन वर्गिसच्या तोडीचं होऊ शकलं असतं, पण भाईंचंच एक सूत्र आड आलं. कोणत्याही संस्थेची मालकी आपल्या हाती असता कामा नये, ही त्यांची



भूमिका. ऐन भरात असताना अपना बाजारचा कारभार नव्या पिढीच्या हाती सोपवत भाई नव्या परिवर्तनाच्या लढाईत सामील झाले.

खातूभाईंचं वैशिष्ट्य म्हणजे ते कायम तरुणाईसोबत स्वत:ला जोडून घेतात. Every good conversation starts with a good listener... असं म्हटलं जातं. खातूभाईंसोबत संवाद होतो तो त्यामुळेच. नीट ऐकायचं आणि नीट समजवायचं हे चळवळीत साधारण होत नसतं. खातूभाई मात्र वेगळे आहेत. तरुणांच्या बाजूने ते कायम उभे राहिले आणि प्रसंगी जोखीमही पत्करलीय.

आणीबाणीत भाईंनी भूमिगत राहून चळवळीला मदत केली. समतेच्या लढाईत ते सातत्याने सक्रिय राहिले. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव द्यावं यासाठी संघर्ष सुरू झाला. नामांतराच्या या लढ्यात भाई उतरले. या लढ्यासाठी त्यांनी अनेक सभा घेतल्या. पुढे तुरुंगवासही भोगावा लागला. डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखालील 'एक गाव एक पाणवठा' चळवळ ते विषमता निर्मूलन परिषद... या साऱ्या समताधिष्ठित चळवळीत खातूभाईंचा सहभाग लक्षणीय होता.

विविध सामाजिक संघटनांत काम करणाऱ्या पूर्ण वेळ कार्यकर्त्यांना अर्थसहाय्य व्हावं या हेतूने 'सामाजिक कृतज्ञता निधी' हा उपक्रम हाती घेण्यात आला होता. डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, सदाशिव अमरापूरकर, बाबा आढाव आदींच्यासोबत खांद्याला खांदा लावून खातूभाई उभे होते. निधी



संकलनासाठी ‘लग्नाची बेडी’चे दौरे हे त्यांचं कसब होतं.

कामगार चळवळी, ट्रेड युनियन हा खातूभाईंचा जिव्हाळ्याचा विषय. १९८०पासून गिरणी कामगारांचा लढा सुरू झाला. गिरणी कामगार त्या संपात देशोधडीला लागले. त्यात डॉ. दत्ता सामंत यांची हत्या झाली. अशा निर्नायक स्थितीत हवालदिल झालेल्या कामगारांनीच हा लढा आपल्या हातात घेतला. दत्ता इस्वलकर आणि सहकाऱ्यांच्या पाठीशी खातूभाई उभे राहिले. कामगारांची अनोखी आंदोलनं असोत, की सरकारसोबतची बोलणी असोत – त्या सगळ्या स्ट्रॅटेजीत खातूभाई सोबत होते. कामगारांना घरं मिळवून देईपर्यंत ते या संघर्षाचा भाग झाले होते.

नर्मदा बचाव आंदोलनातही मेधाताई पाटकरांसोबत खातूभाई खांद्याला खांदा लावून उभे राहिले. उपोषण, धरणं असोत, की मिटिंगा – आंदोलन पुढे जाण्यासाठी खातूभाईंची मांडणी महत्त्वाची असायची. पर्यायी विकासाची मांडणी खातूभाईंकडून ऐकताना त्यातील लहानसहान कंगोरे लक्षात येतात. ‘विकास- विरोधी’ अशी टीका कायम आंदोलनावर झाली. मात्र त्याचा प्रतिवाद खातूभाई त्यांच्या शैलीत करतात. खूप लिखाण त्यांनी केलं. जागतिकीकरणाचा रेटा, त्याचे परिणाम यावरील त्यांच्या लेखांची तीन पुस्तकं प्रसिद्ध आहेत. अर्थकारणापेक्षा सामाजिक अंगाने या विषयाची केलेली उकल ही कार्यकर्त्यांसाठी कार्यशाळाच आहे.

समाजवादी राजकारण जवळून अनुभवतानाच कुठल्याही गटबाजीत खातूभाई अडकले नाहीत. मात्र जिथे शक्य तिथे अजेंडा मांडत राहिले. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील आम आदमी पक्षाचे खातूभाई मार्गदर्शक होते. राजकारणाचा गंध नसलेले अनेक तरुण नव्या आशेने त्यात उतरले होते. त्यांना दिशा देण्याचं काम खातूभाई करत होते. पक्ष आणि नेतृत्वाच्या मर्यादा माहीत असतानाही खातूभाई या तरुणांसोबत संवाद करत त्यांना नवा दृष्टिकोन देत होते. ते सगळे तरुण आजही खातूभाईंना विसरलेले नाहीत.

खातूभाईंना इतिहासापेक्षा भविष्याचा वेध घेणं अधिक आवडतं. ते त्यात रमतात. नव्या गोष्टी मांडतात. नव्या तंत्रात झपाट्याने अपग्रेडेशन होत असतं. माणसानेही अपग्रेड कसं राहावं हे खातूभाईंकडून शिकावं. थ्री डी प्रिंटरवर दहा वर्षांपासून खातूभाई लिहितायत. थ्री डी प्रिंटरने मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रात कसे बदल होणार याचा वेध घेणारे त्यांचे लेख काहींना अनाकलनीय वाटले. मात्र नव्या मीडियातल्या तरुणांनी खातूभाईंशी दोस्ती केली.

सेवा दलाला तरुणांच्या सहभागाने अधिक व्यापक करण्याचा त्यांनी कायम प्रयत्न केला. त्या काळात त्यांनी आयोजित केलेले देशभरातील तरुणांचे अंतरभारती मेळावे आजही स्मरणात आहेत. खातूभाई आजवर एकाही संघटनेचे कधी अध्यक्ष झाले नाहीत.

खातूभाईंचं आंतरराष्ट्रीय स्तरावरील काम कायम दुर्लक्षित राहिलंय. राष्ट्र सेवा दलाला इंटरनॅशनल फाल्कन मूव्हमेंटसोबत जोडून घेण्यात खातूभाईंचा पुढाकार होता. तरुणांत लोकशाहीवाद रुजवणं यासाठी फाल्कन चळवळीमार्फत प्रयत्न केले जातात. जगभरच्या तरुणांना तिथल्या शिबिरांत, परिषदांत आमंत्रित केलं जातं. सेवा दलाची अनेक मुलं या शिबिरांत सहभागी झाली होती. मात्र त्यासाठी सर्कस करावी लागली. युरोपीय देश स्वातंत्र्य आणि समतेबाबत आग्रही असतात. लोकशाही प्रक्रियेने चालणाऱ्या संघटनांनाच तिथे जोडून घेतलं जातं. पोषाखी संस्था चालत नाही. सेवा दलात दलप्रमुख हे

पद होतं. मग अध्यक्षपद निर्माण झालं. त्यासाठी घटनाबदल झाला तो खातूभाईंच्या हस्तक्षेपाने. असा सेवा दलाचा आंतरराष्ट्रीय सहभाग सुरू झाला.

'Another world is possible' असा नारा देत World Social Forumची भव्य परिषद जानेवारी २००४साली गोरेगावला भरली होती. सुमारे ७० देशांतील प्रतिनिधींसह ५ लाख लोकांचा सहभाग यांत होता. याआधी अशी परिषद झाली नव्हती आणि होणार नाही. खातूभाई WSF Indiaचे विश्वस्त होते. या आयोजनात खातूभाईंचं महत्त्व अधोरेखित झालं. खातूभाई नियमित येऊन आढावा घेऊन सूचना द्यायचे. त्यांच्यामुळे महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. पहिली म्हणजे इथला गिरणी कामगार, श्रमिक आणि लोक सहभाग या परिषदेला लाभला. दुसरं म्हणजे अति डावे आणि समाजवादी, आयटक ते एचएमकेपी पर्यंत इतर सर्व संस्थांची नीट मोट बांधण्याचं काम खातूभाईंमुळे शक्य झालं. तात्त्विक, विवेकी भूमिका घेऊन सगळे वाद ते मिटवायचे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आर्थिक खर्चावरील नियंत्रण त्यांच्या हातात होतं. इतकी भव्य परिषद पार पडली, मात्र वायफळ खर्च न होता पैसा शिल्लक राहिला. हे आश्चर्यकारक होतं. हा ताळेबंद इंटरनॅशनल कौन्सिलमध्ये आजही चर्चेचा विषय ठरत असतो, असं WSF आयोजनातील विश्वस्त मिनार पिंपळे सांगतात.

‘स्वप्नांच्या शोधात महाराष्ट्र’ (सहित प्रकाशन) या पुस्तकात खातूभाई लिहितात – स्वप्न न पाहणारी व्यक्ती किंवा समाज प्रगती करू शकत नाही. हिमालयाचं शिखर पादाक्रांत करण्याचं आणि



चंद्रावर पाऊल टाकायचंही स्वप्नच होतं. पण असं भव्यदिव्य अशक्यप्राय स्वप्न पाहिलं म्हणून ते कधीतरी प्रत्यक्षात आलं. महाराष्ट्रानेही गरिबी-कुपोषणविरहित संपन्न शेतकरी वर्ग, सर्वांना रोजगार, अन्न- वस्त्र- निवारा- शिक्षण-आरोग्य, समतेसह समृद्धी, निसर्गसंवादी जीवन, समाजाला परिपूर्णतेचं समाधान देणारा समाज निर्माण करण्याचं स्वप्न का पाहू नये??

खातूभाईंचं सगळं काम तसं दृश्य स्वरूपात नाही. पण त्यांच्यासोबत या सगळ्याची निस्सीम अनुभूती येते. ते मोठा विचार मांडतात. आपल्यालाही प्रेरणा देतात. स्वप्नं पाहतानाच ती जगायलाही मदत करतात. याचंच एक उदाहरण म्हणजे रायगडमधलं साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक!

साने गुरुजींना मातृहृदयी म्हणत 'श्यामची आई' भोवतीच त्यांची प्रतिमा मांडली गेलीय. या प्रतिमाभंजनासाठी खातूभाईंनी एक वेगळंच स्वप्न पाहिलं. १९९९ साली साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षात राष्ट्रीय स्मारक उभारण्याचा संकल्प खातूभाईंनी मांडला. या स्मारकासाठी सरकारकडे जागा, पैसे काही न मागता स्मारकाचा हा ध्यास घेत खातूभाईंनी सगळी संकल्पना मांडली. महाराष्ट्रातील शाळांतून निधी गोळा होऊ लागला. विद्यार्थी-लोक सहभागातून हे स्मारक उभं राहिलं. त्या वेळी पाच-दहा रुपयांचा निधी देणारे विद्यार्थी आता स्मारकावर येतात. त्या यादीतील आपलं नाव बायको-मुलांना दाखवताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहत असतात.

दापोलीतील साने गुरुजींच्या जन्मस्थळापासून जवळच माणगावमध्ये ३६ एकर जागेवरील हे स्मारक अनेकांगांनी मानबिन्दू ठरत आहे. विपुल लेखन करणारे धर्मचिकित्सक साने गुरुजी, जातिअंतासाठी प्राण पणाला लावणारे, शेतकरी-कामकऱ्यांचं आंदोलन टोकाला नेत यशस्वी करणारे लढवय्ये साने गुरुजी या स्मारकातून लोकांना भेटतायत. पुतळा नसलेलं, पण नवचैतन्याने सळसळणारं हे एकमेव स्मारक! कुणाचीही मालकी, वर्चस्व नसलेलं हे एकमात्र स्मारक. हे खातूभाईंचं व्हिजन!

साने गुरुजींनी बलशाली भारताचं स्वप्न पाहिलं होतं. मात्र त्यांचं एक वैशिष्ट्य होतं. स्वातंत्र्य-लढ्यापासून ते सामाजिक चळवळींपर्यंत सर्व लढे गुरुजींनी यशस्वी केले. पण प्रत्येक ठिकाणी नव्या नेतृत्वाकडे कार्यभार सोपवून गुरुजी पुढच्या लढ्यासाठी सज्ज झाले. तेच सूत्र खातूभाईंनी अंगीकारलंय. अमर्याद पदं भूषवत बसण्यापेक्षा नवी माणसं जोडावीत, नवा विचार समजून घ्यावा, प्रश्नांना भिडत जावं, नव्याने मांडणी करावी, नवी माध्यमं अंगीकारावीत ही त्यांची खासियत. म्हणूनच खातूभाई स्वप्न पाहणाऱ्या तरुणांचा पत्ता असतात. खातूभाईंसोबतचा सहवास म्हणजे नदीचं प्रवाहीपण, सागराची खोली, डोंगराची उंची, पहाटेचा सूर्योदय, वाहता ताजा वारा...

खातूभाईंचं मन:पूर्वक अभिनंदन!

चैतन्यदायी विचारांचा हा प्रवाह खळखळत राहो, ही मनोकामना !!!

– युवराज मोहिते

mohiteyuvraj1gmail.com/8898061430

# ‘नवनिर्माण घडवण्यासाठी अधिक पुढे जावं लागेल’ – गजानन खातू



**गजानन खातू** यांची
या निमित्ताने **मनीषा गुप्ते**
यांनी घेतलेली मुलाखत...

■ मनीषा गुप्ते : नमस्कार! खातूभाई, मला तुम्हाला असं विचारायचं आहे की, तुम्ही ज्या स्वातंत्र्योत्तर काळात सहकाराच्या चळवळीमध्ये आलात, त्या काळात एकूणच सामाजिक परिस्थिती कशी होती? म्हणजे सहकार चळवळीला ती अनुरूप होती का? ‘अपना बाजार’ सारखं तुमचं काम फार मोलाचं राहिलेलं आहे. आधी राष्ट्र सेवा दलात सहभागी झाल्यानंतर पुढे मग सहकार चळवळीत जायचं तुम्ही कसं ठरवलंत?

**गजानन खातू** : या पुरस्कारासाठी माझी निवड केल्याबद्दल मी महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका आणि सुनील देशमुख यांचे मनापासून आभार मानतो. सहकारी चळवळीकडे मी वळण्याचं कारण म्हणजे, राष्ट्र सेवा दलात असल्यापासूनच आम्ही परिवर्तनाचा विचार, नव्या समाजरचनेचा विचार यांविषयी चर्चा करत असू. त्यामुळे कामगार चळवळीत जायचं किंवा सहकार चळवळीत जायचं असं शिक्षण घेत असतानाच मी मनाशी ठरवलेलं होतं. सन १९६८मध्ये मी शिक्षण पूर्ण केलं. त्यात कामगार कायद्याविषयीचा विशेष अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मी नोकरीला लागलो. त्या सुमारासच नायगांवमधले कामगार आणि समाजवादी कार्यकर्ते ‘अपना बाजार’ची उभारणी करत होते. त्या

वेळेला माझ्यासारख्या सुशिक्षित माणसांना या मोठ्या प्रकल्पात सहभागी करण्याचं आवाहन त्यांनी केलेलं होतं. त्याला प्रतिसाद म्हणून मी एका खाजगी कारखान्यातली नोकरी सोडून या चळवळीमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये 'समाजाने काहीतरी करायला पाहिजे', 'हा देश आपल्याला घडवायचा आहे' अशी एक सार्वत्रिक भावना होती. त्यामुळेच त्या काळामध्ये अनेक प्रकारच्या चळवळी निर्माण झालेल्या आपल्याला दिसतात. तशीच कामगार चळवळही त्या वेळी कृतिशील होती. ही नुसतीच मागण्यांची चळवळ नव्हती, तर नवं घडवण्याचीही चळवळ होती. किंबहुना 'अपना बाजार'च्या स्थापनेमागची प्रेरणा ही त्या काळच्या कामगार चळवळीतच होती. 'अशोक मेहता, हमारा नेता' अशी तेव्हा नायगावमध्ये घोषणा लोकप्रिय होती. अशोक मेहतांनी सांगितलं होतं की, कामगारांना जसं उत्पन्न वाढवून दिलं पाहिजे, तसं त्या उत्पन्नाचं संरक्षणही केलं पाहिजे. त्यांच्यासाठी ग्राहक संस्था उभी केली पाहिजे. त्यांच्याच प्रेरणेने जनता केंद्रासारखी वास्तू ताडदेवमध्ये उभी राहिली. आपण जी तत्त्वं मानतो त्याच्यासाठी ही योग्य गोष्ट आहे असं मला वाटत होतं. त्याच्यातूनच मी या चळवळीची निवड केली.

दुसरा भाग असा होता की, माझा पहिल्यापासून कामगारजीवनाशी संबंध आलेला होता. मी एका कुंभारवाड्यात लहानाचा मोठा झालो. तिथं आजूबाजूला सर्व कामगारच होते. (त्यांवर 'कष्टकऱ्यांचा कुंभारवाडा' असा एक स्वतंत्र लेख मी लिहिला आहे.) त्यामुळे त्यांच्याबद्दल माझ्या मनात सुरुवातीपासूनच एक जवळीक होती. मी त्या वेळेला क्रॉम्प्टन कंपनीच्या पर्सोनल विभागामध्ये नोकरी करत होतो. कामगार आंदोलनं कशी चिरडली जातात हे मी तिथं मॅनेजमेंटच्या बाजूनं पाहत असे. त्यामुळं मला मनातून या चळवळीबाबत चिंता वाटू लागली होती.

तिसरं म्हणजे, 'कामगारांचं स्वत:चं एक शहाणपण आहे' असं माझ्या लक्षात आलं होतं. सहसा 'कष्टकरी लोकांना समज कमी असते', असं आपण ढोबळमानानं समजतो. मी मात्र माझ्या जीवनामध्ये सगळ्यात मोठं योगदान अशा कामगारांचंच मानतो. आमच्या चाळीमध्ये रामायण, महाभारत या ग्रंथांचं निरूपण तिथं राहणारे कामगारच करायचे. आजूबाजूच्या अशा सगळ्या घटकांमुळे मी 'अपना बाजार'च्या सहकार चळवळीकडे वळलो.

त्यानंतरच्या काळात या चळवळीचा आवाका किती मोठा आहे, हे माझ्या लक्षात आलं. 'अपना बाजार' म्हणजे काही केवळ एक दुकान चालवणं नव्हतं, तर तो परिवर्तनाचा एक मोठा प्रयत्न होता. 'अपना बाजार'मध्ये काम करायला आलेली सगळी मुलं ग्रामीण भागातून आलेली होती. त्यांतली बहुतांश किंवा जवळजवळ सगळीच ही मुलं ओबीसी, दलित समाजांतील होती. या समाजामध्ये व्यापार, अर्थव्यवहार यांची मुळात परंपराच नव्हती. सुरुवातीला आम्ही १,००० मुलं कामाला घेतली. पुढं आमच्याकडे जवळजवळ १,५०० लोकं कामाला होती. जो व्यवसाय त्यांच्या आधीच्या पिढ्यांनी कधी केला नाही, त्या व्यवसायामध्ये समाजाच्या दुर्बल घटकांमधले हे लोक आले. त्या काळात वर्षाला ५० लाख, १ कोटीची उलाढाल करणारे आमच्या दुकानाचे मॅनेजर हे केवळ दहावी शिकलेले होते. अशा सामाजिक परिवर्तनाकडे आपलं लक्ष जात नाही. म्हणजेच सहकारी साखर कारखान्यांचं नेतृत्व ज्या समाजगटाने केलं, त्यांनी कधी व्यापार केलेला नव्हता. मात्र ते उद्योजक झाले. त्यांचं ज्ञानदेखील त्या पातळीवरचं आहे असं आपल्या लक्षात येईल.

आता मात्र ग्राहक चळवळीचा संदर्भ बदलला आहे असं आपल्या लक्षात येईल. ग्राहक चळवळीची सुरुवात ही अपुरा पुरवठा आणि महागाई या पार्श्वभूमीवर झाली होती. त्याउलट आता गोष्टींचा पुरवठाही भरपूर आहे आणि आपली क्रयशक्तीदेखील वाढली आहे. त्यामुळे आता या चळवळीची पूर्वीची भूमिका राहिलेली नाही. नाण्याची ही दुसरी बाजू मात्र आपण लक्षात घेत नाही. माझं वैयक्तिक मत असं की, नवीन आर्थिक धोरण येईपर्यंत नंतरच्या काळामध्ये कामगार चळवळ, ग्राहक चळवळ किंवा इतर आपल्या काळातील आंदोलनं ही हळूहळू कमी होत गेली, याचं कारण त्यांना जो सामाजिक आश्रय लागतो तो कमी कमी होत गेला.

सहकार चळवळींबाबत बोलायचं, तर या चळवळींकडे आपण 'अर्थव्यवस्थेचं क्षेत्र' म्हणून कधी बघितलेलं नाही. मला आश्चर्य वाटतं की, अशी मांडणी माझ्या वाचनामध्ये आजवर कुठेही आलेली नाही. या विषयावर आजवरची सर्वांत महत्त्वाची मांडणी ही धनंजयराव गाडगीळ यांनी केलेली आहे. पण त्यातही हा 'अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रा'बाबतचा मुद्दा आलेला नाही. अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून सहकाराचा आकृतिबंध महत्त्वाचा आहे, या नजरेनं आपण सहकार चळवळीकडे पाहिलं पाहिजे असं मला वाटतं.

यातला शेवटचा मुद्दा सांगायचा, तर 'भांडवलाचं स्वरूप' हा आज जागतिक पातळीवर एक वादग्रस्त मुद्दा आहे. थॉमस पिकेटीने हा मुद्दा पुढे आणला आहे. आज खाजगी भांडवल आणि सार्वजनिक भांडवल यांचं स्वरूप एकच झाल्याचं आपल्याला दिसतं. सहकारी भांडवल हे एकमेव असं भांडवल आहे की, ज्याचं स्वरूप या दोहोंपेक्षा भिन्न आहे. ते नफ्यावर आधारित नसल्यामुळे त्याची निर्मिती नफेबाजीमधून होत नाही. त्याच्या अर्थव्यवहारातून ज्या प्रत्यक्ष मालमत्ता निर्माण होतात, त्यांच्यातूनच नवी भांडवलनिर्मिती होते. आज पश्चिम महाराष्ट्राचं जे समृद्ध चित्र आपल्याला दिसतं, ते केवळ साखर कारखान्यांमुळे निर्माण झालेलं नाही. तो सहकारातून तयार झालेल्या मालमत्तांचा परिणाम आहे, असं आपल्याला निश्चितच म्हणता येईल. मात्र आज दलित समाजाकडे मालमत्ता नाहीत हा महत्त्वाचा मुद्दा आहे. मालमत्ता आणि उत्पन्न यांच्याशी संबंधित असमानता यांचा एक धागा आपण सहकार चळवळीला जोडू शकतो.

■ मनीषा गुप्ते : मला वाटतं की, सध्या संपूर्ण जागतिक राजकारण हे आता नवउदारमतवादी झालेलं आहे. एकूणच सगळ्या जगाचा कल हा उजव्या बाजूला झुकलेला असल्यानं मन कधी कधी विषण्ण होतं. सध्या सर्वत्र गरीबविरोधी, दलितविरोधी, अल्पसंख्यविरोधी, महिलाविरोधी वातावरण दिसून येतं आहे. अशा परिस्थितीत तुमच्यासारखे लोक कायमच आमच्यासाठी आशेचा किरण असतात. तुम्ही आधी सहकार चळवळीचा उल्लेख केलात. याखेरीज मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर, एन्रॉन, नर्मदा बचाव आंदोलन यांविषयीदेखील तुम्ही थोडं सांगावं. शिवाय वर्ड सोशल फोरमचे आर्थिक व्यवहारही तुमच्या मिल मजदूर सभेकडे होते. म्हणजे एका बाजूला स्थानिक पातळीवरचं काम, आंदोलनं आणि दुसरीकडे इंटरनॅशनल फाल्कन मूव्हमेंटसारख्या आंतरराष्ट्रीय चळवळी, या सर्वांचा पस्परसंबंध कसा जुळला? सहकाराच्या स्थानिक चळवळीत कार्यरत राहून तुम्हाला हे कसं जमलं, याबद्दल जाणून घेणं आमच्याकरता नक्कीच प्रेरणादायी ठरेल. याविषयी तुम्ही काय सांगाल?

**गजानन खातू** : मी 'अपना बाजार'मध्ये काम करत असलो आणि सहकार चळवळीशी माझा संबंध असला, तरी महाराष्ट्रातल्या अन्य सर्व आंदोलनांशी माझा कायमच संबंध राहिलेला आहे. कामामध्ये शिस्त आणि वक्तशीरपणा असल्यामुळे 'अपना बाजार'मधलं काम सहा वाजता संपवून मी गिरगावातल्या सेवा दलाच्या ऑफिसमध्ये जायचो. 'अपना बाजार' आणि विषमतानिर्मूलन चळवळ यांमुळे अनेक कार्यकर्त्यांशी माझा व्यापक संबंध आला. नामांतर आंदोलनामुळे मला तुरुंगात राहायची पहिली संधी मिळाली. नाहीतर आमच्या पिढीला ती संधीच नव्हती. त्यानंतर आमच्या गिरणी कामगार आंदोलनामध्ये तुरुंगात गेलो. तर अशा प्रकारे त्या सगळ्या आंदोलनाशी मी संबंधित राहिलो. हे सर्व एका कालखंडात घडलं.

आपल्याकडे शेतीप्रधान समाजातून औद्योगिक समाज निर्माण झाला होता. त्यानंतर आधुनिक कालखंड सुरू झाला. आता जागतिकीकरणानंतर तो आधुनिक कालखंडही संपून आपण त्याच्या पुढच्या टप्प्यावर गेलो आहोत. मात्र याचं भान आपल्या चळवळीत सुटलेलं दिसतं. तुम्ही म्हणालात की, देशात सगळीकडं उजवे लोक पुढे आल्यामुळे उदासीनता येते, विषण्णता येते. पूर्वी या देशात काहीच घडलं नाही, आम्हीच काय ते घडवतो, असं हल्ली उजवे लोक जोरानं सांगत आहेत, त्याचं कारण काय? याचं कारण, आम्ही परिवर्तनवादी लोकच आपल्या देशात, इथल्या अर्थव्यवस्थेमध्ये चांगलं काहीच घडलंच नाही, अशी मांडणी आजवर करत आलो आहोत. मला असं वाटतं, इथंच आमची गडबड झाली. विशेषत: आमचं आर्थिक प्रश्नांचं आकलन त्यामानाने खूप कमी पडलं. उजवी विचारसरणी नसणाऱ्या लोकांमधे ही कमतरता आहे असं मला जाणवतं. म्हणजे आजही आपल्या चळवळीतले आघाडीवर असणारे लोक जे बोलतात, ते केवळ शाब्दिक अवडंबर असतं. ते अजूनही 'स्मॉल इज ब्यूटीफुल' या धर्तीचं बोलत असतात. आजही ते गांधीजींच्या काळामध्ये अस्तित्वात असणाऱ्या अर्थव्यवस्थेची परिभाषा बोलतात. यावर चिंतन करण्याची गरज आहे, असं मला वाटतं. याचं कारण म्हणजे आपला दृष्टिकोन आणि आपली विश्लेषण करण्याची साधनं आहेत, ती अजूनही औद्योगिक समाजातली आहेत किंवा त्यामागच्या काळातल्या कृषिप्रधान समाजातली आहेत, हेच आपण लक्षात घेत नाही. म्हणजे आपलं सामाजिक भान पुष्कळसं कृषिप्रधान समाजातलं आहे आणि आर्थिक भान हे औद्योगिक समाजातलं आहे. पण वर्तमानात आता तो औद्योगिक समाज आणि ती कृषिप्रधान व्यवस्था राहिलेली नाही. आता आपण सेवा क्षेत्र आणि आर्थिक क्षेत्र यांचा प्रभाव असणाऱ्या कालखंडात जगतो आहोत. आता आपल्याला मागे फिरता येणार नाही. मग आपण आपली विश्लेषणाची साधनं कालानुरूप बदलली पाहिजेत. म्हणजे मघाशी मी असमानतेचा जो उल्लेख केला होता, त्याचं मूळ उत्पन्नाशी संबंधित आहे, का संपत्तीशी संबंधित आहे, या नवीन दृष्टिकोनातून याचा विचार व्हायला हवा. अशीच इतरही अनेक गोष्टींबाबतच्या आपल्या दृष्टिकोनांबाबत आपण नीट भूमिका न घेतल्यामुळे आपली पीछेहाट होते. उदाहरणार्थ, या सर्व काळामध्ये आपल्याला हिंदू समाजाबद्दल नीटशी भूमिकाच घेता आलेली नाही, असं माझं मत आहे. याबाबत भा.ल. भोळे यांनी उत्तम प्रकारे मांडणी केलेली आहे. पण दुर्दैव असं की, आमच्या 'विचारवेध'ची दहा संमेलनं होऊनही त्यांतून जे काही मांडलं गेलं त्याचं तात्पर्य काय? मग आपण बोलून काय फायदा आहे? याचा अर्थ इथल्या उजव्या शक्तींसाठी आपणच एक जागा तयार केली, असाच होत नाही का?

दुसरं म्हणजे पक्षाकडून रस्त्यावर होणारी आंदोलनं हळूहळू बंद झाली. ही निर्माण झालेली पोकळी एनजीओज्‌नी भरून काढली. आम्ही मात्र एनजीओबद्दलसुद्धा दुरावा असलेली आणि टीकेची भूमिका कायम घेतली. म्हणजे एकीकडे पक्ष स्वत: काही करत नाही आणि त्याला एनजीओज्ही नको आहेत. अशा वेळेला आपल्याला असं दिसतं की, लोकांना एकमेव कार्यक्रम मिळाला - तो म्हणजे मागण्या करण्याचा. स्वतंत्र समाजामध्ये समाजाची असणारी शक्ती होती, ती आपण एकेका मागणीच्या रूपाने शासनाला अर्पण करून टाकली. परिणामी समाज दुर्बल झाला आणि शासन सबळ झालं. म्हणून मला असं वाटतं की, नवीन मांडणी आपण एका नव्या दृष्टीने बघायला हवी. इथं रघुराम राजन यांच्या 'द थर्ड पिलर' या पुस्तकाचा मला उल्लेख करावासा वाटतो. त्याच्यामध्ये त्यांनी 'सोसायटी स्टेट इन मार्केट' या विषयावर फार सुंदर मांडणी केली आहे. समाजानं आपले हक्क पुनर्स्थापित केले पाहिजेत, असं राजन यांचं म्हणणं आहे. अनेक कामं आम्ही स्वत: केली पाहिजेत.

एक उदाहरण देतो. आम्ही साने गुरुजींचं राजकीय स्मारक उभं करायचं ठरवलं होतं. तेव्हा मी असं म्हटलं, ''आपण हे पाच कोटी रुपयांचं स्मारक उभारतो आहोत. पण यासाठी शासनाकडे पैसे मागायचे नाहीत. आपण हे स्वबळावर उभं करायचं.'' आम्ही त्यासाठीचे पहिले पंचवीस लाख रुपये शाळा-शाळांतून गोळा केले. जमीन घेतली. त्याच्या उद्घाटनाला तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आले होते. तिथली छत्तीस एकर जमीन, भव्य स्मारक पाहून ते चक्रावूनच गेले. सरकारकडून एकही पैसा मदत न घेता आम्ही स्मारक उभारू शकलो याचं त्यांना खूप आश्चर्य वाटत होतं. मग पुढं सरकारनंच आपणहून आम्हाला काही निधी दिला. तेव्हा मला वाटलं की, ही संघटनात्मक ताकद आपल्या लोकांमध्ये आहे. पण ती ताकद आपण वाया घालवल्यामुळे सार्वत्रिक निराशा पसरते. वैयक्तिकरीत्या मला स्वत:ला अशी निराशा कधीही वाटत नाही. याच्यातून नवीन मार्ग आपल्याला काढता येऊ शकतो, अशी मला मनोमन खात्री असते.

■ मनीषा गुप्ते : आजवर तुम्ही खूपच वैचारिक खाद्य पुरवलेलं आहे. या अनुषंगाने खूप विषय मला दिसताहेत. त्यावर आपण नंतर बोलतच राहू. पण मला सांगा की, याच्याही पलीकडे काही राहून गेलं आहे का? एकूणच आज आपल्या महाराष्ट्रातल्या, भारतातल्या किंवा अमेरिकेमध्येसुद्धा स्थायिक झालेल्या पुरोगामी मराठी लोकांना तुम्हाला काही सांगावंसं वाटतं का?

**गजानन खातू** : मला असं वाटतं की, आज आपण काहीतरी नवं करायला पाहिजे. गेल्या वीस वर्षांमध्ये आपण कार्यकर्त्यांचं एकही नवीन जाळं उभं केलेलं नाही, असं माझं निरीक्षण आहे. समाजाला वाटतं - काहीतरी घडलं पाहिजे. पण ते घडणार कुठे? नवं घडवण्यासाठी तळागाळापर्यंत काहीतरी बांधणी पाहिजे ना? त्याच्याकडे आपलं दुर्लक्ष झालं आहे. आपण गांधीजींशी संबंधित सर्व कार्यक्रम 'साजरे' केले खरे, पण प्रत्यक्षात कुठलाही कृती-कार्यक्रम मात्र हाती घेतला नाही. असं करून चालणार नाही.

आज काय करण्यासारखं आहे असं जर मला कोणी विचारलं, तर मी म्हणेन, आज 'पर्यावरण समाज' यासारखी कल्पना पुढे आली पाहिजे. पर्यावरणाच्या प्रश्नावर नुसतं बोलून फायदा नाही. आजचा तरुण वर्ग पर्यावरणाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात सजग होतो आहे. आपण जर पर्यावरणाचे वेगवेगळे

प्रश्न नुसतेच न मांडता त्याकडे एक जीवनव्यवस्था, नवी जीवनशैली म्हणून बघायला लागलो, तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतील. पर्यावरणप्रेमींची जीवनशैली ही भविष्यातल्या समाजवादाची नवीन मांडणी असेल, असं माझं मत आहे. आपल्याला अशा प्रकारचे नवीन उपक्रम करणं शक्य आहे. तंत्रज्ञानाबद्दलही आपण नवीन विचार केला पाहिजे.

विवेक सावंतांनीही तंत्रज्ञान आणि नवीन रोजगार कसा उभा राहणार आहे याबद्दल फार चांगली मांडणी केली आहे. आपण त्या धर्तीवरची सकारात्मक मांडणी केली पाहिजे. नवीन घडण्याच्या ज्यांत शक्यता आहेत, त्या वाटा आपण शोधल्या पाहिजेत. आपण याबद्दलचा नीट विचार करू, तेव्हाच नवीन पिढी आपलं ऐकायला लागेल. हल्ली थ्रीडी प्रिंटर्सच्या तंत्रज्ञानाचा वापर करून हॉस्पिटलमधल्या रुग्णांना कृत्रिम अवयव बसवले जाता येणं शक्य झालं आहे, असं माझ्या वाचनात आलं. अशाच प्रकारे कोरोनानंतर अनेक कामांमध्ये जर सोशल डिस्टन्सिंग ठेवावं लागणार असेल, तर मग रोबोटिक्सचा अधिकाधिक वापर होणं अपरिहार्यच नाही का?

दुसऱ्या बाबतीत माझं म्हणणं असं आहे की, ग्रामीण भागात शेतीच्या प्रश्नावर खूप मोठं आंदोलन चाललेलं आहे. पण आजवर शेतीच्या प्रश्नासंदर्भात नेहमी केवळ शेतीच्या उत्पन्नाबाबतचीच चर्चा झाली, शेतकऱ्याबाबत ती कधी झालेली नाही. मी याबद्दल पूर्वीपासून माझे विचार मांडत आलेलो आहे. शेतकऱ्याला घरटी शेतीबाह्य उत्पन्नाचं साधन देणं आज अतिशय महत्त्वाचं आहे. हे घडलं, तरच ग्रामीण भागामध्ये नवीन काही घडेल. गांधीजींनी गावाला जे विकासाचं केंद्र मानलं होतं, त्याऐवजी मी तालुका हा विकासाचा एकक म्हणून मानतो. तालुका पातळीवर जर 'नॉन फार्मिंग इन्कम' मिळायला सुरुवात झाली, तर मग शेती आणि ग्रामीण विभाग असे दोन्हीही विकसित होतील. त्यातून एक नवीन दिशा आपल्याला सापडेल. आजचं शासन उजव्या विचारांचं आहे. त्यामुळे दुर्दैवाने या टप्प्यातून आपण जातो आहोत. पण फक्त सरकार बदलल्याने याचं उत्तर मिळणार नाही. आज ज्या प्रकारचा शेतकऱ्यांचा उठाव आहे, त्यानं कदाचित सरकार बदलेलही, पण तितकंच पुरेसं नाही. आपण जे नवनिर्माण घडवायचं आहे त्यासाठी त्याहूनही अधिक पुढे जावं लागेल.

ggkhatu@gmail.com/9892821056

---

** व्हीडिओ मुलाखतीचं शब्दरूप :*
*सुश्रुत कुलकर्णी / sushrutkulkarni@gmail.com/9822522475*

# 'पाकड्या' जतीन!

समाजकार्य
विशेष कृतज्ञता पुरस्कार
**जतीन देसाई**



'चुकला जतीन, प्रेस क्लबमध्ये' अशी एक म्हण आहे.

'चुकला फकीर मशिदीमध्ये' ही म्हण बहुधा त्यावरूनच घेतली असावी! अर्थात, मनाने, बोलण्याने तसंच वागण्यानेही खरोखरच 'फकीर' असलेला जतीन प्रेस क्लबमध्ये सापडला नाही, तर त्यास कुठं शोधायचं?

तर जतीन हा क्लबमध्ये नसला तर ग्रॅण्ट रोडच्या त्या सुप्रसिद्ध 'शांताश्रमा'त सापडणार किंवा हुतात्मा चौकातील त्या आता आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या किताबखान्यात!

आणि यांपैकी कुठंही तुम्ही गेलात तरी तुम्हाला जतीनला ओळखायला फार काही तोशीश पडणार नाही. अर्थात, त्यासाठी तुम्ही तो सुप्रसिद्ध 'सिंहासन' हा सिनेमा बघितलेला हवा. त्या सिनेमात दिगू टिपणीस नावाचा एक रिपोर्टर असतो. निळू फुले या अष्टपैलू अभिनेत्याने ती भूमिका अजरामर करून सोडलेली आहे. तर जतीन हा आजच्या युगातही परिवर्तनाची स्वप्नं-बिप्नं बघणारा दिगू टिपणीसच आहे. जीन पॅण्ट, गुडघ्याच्या खाली जाणारा झब्बा-कुडता, चांगल्यापैकी वाढलेले केस आणि डोळ्याला आपल्या बहुश्रुततेची झलक दाखवणारा चष्मा अशा अवतारातील जतीन तुम्हाला नक्कीच तुमची ओळख-पाळख नसली, तरीही ओळखू येणार म्हणजे येणारच.

तर हा 'जतीन' म्हणजे जतीन देसाई.

खरं तर जतीनने आता वयाची साठी ओलांडली आहे. त्यामुळे त्याला किमान जतीनभाई असं तरी म्हणायला हवं. पण तो सर्वांचा जतीनच आहे. या मुंबईत कुठेही, कोणावरही काही अन्याय घडला वा घडून गेलेल्या अन्याय-अत्याचाराविरोधात निदर्शनं, धरणं, मोर्चा असू द्यात, तिथं जतीन

असणार म्हणजे असणारच. कारण जतीनचं अवघं आयुष्यच असं अन्यायाविरोधात लढण्यात गेलं आहे आणि नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर देशात जी काही 'पोलरायझेशन'ची खेळी जाणीवपूर्वक अमलात आणली गेली, तेव्हापासून तर जतीनची ही लढाऊ प्रवृत्ती अधिकच ठळकपणे सामोरी येऊ लागली आहे.

एका सर्वसामान्य गुजराती कुटुंबातून आलेल्या जतीनवर हे लढाऊ बाण्याचे आणि तेही गांधीवादाच्या अहिंसक लढाऊ बाण्याचे संस्कार नेमके झाले तरी कसे? तर जतीनची आईच त्या काळात गांधीवादाने प्रभावित झालेली होती आणि ती स्वातंत्र्याच्या आंदोलनातील प्रभातफेऱ्यांमध्ये त्या तरुण वयात सहभागीही होत असे. देसाई कुटुंबच अगदी साधंसिधं मध्यमवर्गीय कुटुंब होतं. जतीनचं पहिली ते चौथी असं शिक्षणही मुंबई महापालिकेच्या शाळेत झालं होतं. पुढे जतीन सोमैया महाविद्यालयात गेला आणि तिथे राष्ट्रीय सेवा योजना म्हणजेच 'एनएसएस' या उपक्रमाशी जोडला गेला. त्या महाविद्यालयातील 'एनएसएस'चं युनिट हे डहाणू-घोलवड परिसरातील आदिवासींसाठी काही काम करत असे. त्यामुळे जतीनच्या या भागातील फेऱ्या वाढल्या. त्या भागात त्यापूर्वीच गोदावरीबाई परुळेकर यांच्यामुळे डाव्या विचारांचं वारं फैलावलं होतं आणि जतीनच्या वैचारिक तसंच मानसिक जडणघडणीला अगदी पोषक असंच ते पर्यावरण होतं. त्यानंतर जतीनने अनेक महिने त्या भागातच राहणं पसंत केलं. तळागाळातील, समाजाच्या शेवटच्या पातळीवरील माणसाशी जतीनची नाळ त्याआधीच आईवरच्या गांधीवादाच्या प्रभावामुळे जुडलेली होतीच. डहाणू-घोलवड परिसरात केलेल्या 'एनएसए'च्या कामांमुळे ते नातं अधिक घनिष्ट झालं होतं.

अर्थात, १९७०चं ते अस्वस्थ दशक कोणत्याही संवेदनशील तरुणाला विचार करायला लावणारं जसं होतं, त्याचबरोबर प्रवाहाबाहेर जाऊन काही तरी वेगळं करायची उमेद देणारंही होतं. त्याच दशकात कुमार शिराळकर यांच्या नेतृत्वाखाली काही उच्चविद्याविभूषित युवक थेट धुळे जिल्ह्यातील शहादा परिसरात आपलं सुखवस्तू आयुष्य वाऱ्यावर सोडून राहायला गेले होते. त्या भागातील आदिवासींना नवा प्रकाश, नवं जग दाखवण्याची ईर्षा या तरुणांच्या मनात होती. त्याच वेळी इकडे राज्याच्या तुलनेने विकसित भागात मेडिकल कॉलेजच्या देणगी प्रवेशाच्या मुद्द्यावरून काही तरुण आंदोलन उभं करू पाहत होते. त्यात कुमार सप्तर्षी, अरुण लिमये, अनिल अवचट प्रभृतींचा पुढाकार होता. नेमक्या त्याच सुमारास गुजरातेतील भ्रष्ट राजवटीच्या विरोधात नवनिर्माण आंदोलन सुरू झालं होतं. जतीन हे सारं बघत होता आणि या पार्श्वभूमीवर त्याने एम. ए. करायचं ठरवलं. मुंबई विद्यापीठात तेव्हा एका वेगळ्याच पद्धतीने एम. ए. करण्याची सोय होती आणि त्या योजनेचं नाव होतं : कंकरन्ट स्टडीज ॲण्ड सर्व्हिस प्रोजेक्ट. याचा अर्थ तुम्ही एखाद्या विशिष्ट क्षेत्रात सामाजिक कामही करत राहायचं आणि ते काम हेच तुमच्या परीक्षेचा एक भाग समजलं जायचं. जतीनसारख्या चळवळ्या आणि धडपड्या मुलांसाठी ती एक मोठीच सोय होती. जतीनने अर्थातच तोच डहाणू-घोलवड परिसर आपल्या प्रोजेक्टसाठी निवडला. त्या आदिवासी भागात मग जतीन सहा महिने राहत होता, पण एकाच वेळी अनेक विषयांमध्ये लक्ष घालण्याच्या प्रवृत्तीमुळे जतीनचं एम. ए. ला प्रत्यक्ष प्रवेश घेणंच राहून गेलं. आश्चर्याची बाब म्हणजे त्यास कारणीभूत होते जतीनच्या जीवनात अत्यंत आदराचं स्थान असलेले लोकनायक जयप्रकाश नारायण!

तेव्हा जयप्रकाशांच्या विचारांनी प्रेरित होऊन काही तरुणांनी 'छात्र युवा संघर्ष वाहिनी'ची स्थापना केली होती. जतीन त्या वाहिनीचा सैनिक झाला, यात नवल ते काहीच नव्हतं. पण जतीनने ती जबाबदारी पूर्णवेळ कार्यकर्ता, म्हणजेच 'फुलटायमर' म्हणून स्वीकारली. तेव्हा फुलटायमरला काही मानधन वगैरे सोडाच, साधा प्रवासखर्चही देण्याचा रिवाज नव्हता. कार्यकर्त्यांनीच संघटनेसाठी पैसे जमा करायचे आणि त्यातून प्रवास आणि अन्य खर्च भागवायचा अशी पद्धत होती. अगदी वाहिनीच्या बैठकीसाठी पाटण्याला जायचं असेल, तरी पैसे जतीनलाच गोळा करावे लागत असत. या प्रकाराने कोणीही कंटाळून जाणं साहजिकच होतं. तरीही जतीन जोमाने काम करत होता. तो आता तलासरी भागात काम करू लागला होता. डोळ्यापुढे संपूर्ण क्रांतीची स्वप्नं होती आणि ओठावर गीत होतं : जयप्रकाश का बिगुल बजा तो; जाग उठी तरुणाई हैं..

पण जनता सरकार कोसळलं.. मग जनता पक्षही फुटला आणि क्रांतीची स्वप्नंही बघता बघता दूरदेशी उडून गेली.

आता टीचभर पोटाची खळगी भागवण्यासाठी काही तरी करायला हवं, असा साक्षात्कार अखेर जतीनला झाला आणि त्यानं 'संघर्ष वाहिनी'ला रामराम ठोकून नोकरी करण्याचा निर्णय घेतला.

स्वयंसेवी संघटनांमधून सामाजिक काम करणाऱ्यांना नोकरी एकच करता येणं शक्य असे आणि ती नोकरी पत्रकारितेची असे! अखेर रमेश ओझा या 'संघर्ष वाहिनी'च्याच एका कार्यकर्त्याच्या ओळखीने जतीन वार्ताहर म्हणून 'गुजरात समाचार'मध्ये रुजू झाला. ते साल होतं १९८५. एका अर्थाने हाच जतीनच्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट' म्हणावा लागेल. 'गुजरात समाचार'मध्ये वर्ष-सव्वा वर्ष काढून तो 'जन्मभूमी'मध्ये दाखल झाला. मात्र तिथेही त्याची कार्यकर्तागिरी सुरूच होती.



खरं तर ते दिवस पत्रकारांसाठी सुगीचे म्हणावेत, असेच दिवस होते. संपादक तसंच पत्रकार यांना त्या काळात पूर्ण स्वातंत्र्य होतं. तरीही पत्रकारांनी उठून रस्त्यावर यावं, अशा घटना घडतच. त्याच काळात मग पत्रकारांच्या 'न्याय्य' हक्कांसाठी लढणाऱ्या 'बॉम्बे युनियन ऑफ जर्नालिस्ट' या संघटनेत काम करणं आणि पुढे त्या संघटनेचं चार वर्षं अध्यक्ष राहणं, हा जतीनच्या स्वभावाचाच एक भाग होता. 'जन्मभूमी'त दहा वर्षं झाली आणि तेव्हा खलीद अन्सारी यांनी 'गुजराती मिड-डे' लाँच केला. तेव्हा मग जतीनला बोलावण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्यायच, त्याने आपल्या तटस्थ आणि त्याच वेळी सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून केलेल्या बातमीदारीमुळे, उरला नव्हता. जवळपास एक तप त्याने 'गुजराती मिड-डे' मध्ये विविध पदांवर काम केलं.

मात्र, तोपावेतो जतीनचा 'पाकड्या जतीन' व्हायचा होता!

ती तर एक फारच मोठी कहाणी आहे.

आज तुम्ही-आम्ही जतीनला वेगवेगळ्या चॅनेलवर बोलताना बघतो. त्याचे वेगवेगळ्या वृत्तपत्रांतील आणि वेबसाइटवरचे लेख वाचत असतो. त्यातून त्याचा कायम पाकिस्तानविषयीचा सामंजस्याचा तसंच सहानुभूतीचा सूर प्रगट होत असतो. जतीनच्या पाकवाऱ्यांविषयी तर अनेक दंतकथा सर्वत्र पसरलेल्या आहेत. मुस्लिमांविषयी तर जतीनच्या मनात एक ओलाव्याचा धागाच आहे. त्यामुळेच अगदी अलीकडल्या काळापर्यंत जतीनची संभावना काही वेळा एका विशिष्ट वर्तमानपत्रांतून तसेच काही कुत्सित जनांकडून 'पाकड्या जतीन' अशी केली जाते.. आणि सोशल मीडियावर त्याला ट्रोलिंगही भरपूर होतं. तर हा असा जतीन पाकिस्तानला पहिल्यांदा गेला तरी कधी?

सन २००१च्या आसपास नागपूरला 'पाकिस्तान इण्डिया फोरम फॉर पीस अ‍ॅण्ड डेमोक्रसी' या संस्थेची एक बैठक होती. तिथं त्याला माधव साठे हा त्याचा समाजवादी मित्र घेऊन गेला. तिथंच त्याची गाठ विजया चौहान, नीरा आडारकर आदींशी पडली.

हा जतीनच्या आयुष्यातील सर्वांत मोठा टर्निंग पॉइंट.

त्यांच्या संपर्कातूनच २००३मध्ये जतीन पहिल्यांदा पाकिस्तानला गेला. तेव्हा भारत-पाकिस्तान अशी थेट विमानसेवाही नव्हती. त्यामुळे जतीन दिल्लीहून दुबईला आणि दुबईतून पाकिस्तानात गेला..

पुढे जतीनच्या लक्षात आलं की, भारत-पाक संबंध सुधारायचे असतील तर केवळ दिवाणखानी गप्पांमधून काही होणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष झडझडून काम करावं लागेल आणि एकदा एखादी गोष्ट मनात घेतली की, गप्प बसेल तर तो जतीन कसला. मग त्याच्या लक्षात आलं की, सौराष्ट्राच्या किनारपट्टीवरील मच्छीमार अनवधानाने सागरी सीमा ओलांडतात आणि पाकिस्तानच्या जाळ्यात सापडून तेथील तुरुंगात खितपत पडतात. तीच गोष्ट पाक मच्छीमारांबाबतही होते. मग या मच्छीमारांच्या सुटकेसाठी जतीनने प्रयत्न सुरू केले. त्याच 'पाकिस्तान इण्डिया फोरम फॉर पीस अ‍ॅण्ड डेमोक्रसी' या संस्थेच्या भारतीय चॅप्टरचा मग तो सरचिटणीसही झाला.

या संस्थेचं मुख्य काम हे जनमत तयार करणं तर होतंच; शिवाय भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमधील सरकारांकडून काही चांगली कामं करून घेण्यासाठी दबावगट निर्माण करणं, हेही होतं आणि आहेही. या संस्थेची मच्छीमारांसंबंधातील मुख्य मागणी ही 'नो अ‍ॅरेस्ट पॉलिसी'ची असावी. हे दोन्ही देश सागरी सीमारेषा ओलांडून आपल्या हद्दीत आलेल्या मच्छीमारांना थेट अटक करून

तुरुंगात पाठवून देतात आणि मग काही महिनेच काय, तर काही वर्षं त्यांना तिथंच खितपत पडावं लागतं. त्याऐवजी अशी सीमारेषा ओलांडणाऱ्यांना त्या त्या देशांच्या सीमारक्षकांनी त्यांना आपापल्या देशांच्या हद्दीत परत पाठवून द्यावं, यासाठी जतीन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी प्रदीर्घ मेहनत घेतली. जनमत तयार करण्याबरोबरच दोन्ही देशांच्या सरकारांशी पत्रव्यवहारही केला. मात्र, अजूनही इतकी साधी गोष्ट प्रत्यक्षात येऊ शकलेली नाही. मच्छीमार अशा रीतीने पकडला गेला की, त्याच्या कुटुंबाची पुरती वाताहत होते. त्यामुळे १४-१५ ऑगस्ट २०२० या, दोन्ही देशांच्या स्वातंत्र्यदिनाचा मुहूर्त साधून त्यासाठी इम्रान खान तसंच नरेंद्र मोदी या दोन्ही पंतप्रधानांना समाजातील मान्यवरांची निवेदनं देण्यात आली. त्या कामातही जतीनचा पुढाकार होता.

आणखी एक मुद्दा. एकदा घरातला हा कमावणारा माणूस तुरुंगात जाऊन पडला की, घरातल्या मुलग्यांपेक्षा मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर येतो. कर्ता पुरुष तुरुंगात जाऊन पडला की, पहिल्यांदा मुलींच्या शाळेवर गदा येते. हा सरळ सरळ मुलींवर होणारा अन्याय आहे. त्याबाबत अशा कुटुंबियांना घराघरांत जाऊन, समजावून सांगण्याचं कामही जतीन आणि त्याचे सहकारी करत आले आहेत.

मात्र, एका महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नावर जतीन आणि त्याच्या सहकाऱ्यांनी केलेली मेहनत फळास आली आहे. एखादा मच्छिमार पकडला गेला की, त्याच्या कुटुंबास प्रतिदिन १५० म्हणजे दरमहा साडेचार हजार रुपये आपलं सरकार देत असे. ही रक्कम अगदीच तुटपुंजी होती. आता या संघटनेच्या प्रयत्नामुळे ही रक्कम दुपटीने वाढवून प्रतिदिन ३०० रुपये देण्यात येऊ लागले आहेत.

पाकिस्तानसंबंधात हे काम करताना, सार्क राष्ट्रांमधील अशाच संघटना आणि कार्यकर्ते यांच्याशी जतीनचा मैत्रभाव वाढत गेला आणि आज तो त्यासंबंधातील एक 'ऑथॉरिटी' समजला जातो.



अफगाणिस्तानातील महिला कार्यकर्त्यांशी त्याचा अनेकदा संवाद होऊ लागला. अफगाणिस्तानातील विदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतलेल्या अनेक युवती मायदेशी परतल्या आहेत. एकदा काबूल येथील एका कार्यशाळेला तो उपस्थित होता. भारत-पाक तसेच अफगाणिस्तान या तीन देशांमधील परस्पर- नातेसंबंधांबाबत तो बोलत होता. तेव्हा त्याने या युवतींना 'तुम्ही मायदेशी परतता का?' असा थेट प्रश्न विचारला. कारण अस्थिरता तसंच सुरक्षा असे दोन प्रमुख मुद्दे असतानाही या युवतींचं मायदेशाविषयीचं प्रेम कमी का झालेलं नाही, हा जतीनला कायम पडणारा प्रश्न होता. तेव्हा त्या युवतींनी दिलेलं उत्तर हे सर्वांच्याच डोळ्यांत अंजन घालणारं होतं. 'आम्हाला आमचा समाज बदलायचा आहे आणि त्यासाठी आम्ही परत आलो आहोत,' असा खणखणीत जवाब त्या युवतींनी जतीनला दिला होता.

नेपाळ या आणखी एका शेजारी देशाशीही जतीनची नाळ अशीच जुडलेली आहे. २०१५मध्ये तिथे घटनादुरुस्ती होऊ घातली होती आणि त्यात आपल्यावर अन्याय होतोय, असा तेथील मधेशी समाजाचा दावा होता. त्यामुळे या समाजाने नेपाळची आर्थिक नाकेबंदी केली होती. हे 'इकनॉमिक ब्लॉकेड' प्रदीर्घ काळ सुरू राहिलं. तेव्हा 'सहर' (साऊथ एशियन फोरम फॉर ह्युमन राइट्स) या संघटनेतर्फे त्यासंबंधात अभ्यास करून एक तपशीलवार अहवाल तयार करण्याच्या कामातही जतीनचा सहभाग होता. 'सार्क' राष्ट्रांचं सचिवालयही नेपाळमध्येच आहे. तेव्हा हा अहवाल नेपाळ सरकारबरोबरच या सचिवालयालाही सादर करण्यात आला होता आणि त्याचं कौतुकही झालं होतं.

खरं तर सौराष्ट्रात आणि विशेषत: पोरबंदर परिसरात एकदा त्याच्याबरोबर जाण्याचा योग आला तेव्हा तेथील घराघरांत 'जतीनभाई' अशी ओळख असलेल्या एका नव्याच जतीनशी गाठ पडली होती. खरं तर जतीन मासे खातदेखील नाही, तरी या किनारपट्टीवरील मच्छिमार कुटुंबियांना तो माशांइतकाच प्रिय आहे. ही आणखी एक गम्मत!

पण पुढे जतीनने आपलं काम केवळ मच्छिमारांपुरतं मर्यादित ठेवलं नाही. भानुदास कराळे असोत, की नुकताच पाक तुरुंगातून सुटून आलेला हमीद अन्सारी असो – निव्वळ गैरसमजुतीपायी पाकमध्ये अडकून पडलेल्या अनेकांच्या सुटकेसाठी दिल्लीत – मग सरकार कोणाचंही असो – जतीन खेट्या घालत असतो आणि तेही स्वत:च्या खिशाला तोशीस लावून.

त्यासाठीच त्याने २००८मध्ये 'गुजराती मिड-डे'ची नोकरीही सोडली आणि तेव्हापासून तो 'पाकड्या जतीन' झाला. त्याचे निकटचे मित्रही त्याबद्दल त्याची अनेकदा टवाळी करतात. मात्र, त्याची त्याला पर्वा नसते; कारण त्याची आपल्या कामावर आणि विचारांवर अव्यभिचारी निष्ठा आहे.

आता प्रश्न एवढाच आहे की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात खऱ्या अर्थाने सौहार्दाचे संबंध प्रस्थापित झालेले त्याला कधी तरी बघायला मिळतील का?

तसं व्हावं यासाठी त्याला त्याच्या जगभरात पसरलेल्या मित्रपरिवारातर्फे शुभेच्छा!

– प्रकाश अकोलकर
akolkar.prakash@gmail.com/ 9892727700

## ‘सत्तर वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच घडलं...’ – जतीन देसाई



भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांत असणाऱ्या शत्रुत्वामुळं अनेकदा सामान्य नागरिक भरडले जातात. चुकून सीमेपार गेलेले मच्छीमार, सामान्य नागरिक दोन्ही देशांतल्या तुरुंगात खितपत पडलेले असतात. ज्येष्ठ पत्रकार **जतीन देसाई** आणि त्यांचे सहकारी अशांना तिथून सोडवण्याचं काम करतात.
पुरस्काराच्या निमित्ताने त्यांनी केलेलं व्हीडिओवरचं भाषण.

काही गोष्टींविषयी आपले गैरसमज पक्के रूढ झालेले असतात. भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांतली परस्परसंबंध ही अशी एक गोष्ट. पाकिस्तानचा नुसता उल्लेख जरी केला, तरी बहुसंख्य लोकांच्या मनात शत्रुत्वाची भावना जागृत होते. मात्र या दोन्हीही देशांतील सामान्य माणसाची – खास करून गरीब लोकांची स्थिती एकसारखीच आहे. लहानपणापासून आपण जे ऐकत आलेलो असतो, त्यावर चटकन विश्वास बसत जातो. तेव्हापासूनच पाकबद्दल बऱ्याच समजुती आपल्या मनात निर्माण होत असतात. परंतु जेव्हा आपण प्रत्यक्ष तो देश पाहतो, तेव्हा ‘हे काहीतरी वेगळं आहे’ असं आपल्याला जाणवतं. याची काही उदाहरणं आपण पाहू.

आमचा मुंबई प्रेस क्लब आणि कराची प्रेस क्लब या दोन्ही संघटनांमध्ये एक बंधुभावाचं नातं आहे. या दोन्ही अत्यंत प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या पत्रकार संघटना आहेत. या देवाण-घेवाणीमध्ये पहिल्यांदा आम्ही मुंबईहून सुमारे १८ पत्रकारांना पाकिस्तानला कराचीला घेऊन गेलो होतो. त्यांत ‘टाइम्स’, ‘महाराष्ट्र टाइम्स’, ‘मुंबई मिरर’, ‘इकॉनॉमिकल अँड पॉलिटिकल वीकली’ अशी वर्तमानपत्रं वा नियतकालिकांमध्ये काम करणाऱ्या ६ महिला पत्रकारही होत्या. पाकिस्तानला जाण्याआधी प्रत्येकाच्याच मनात काही कल्पना होत्याच, पण त्या देशाला प्रत्यक्षात भेट देऊन पाहिल्यानंतर या साऱ्याच लोकांना त्यांच्या कल्पनेपेक्षा तिथलं वास्तव वेगळंच आहे असं प्रकर्षानं जाणवलं. मला वाटतं की, भारत-पाक या देशांतल्या सामान्य नागरिकांबद्दलच्या काही गोष्टी आपण प्रकर्षाने डोळसपणे

पाहिल्या, तर आपले बरेचसे गैरसमज दूर होतील.

मी आणि माझे सहकारी भारत आणि पाकिस्तानमधल्या कैद्यांच्या प्रश्नावर काम करतो. भारतातले बरेच नागरिक पाकिस्तानाच्या हद्दीत पकडले जातात. त्याचप्रमाणे पाकिस्तानचे बरेच कैदी भारतात असतात. या कैद्यांना सोडवणं हे खूप कठीण काम असतं. याचं एक ताजं उदाहरण देतो. मुंबईचा रहिवासी असणारा हमीद अन्सारी नावाचा एक मुलगा अनधिकृतपणे पाकिस्तानात गेला होता. त्याची गोष्ट अत्यंत चटका लावणारी आहे. पाकमध्ये संकटात सापडलेल्या आपल्या एका मैत्रिणीला त्याला मदत करायची होती.

खरंतर हमीदच्या मैत्रिणीच्या वडिलांमुळं एक मोठंच प्रकरण घडलं होतं. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सरहद्दीवर कोहाट नावाचं एक आदिवासी भागातलं गाव आहे. एके दिवशी हमीदच्या मैत्रिणीचे वडील दुपारी घरीच होते. त्या वेळी घराबाहेर काही मुलं गलका करत क्रिकेट खेळत होती. अखेर वडिलांनी त्यांतल्या एका मुलाला सांगितलं, ''ही दुपारची विश्रांतीची वेळ आहे. तुम्ही गोंधळ करू नका.'' त्या मुलानं आपल्या इतर मित्रांना तसं सांगण्याचा प्रयत्न केला, पण त्याचं बाकी कोणी ऐकलं नाही. अखेर हमीदच्या मैत्रिणीच्या वडिलांनी घरात जाऊन बंदूक आणली आणि तिथल्या तिथं एका मुलाला गोळी घातली. तो मुलगा जागीच मेला. (कोहाट या भागात बंदुका, मशिनगन्स, एके ४७ हे सगळं सर्रास उपलब्ध असतं.) तिथल्या आदिवासी समाजामध्ये 'वाणी' नावाची एक प्रथा आहे. त्या प्रथेनुसार एखाद्या घरातल्या कुणी दुसऱ्या घरातल्या व्यक्तीची हत्या केली, तर त्याचा दंड म्हणून मृताच्या घरचे लोक हत्या करणाऱ्याच्या घरातली मुलगी मागतात. ती दिली नाही, तर मात्र खुन्यावर खटला दाखल होतो आणि त्याला कायद्यानुसार शिक्षा भोगावी लागते. हमीदच्या मैत्रिणीच्या वडिलांच्या हातून हत्या झालेली होती. त्याची भरपाई म्हणून त्यांना आपल्या मुलीला म्हणजेच हमीदच्या मैत्रिणीला दुसऱ्या कुटुंबाला सोपवावं लागणार होतं. मुलीला त्या घरात 'वाणी' म्हणून दिलं असतं, तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई होणार नव्हती.

हमीद हे सारं टाळण्यासाठी पाकिस्तानला जाऊ पाहत होता. जाण्यापूर्वी तो मला तीनदा भेटला होता. पाकिस्तानला जाण्याबाबत त्याला माझी मदत हवी होती. त्याने व्हिसासाठी सगळे प्रयत्न केले, पण त्याला अखेरपर्यंत पाकिस्तानचा व्हिसा मिळाला नाही. अखेर हमीद तिला वाचवायला अफगाणिस्तानमार्गे अनधिकृतरीत्या आतमध्ये घुसून पाकिस्तानमध्ये शिरला. पुढं पाकिस्तान पोलिसांनी त्याला अटक केली. अखेर आम्ही सगळ्यांनी मिळून त्याला सोडवलं. यात पाकिस्तानच्या अनेक लोकांनी मदत केली. त्यांत रक्षंदा राझ नावाची एक महिला वकील, काझी नावाचे एक अत्यंत अनुभवी वकील (ते तिथले संसद सदस्यही होते) असे काही लोक होते. आम्ही सगळ्यांनी मिळून यासाठीचा खर्च केला. ज्या दिवशी सजा संपली, त्याच दिवशी कुठल्याही अडचणी न येता हा कैदी सुटला. भारत-पाकिस्तानच्या ७० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच असं घडलं होतं. आजपर्यंत असं कुणीच वेळेत सुटलेलं नव्हतं. नुकतंच हमीदने लिहिलेलं पुस्तकंही प्रकाशित झालेलं आहे.

आम्ही मुख्यत: मच्छीमारांच्या प्रश्नावर काम करतो. आपल्याकडे समुद्रात मासे फारसे मिळत नाहीत. आपल्याकडच्या औद्योगिक प्रदूषणामुळं निर्माण होणारा कचरा, घातक द्रव्यं आपण सरळ समुद्रात टाकतो. त्यामुळे समुद्राच्या पाण्याचं तापमान वाढतं. मग मासे त्या भागात राहत नाहीत.

पाकिस्तानमध्ये मुळात उद्योग आणि कारखाने कमी आहेत. प्रदूषण तुलनेनं कमी. त्यामुळे पाकिस्तानच्या हद्दीतल्या समुद्रात मासे जास्त प्रमाणात असतात. शिवाय सिंधू नदी आणि अरबी समुद्र ज्या ठिकाणी मिळतात, ते माशांच्या पैदाशीसाठी अगदी अनुकूल क्षेत्र आहे. त्यामुळे आपल्याकडच्या मच्छीमारांना पाकिस्तानच्या दिशेने जाण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. साहजिकच ते मोठ्या संख्येने पकडले जातात. पाकिस्तानच्या समुद्रात जास्त मासे असल्याने तिकडचे मच्छीमार मात्र तितक्या मोठ्या संख्येने भारताच्या सीमेत येत नाहीत. त्यांची संख्या कमी म्हणजे केवळ ७५ इतकीच आहे. त्याउलट आज भारतातील ३०० मच्छीमार पाकिस्तानच्या तुरुंगात आहेत. मच्छीमार वापरत असलेल्या बोटींमध्ये जीपीएस यंत्रणा असते. मच्छीमार भारतीय समुद्राच्या पलीकडे दुसऱ्या देशाच्या समुद्रात जातो, तेव्हा जीपीएसवर तसा सिग्नल मिळायला सुरुवात होते. मात्र या बोटी फारशा मोठ्या नसल्यामुळे समुद्रातला वारा किंवा पाण्याचा प्रवाह यांमुळे त्यांना तिथं नांगर टाकता येत नाही. म्हणजेच जरी मच्छीमारांना कळालं की, आपण दुसऱ्या देशाच्या पाण्यामध्ये प्रवेश करतो आहोत, तरी त्यांना बोट थांबवणं किंवा मागे वळवणं शक्यच नसतं. अखेर ते पकडले जातात. घरातला कर्ता पुरुष पकडला गेल्यामुळे मुलांचं शिक्षण थांबतं. पकडल्या गेलेल्या मच्छीमाराचं संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होतं.

शिवाय गेल्या काही वर्षांत भारतीय मच्छीमारांच्या जवळजवळ १,२०० बोटी पाकिस्तानने जप्त केलेल्या आहेत. एका बोटीची सरासरी किंमत ५० ते ६० लाख रुपये असते. याला १,२००ने



गुणल्यावर हा किती मोठा आकडा आहे, याची तुम्हाला कल्पना येईल. गुजरातमधला पोरबंदर, वेरावळ, मांगरोळ या पट्ट्यातल्या मच्छीमारांच्या जप्त सगळ्या बोटींपैकी खूप कमी बोटी परत केल्या गेलेल्या आहेत. त्या पाकिस्तानने परत कराव्यात असा आमचा आग्रह आहे. या बोटी वेळेत परत करणंही जरुरीचं आहे, कारण त्या समुद्रात राहिल्यामुळे गंजतात. आमच्या कुटुंबातला माणूस कधी सुटणार अशी पृच्छा करणारे गुजरातमधल्या मच्छीमार घरातल्या लोकांचे रोज मला फोन येत असतात. खरंतर मी त्यावर काय उत्तर देणार हे त्यांनाही माहीत असतं आणि ते काय विचारणार हे मला माहीत असतं, पण त्यांची आशा सुटत नाही.

पाकिस्तानात अटकेत असलेले मच्छीमार किंवा भारतातल्या तुरुंगात असलेले निरपराध पाकिस्तानी कैदी सोडवणं खूप कठीण काम आहे. आमच्या या सगळ्या प्रयत्नामुळे एक गोष्ट झाली. ती म्हणजे, पूर्वी कैद्यांना चार-पाच वर्षं तुरुंगात राहावं लागे, तो कालावधी बराचसा कमी झाला. आता त्यांना साधारणपणे दीड-दोन वर्षांकरता तुरुंगात राहावं लागतं. हे कैदी तसे निरपराध आहेत. आजपर्यंत दोन्ही देशांचे जेवढे काही मच्छीमार पकडले गेले आहेत, त्यांतला एकही दहशतवादी नव्हता, असं दोन्ही सरकारांनी आपापल्या देशाच्या संसदेमध्ये सांगितलेलं आहे.

यांतला एकही मच्छीमार दुसऱ्या कुठल्यातरी बेकायदेशीर कृतीत सामील असल्याचं दिसून आलेलं नाही. म्हणूनच दोन्ही देशांनी मच्छीमारांना अटक करू नये अशी आम्ही मागणी केली आहे. पाकिस्तानच्या मेरीटाइम ॲन्ड सिक्युरिटी एजन्सीला भारतातल्या मच्छीमारांच्या बोटी पाकिस्तानच्या पाण्यात येत आहेत असं वाटलं, तर त्यांना पकडण्याऐवजी त्यांना परत भारताच्या हद्दीतल्या पाण्याकडे ढकललं पाहिजे. याप्रमाणेच आपल्या कोस्टगार्डलाही पाकिस्तानी मच्छीमारांच्या बोटी भारतीय हद्दीत येत आहेत असं वाटलं, तर त्यांना न पकडता परत पाठवलं पाहिजे. असं केलं, तरच हा प्रश्न सुटू शकेल. मासे ज्या ज्या ठिकाणी असतील, त्या ठिकाणी मच्छीमार जाणारच हे आपल्याला मान्य केलं पाहिजे. भारत आणि पाकिस्तानची भले १९४७मध्ये फाळणी झाली असेलही, पण मच्छीमार त्याआधीपासूनच एकमेकांच्या हद्दीत जातच होते ना.

शिवाय गुजरातमधल्या ज्या काही बोटी समुद्रात जातात त्या बोटींमध्ये केवळ गुजरातमधलेच लोक जातात असं नाही. महाराष्ट्रातल्या डहाणू, तलासरी वगैरे आदिवासी भागातले आदिवासी मोठ्या संख्येने मासे पकडायला गुजरातमधल्या बोटींवरून जात असतात. इतकंच नव्हे, तर आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश इथलेही काही लोक आपल्या या बोटींमध्ये असतात. (मध्यंतरी तर नेपाळचाही एक माणूस मच्छीमार बोटीत होता. त्यालाही पाकिस्तानने पकडलं. नंतर बाकीचे सगळे सुटले, मात्र नेपाळी माणूस भारतीय नागरिक नसल्यानं अडकून पडला. त्याच्यासाठी वेगळीच प्रक्रिया राबवावी लागली.)

आपल्याला सरबजितसिंग, कुलभूषण जाधव यांसारखी मोठी, मीडियातून प्रसिद्धी मिळालेली उदाहरणं माहीत आहेत. मात्र अशाच स्वरूपाचे अनेक सामान्य नागरिकांचेही प्रश्न आहेत. त्याकरता बऱ्याच उपाययोजना करणं जरुरीचं आहे. सन २००७मध्ये भारत आणि पाकिस्तान सरकारने दोन्ही देशांतल्या सर्वोच्च व उच्च न्यायालयांमधल्या चार-चार निवृत्त न्यायाधीशांची म्हणजे एकूण ८ न्यायाधीशांची एक समिती स्थापन केली होती. हे आठही न्यायाधीश दर सहा महिन्यांत एकदा पाकिस्तानला जाऊन तिथे असणाऱ्या भारतीय कैद्यांना भेटत असत. अशाच प्रकारे ते भारतात येऊन

इथं असलेल्या पाकिस्तानी कैद्यांनाही भेटायचे. या दोनही देशांतल्या तुरुंगात असणाऱ्या कैद्यांचे प्रश्न ते समजून घेत असत. असं केल्यामुळे या कैद्यांच्या समस्या लवकर सुटायच्या. दुर्दैवाने २०१३नंतर त्या समितीची बैठकच झाली नाही. आता तर ती समिती रद्द करण्यात आलेली आहे. दोन्ही देशांत तिची पुनर्स्थापना व्हावी असा प्रयत्न चाललेला आहे. भारत सरकारने हे मान्य करून आपल्या बाजूने चार न्यायाधीशांना त्याकरता नियुक्त केलेलं आहे. या कैद्यांच्या मानवाधिकारांबद्दल विचार करण्यासाठी अशा स्वरूपाची यंत्रणा असणं आवश्यक आहे.

मच्छीमारांच्या संदर्भातला आणखी एक मुद्दा मला महत्त्वाचा वाटतो. २००६ साली मी पाकिस्तानच्या तुरुंगात जाऊन अल्पवयीन भारतीय कैद्यांना भेटलो होतो. ही अगदी १५-१६ वर्षांची कोवळी मुलं होती. त्यांना तुरुंगात भेटायला आलेला मी पहिलाच भारतीय होतो. ही मुलं गुजरातची असल्यामुळे आमचं त्या वेळी गुजरातीमधे संभाषण झालं. तेव्हा ती मुलं म्हणाली, ''यापुढे जर आम्ही मासे पकडायला गेलो, तर परत पकडले जाऊ शकतो. आम्ही असं पक्कं ठरवलं आहे की, सुटका झाली तर यापुढं कधीही मासेमारी करायला जायचं नाही.''

पुढे वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या प्रयत्नांमुळे पुढच्या दोन-तीन महिन्यांत हे सगळे अल्पवयीन कैदी सुटले. त्यानंतर मी गुजरातला जाऊन त्या सगळ्यांना भेटलो. तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल, की, त्या वेळी ती सगळी मुलं तेव्हा परत एकदा मासेमारीला जायची तयारी करत होती. मग आमच्या पाकिस्तानच्या तुरुंगातल्या भेटीदरम्यान झालेल्या बोलण्याची त्यांना मी आठवण करून दिली. 'यापुढं आम्ही परत कधीही मासेमारीला जाणार नाही,' असं त्या वेळी तर ते सारे म्हणाले होते. ते उत्तरले, ''आम्ही तरी काय करू? दर महिन्याला आई-वडिलांची, घरच्यांची पोटं भरायला पैसे मिळवावेच लागतात. हा धोका पत्करण्याशिवाय इलाज नाही.'' हे ऐकून माझ्या डोळ्यांत पाणी आलं.

या वर्षी 'विशेष कृतज्ञता पुरस्कार' जाहीर केल्याबद्दल मी महाराष्ट्र फाउण्डेशनचे आभार मानतो. हा गौरव केवळ माझाच नव्हे, तर तो माझ्यासोबत गेली अनेक वर्षं काम करणाऱ्या भारत व पाकिस्तानमधील सहकाऱ्यांचाही आहे.

jatindesai123@gmail.com/9869077718

---

** व्हीडिओ भाषणाचं शब्दरूप :*
*सुश्रुत कुलकर्णी / sushrutkulkarni@gmail.com/9822522475*

# विज्ञान कथेचा सन्मान



छायाचित्र : कुमार गोखले

वाङ्मय प्रकार पुरस्कार
(विज्ञान कथा)
**सुबोध जावडेकर**

'हे सर्व कुठून येतं?' असा प्रश्न विजय तेंडुलकरांनी त्यांच्या एका पुस्तकाच्या मुखपृष्ठावर शीर्षकरूपात विचारला होता. साहित्यिक विश्वाच्या संदर्भात हा प्रश्न नेहमी पडतो. साहित्याला आणि साहित्यिकांना लिहिण्यासाठी आवश्यक असं द्रव्य कोठून मिळतं? पूर्वानुभव, भोवतालच्या घडामोडी आणि वातावरण अशी त्याची उत्तरं दिली जातात. प्रश्न पडतो की, विज्ञान कथा, विज्ञान कादंबऱ्या लिहिताना या द्रव्याचा कितपत उपयोग होत असेल? भविष्यात घडण्याची शक्यता असलेल्या घटना आणि त्यांतून उद्भवू शकणाऱ्या संभाव्य समस्या यांवर त्यांची अधिकतर कथासूत्रं बेतलेली असतात. अशा लेखनाला सकस क्षमतेची कल्पनाशक्ती, सर्जनशीलता लागणार. विज्ञान कथा-लेखक कुठून आणत असतील हे आवश्यक द्रव्य आणि उच्च प्रतीची सर्जनशीलता? ज्या काही विज्ञान कथा-कादंबऱ्यांच्या लेखकापाशी अशा प्रकारची उच्च दर्जाची सर्जनशीलता आहे त्यांच्या साहित्यिक प्रयत्नांचं साहित्यविश्वात आज उचित स्वागत होताना दिसत नाही.

अशा या उदासीन वातावरणात, महाराष्ट्र फाउंडेशनने ज्येष्ठ विज्ञान कथाकार सुबोध जावडेकर यांना पुरस्कार देऊन त्यांचा केलेला सन्मान हा लक्षणीय आणि प्रशंसनीय मानला पाहिजे. जावडेकरांच्या साहित्यिकाचा, त्यांच्या विज्ञानसाहित्याचा, विज्ञान कथा-विज्ञान कादंबऱ्याचा हा सन्मान आहेच, पण त्याचबरोबर तो मराठी साहित्यविश्वातल्या एका उपेक्षित, अल्पपरिचित साहित्यप्रकाराचाही यथार्थ गौरव आहे. खास करून, आजच्या विज्ञानप्रतिकूल सांस्कृतिक माहोलात ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे.

विज्ञानाची कथा असते तसं साहित्याचं विज्ञान असतं. विज्ञानाच्या कथा आजवर अनेकांनी लिहिल्या आहेत आणि आजही लिहिल्या जात आहेत. विज्ञानप्रसारासाठी या साहित्याची आवश्यकता आहेच. पण जावडेकरांनी विज्ञानाच्या कथा लिहिल्या नाहीत, 'विज्ञान कथा' लिहिल्या. जावडेकर

'कथेचं विज्ञान' जाणतात. 'कथा-विज्ञाना'शी त्यांचं जवळचं नातं आहे. आपल्या लिखाणात कथा या वाङ्मयप्रकारच्या मूळ आकृतिबंधाचे सर्व घटक असतील; आपली कथा निव्वळ 'विज्ञानाची कथा' होऊन जाणार नाही याची जावडेकर सतत दक्षता घेत आले आहेत. त्यासाठी त्यांना फार प्रयास घ्यावे लागले असतील असं वाटत नाही. कथेविषयीची त्यांची भूमिका पहिल्यापासून विशुद्ध होती आणि आजही आहे. आपण मुळात कथा लिहीत आहोत, याची जाणीव बाळगून त्यांचं लिखाण चालतं. विज्ञानाचं आपल्या लेखनऐवजाशी सेंद्रिय नातं असलं, तरी आपण विज्ञान शिकवण्यासाठी कथा हे माध्यम निवडलेलं नाही, याचं भल्याभल्यांच्या कथांत न आढळणारं भान जावडेकरांच्या प्रत्येक कथेत सापडतं ते त्यांच्या कथाप्रधान भूमिकेमुळे.

उदाहरणार्थ – संगणकाच्या संदर्भात जावडेकरांनी कितीतरी कथा लिहिल्या आहेत. पण त्यांतल्या एकाही कथेचा नायक संगणक नाही. कथांच्या केंद्रस्थानी आहे संगणकाशी जोडलेलं जग. 'बुद्धिमत्तेची कसोटी' (गुगली), 'सामना', 'फितूर', 'वाण नाही, पण' (वामनाचे चौथे पाऊल), 'नरबळी', (संगणकाची सावली), 'पडघम' (चाहूल उद्याची), 'हरवलेली बाहुली' (आकाशभाकिते), या कथांमध्ये संगणक बुद्धिमान बनल्याचं दाखवलं आहे. पण एकाही कथेचा फोकस संगणकावर नाही, तो आहे त्याचा वापर करणाऱ्या भोवतालच्या माणसांच्या भावभावनांवर.

विकसित वैज्ञानिक तंत्रज्ञानाने मानवी व्यवहारावर, नातेसंबंधावर आणि मानसिकतेवर होऊ घातलेले परिणाम समोर आणायचं काम जावडेकरांच्या कथांनी केलं आहे. अमुक एक मला काम करायचं आहे; विज्ञानाचा मानवी संबंधांवर काय परिणाम होतो हे मला माझ्या कथांद्वारे दाखवून द्यायचं आहे अशा आवेशातून त्यांनी कथालेखन केलं नाही. विज्ञान, तंत्रज्ञान त्यांच्या कथांत कधी प्रवेश करतं हे स्पष्टपणे दाखवता येणार नाही. वैज्ञानिक भाषेत सांगायचं तर, सुबोध जावडेकरांच्या कथा म्हणजे विज्ञान आणि कथा यांचं मिश्रण नसतं, ते कथा आणि विज्ञान यांचं संयुग असतं. म्हणजे मिक्श्चर नसतं, कंपाउंड असतं. 'अखेरची साक्ष' (चाहूल उद्याची), 'दुभंगून' (गुगली), 'सपनोमे सजनसे' (वामनाचे चौथे पाऊल) अशा कथांच्या मांडणीत हे प्रकर्षाने जाणवतं. विज्ञानकथेविषयीची ही भूमिका सुबोध जावडेकर व्यासपीठावरून नि:संदिग्धपणे वारंवार मांडत आले आहेत. सुबोध जावडेकरांच्या कथांमधे समकालीन विज्ञान हा महत्त्वाचा घटक असला तरी मुळात मानवतावाद, वैश्विक मूल्यांची जाणीव, ध्येयवाद, हे त्यांचे आस्थाविषय आहेत. अत्यंत कमी शब्दांत जास्तीत जास्त परिणामकारक कथा कशी लिहिता येईल, याचा वस्तुपाठच त्यांच्या कथांमधून वाचकाला मिळत राहतो. त्यांच्या काही कथा ('दुभाषा', 'सत्याचे प्रयोग') मिश्कील आहेत, आणि काही ('गेम', 'रिसेट बटन') अंगावर येतात इतक्या धक्कादायक आहेत. 'पुढल्या हाका' या कथासंग्रहाच्या परिशिष्टामध्ये ज्येष्ठ लेखिका कमल देसाई यांचं भाष्य आहे. जावडेकर यांच्या कथालेखनाचे अनेक विशेष त्यांनी त्यात नमूद केले आहेत. ते मुळातून वाचण्याजोगे आहे.

तसा हा लेखक मितभाषी आहे. खाजगी बैठक असो, वा सभा-सेमिनार – कमीत कमी शब्दांत आपलं म्हणणं मांडून जावडेकर मोकळे होतात आणि अधिक काळ अलिप्तपणे श्रोत्यांची भूमिका बजावणं पसंत करतात. त्यांच्यासोबत झालेल्या चर्चांच्या बैठकीत आपला मुद्दा हिरिरीने आणि तावातावाने मांडताना त्यांना मी पाहिलं नाही. वाद – मग तो सामाजिक असो वा राजकीय – कोणतंही

विधान करण्यापूर्वी ते त्या प्रश्नामागची वैज्ञानिक कारणं शोधतात, ती स्वत: आधी नीट समजून घेतात आणि मग ती इतरांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतात. मांडणीत ना विद्वत्तेचा टेंभा, ना खोटा विनय. चर्चेत जावडेकर बोलायला उठले की, मूळ वादविषयाला नवी मिती मिळावी असं अनेकदा होतं. चर्चा अधिक सखोल बनून जाते.

विज्ञान कथाकार म्हटलं की, तो अहोरात्र विज्ञानसाहित्याच्या सहवासात असेल; विज्ञान हाच त्याचा श्वास आणि ध्यास होऊन बसला असेल अशी बहुतेकांची रोमँटिक कल्पना असते. जावडेकरांची जीवनशैली या कल्पनेला छेद देणारी. इतर विज्ञान कथाकारांचं ठाऊक नाही, पण सुबोध जावडेकर हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. विज्ञानविषयक साहित्याबरोबर जावडेकरांच्या ग्रंथसंग्रहात कादंबऱ्या , चरित्र, समीक्षा, लेखसंग्रह अशी इतर साहित्यप्रकारची पुस्तकंही आहेत. किंबहुना विज्ञानसाहित्याच्या तुलनेने या प्रकारची पुस्तकंच अधिक आहेत. याखेरीज विविध विषयांवरल्या लेखांची कात्रणं आहेत. घरी अनेक नियतकालिकं येऊन पडतात. त्यांत कुणा नवोदिताचा उत्तम लेख, कथा किंवा कविता आढळली की, त्या लेखकाचा फोन मिळवून लिखाण आवडल्याचं त्याला कळवणं हे काम जावडेकर एखाद्या कर्मकांडाप्रमाणे करतात. लिखाणातल्या काही मुद्द्यांविषयी शंका असल्या तर त्यांचंही निरसन करून घेतात; त्याच्या इतर साहित्यिक योगदानाविषयीही चौकशी करतात. नव्यांच्या लेखनाविषयी विशेष आस्था असलेल्या मला माहीत असलेल्या दोन लेखकांपैकी एक विजय तेंडुलकर दुसरे सुबोध जावडेकर.

सर्वसाधारणपणे, साहित्यिक लोक सतत लेखनात व्यस्त असल्याने इतर साहित्यिकांच्या पुस्तकांचं त्यांचं वाचन कमी असतं असं माझं निरीक्षण आहे. जावडेकर याला अपवाद म्हणावे लागतील. त्यांचं वाचन अफाट आहेच, पण बहुविध आणि अद्ययावत आहे. कालपरवाचे कुरुंदकर, इरावती कर्वे, मधल्या फळीतले वसंत नरहर फेणे, विजय तेंडुलकर, मिलिंद बोकील, नंदा खरे यांच्यापासून ते मेघना पेठे, कविता महाजन, जयंत पवार, मोनिका गजेंद्रगडकर, आणि आजच्या काळातील प्रणव







सखदेव, किरण येले, गणेश मतकरी या कथालेखकांचं नवंकोरं साहित्य... असं जावडेकरांच्या वाचनविश्वाचं दीर्घवर्तुळ आहे. आणि निव्वळ पुस्तकवाचनात नाही, तर या मंडळींचे कथाविषय, आशय आणि शैलींवरल्या चर्चेत देखील ते रमतात. विज्ञानांवरली नवनवी जर्नल्स, संगणकावरून नव्या संशोधनावरले निबंध मिळवून ते काटेकोरपणे वाचून, त्यावरून टिपणं काढणं हे एका बाजूला चालू असतं आणि दुसऱ्या बाजूला आपल्या वाचनात आलेल्या आवडलेल्या लिखाणाबद्दल लागलीच फोन करून आपल्या मित्रांना कळवणं हेही चालू असतं. एखाद्या वेळी 'परवाचा नंदा खऱ्यांचा लेख वाचलास का?' असं आपण मुद्दाम त्यांच्या शैलीत फोनवर विचारावं तर त्यांचं उत्तर येतं, 'हो' वाचला. नंदाबरोबर माझी फोनवर चर्चाही झाली.' इतकं बारीकसारीक इथलं-तिथलं सातत्याने वाचणारा हा माणूस विज्ञानविषयक अभ्यासू लेख वाचतो केव्हा असा आपल्याला प्रश्न पडतो.

गेल्या सात-आठ दशकांतला वैज्ञानिक प्रगतीचा वेग अफाट आहे. विज्ञान-कथाकारांना ताज्या विज्ञानवास्तवाच्या संपर्कात राहण्यासाठी आपलं ज्ञान सतत अपडेट करावं लागतं.

वैज्ञानिक पथकं प्रामाणिकपणे संशोधन करून नवनवी उपकरणं अस्तित्वात आणत आहेत. नवनवं तंत्रज्ञान विकसित करताहेत. पण त्या प्रक्रियेत देशांतर्गत, समाजांतर्गत, व्यक्तिगत पातळीवर जे तणाव निर्माण होतात, जे नवे नैतिक पेच निर्माण होतात, मानवी व्यवहारात जी लहान-मोठी वादळं निर्माण होतात, त्यांवर स्वत:चं मत बनवण्याआधी जावडेकर त्या विषयावरली माहिती इथून-तिथून गोळा करतात. त्या समस्येचा जमेल तितका सखोल वेध घेण्याची धडपड करतात. त्यासाठी ते त्या विषयाचा व्यासंग असलेल्या आपल्या मित्रांशी फोनवरून चर्चा करतील, वाचनालयातून आणि संगणकातील माहितीजालातून प्रश्नाच्या सर्व बाजू जाणून घेतील. मगच त्यावर प्रतिक्रिया घेण्यासाठी लेखणी हातात घेतील किंवा इतरांसमोर तोंड उघडतील. त्या वेळी ते जे मांडतील त्यात न्यायाधीशाच्या खुर्चीत बसल्याप्रमाणे जजमेंटल सूर नसेल. आक्रमकतेची तर या विज्ञान कथाकाराला ॲलर्जीच आहे. टीव्ही चर्चांमध्ये जावडेकरांची उपस्थिती कमी दिसते ती बहुधा जावडेकरांच्या या वृत्तीमुळे. सुबोध









जावडेकर आपल्या कथांतून वैज्ञानिक, तांत्रिक विकासवेगाचे साईड इफेक्ट्स वाचकांसमोर कथारूपाने सतत मांडत आले आहेत. अगदी पहिल्या कथेपासून कालपरवाच्या त्यांच्या कथांतून भविष्यात मानवापुढे उभ्या राहणाऱ्या संकटाची भयसूचक जाणीव ते वाचकांना देत आले आहेत.

विज्ञान कथा लिहिण्यासाठी लेखक वैज्ञानिक किंवा विज्ञान शाखेत प्रावीण्य मिळवलेला असायला पाहिजे अशातला भाग नाही. सुबोध जावडेकर आयआयटीमधून केमिकल इंजिनिअरिंगची पदवी घेऊन बाहेर पडले आहेत. केमिकल इंजिनीअर म्हणून दोन-तीन नावाजलेल्या कंपन्यांत त्यांनी व्यवस्थापकीय पातळीवरलं काम केलं आहे हे खरं; पण याचा त्यांच्या विज्ञानकथेतल्या प्रावीण्याशी संबंध नाही. विज्ञानाच्या पार्श्वभूमीमुळे उत्तम विज्ञान कथाकार बनले असं म्हणता येणार नाही. 'आकांत' या कादंबरीत त्यांना त्यांच्या अभियांत्रिकी शिक्षणाचा आणि व्यावसायिक अनुभवाचा उपयोग झाला हे खरं आहे; पण म्हणून नंतर ते रसायननिर्मिती उद्योग जगतातल्या कथा-कादंबऱ्या लिहीत बसले नाहीत. कथेतून विज्ञानाची विविध रूपं, विविध अंगं त्यांनी हाताळली. अभियांत्रिकी विज्ञानशाखेतल्या विद्यार्थ्यांना जीवशास्त्र विषयात फारसं स्वारस्य नसतं. पण जावडेकरांना असलेली समग्र विज्ञानाची ओढ त्यांना अभियांत्रिकी चौकटीची अक्षरं गिरवत स्वस्थ बसू देईना. ते जीवशास्त्रीय अभ्यासाकडे, प्राणिशास्त्राकडे, आणि प्राणी-निरीक्षणाकडे वळले. गेली काही वर्षं मेंदूशास्त्राचा अभ्यास करून इंजिनिअर जावडेकरांनी डॉक्टर आनंद जोशी या स्नेह्याच्या मदतीने मेंदूविज्ञानातील गंभीर आणि गमतीशीर पैलू मांडणारी वेधक पुस्तकं लिहिली.

थोडक्यात सांगायचं तर, एकीकडे विज्ञानाविषयी अपार आस्था, अमाप कुतूहल आणि दुसरीकडे कथावाङ्मयाबद्दल असलेलं उपजत आकर्षण यांतून विज्ञान कथाकार सुबोध जावडेकर नावाचं 'कम्पाउण्ड' आकाराला आलं आहे. आज फाउंडेशन त्यांचा सन्मान करत आहे तो त्यांच्या विज्ञानसाहित्य क्षेत्रातल्या समग्र योगदानासाठीचा आणि विज्ञानकथेबद्दलच्या स्वच्छ भूमिकेसाठीचा आहे.

इस्लामपूरच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेणारा आणि नंतर पुढील शिक्षण गारगोटी आणि चिकुर्डी नावाच्या खेड्यात पूर्ण करणारा हा स्कॉलर विद्यार्थी. पुण्यात फर्ग्युसनमध्ये इंटरसायन्स केल्यावर जावडेकरांनी आयआयटीत प्रवेश केला. केमिकल इंजिनिअर विषयात तिथं प्रावीण्य मिळवल्यावर सुबोध जावडेकरांनी तीन मोठ्या केमिकल कंपन्यांत व्यवस्थापकीय पातळीवर ३७ वर्षं काम केलं. हे सर्व चालू असता अर्थातच कथालेखन-वाचन जोमाने चालू होतं.. याबाबत जावडेकरांचा झपाटा केमिकल कंपनीचा कारभार पाहत असल्यापासूनच होता. पण वाचन हे एवढंच एक व्यसन असतं तर ठीक आहे. अशी इतरही व्यसनं त्यांना होती. त्यांपैकी एक क्रिकेट. क्रिकेट सीझन असेल तर जावडेकरांना टीव्हीसमोरून दूर करणं त्यांच्या कुटुंबियांना जमत नाही, तर मित्रांना कुठून जमणार? सुबोध जावडेकरांच्या आणखीही दोन व्यसनांचा उल्लेख करायला हवा – पोहोणं आणि शास्त्रीय संगीत. आयआयटीत असताना अच्युत गोडबोले त्यांचे सहाध्यायी होते. शास्त्रीय संगीताचे प्राथमिक धडे जावडेकरांनी गोडबोले यांच्याकडून घेतले. सिनेमा-नाटकाबरोबर ते संगीताच्या मैफिलींनाही अधूनमधून जात असतात. गेली काही वर्षं ते न चुकता पुण्यातल्या सवाई गंधर्व संगीत समारोहालाही हजेरी लावायचे. त्यांचे हे सगळे उद्योग पाहिले की वाटतं, अवांतर वाचन, क्रिकेट सामने, संगीत मैफिली या सगळ्यातून वेळ मिळाल्यावर विरंगुळा म्हणून ते विज्ञान कथा लिहीत असावेत.

१९८१ला सुबोध जावडेकरांनी लिहिलेल्या पहिल्यावाहिल्या विज्ञानकथेलाच पुरस्कार मिळाला. मराठी विज्ञान परिषदेने आयोजलेल्या कथास्पर्धेतला हा पुरस्कार होता.

'नंतर जावडेकरांनी मागे वळून पाहिलं नाही' असं ठरीव पद्धतीने काही म्हणता येईल का? नाही येणार. कारण जावडेकर पडले विज्ञानप्रेमी! त्यांच्यातल्या विज्ञानप्रेमिकाने मागे वळून पाहण्याऐवजी मान उंचावून पुढे पाहणं, पुढल्या हाकांना प्रतिसाद देणं पसंत केलं आहे. आजच्या काळात हे दुर्मीळ आहे. पुढे सरकण्याऐवजी आज समाजाला मागे मागे घेऊन जाणाऱ्या काही शक्ती पाहिल्या की आपण अस्वस्थ होतो. जावडेकर नुसते अस्वस्थ होत नाहीत, ते त्यामागील मानसिकतेचं मूळ शोधू पाहतात. समाजाला छद्म विज्ञानाचं आकर्षण का वाटावं यावरही त्यांचा अभ्यास सुरू असतो. जगातले सगळे बरे-वाईट व्यवहार, समस्या यांची वैज्ञानिक उत्तरं मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. केवळ विज्ञानप्रेमी असून उपयोगी नाही, 'आपण विज्ञान जगलं पाहिजे,' असं अलीकडे वाचनात आलं. जावडेकर हे सहज करत आले आहेत.

असो.

वैज्ञानिक प्रगतीने मानवी जीवन बरंच सुखकर बनवलं हे सर्वमान्य आहे. मात्र आज वैज्ञानिक विकासाने जे गुंते निर्माण केलेत ते विवेकी समाजाच्या लक्षात येऊ लागले आहेत. सुबोध जावडेकरांना तर हे गुंते काही काळ आधीच दिसायला आणि जाणवायला लागले होते. त्यांच्या कथांत याबद्दल सूचक इशारे आहेत. आपण ते गांभीर्याने घेतले पाहिजेत. 'संगणक कधी चुकत नाही' (संगणकाची सावली) या त्यांच्या कथेत 'वर्क फ्रॉम होम'चा उल्लेख आहे, आणि ही कथा त्यांनी वीस वर्षांपूर्वी, इंटरनेटपूर्व काळात लिहिली आहे.

अंतरीक्षयान, परग्रहावरल्या जीवाचं पृथ्वीतलावर आगमन, मंगळावर स्वारी, उडत्या तबकड्या या विषयांवरल्या कल्पित कथा म्हणजे विज्ञान कथा असा वाचकांचा समज होऊन बसला होता. सुबोध जावडेकरांनी विज्ञान कथांना या साचेबंद विश्वातून बाहेर काढलं.

कथात्मक सौंदर्याच्या अंगाने जावडेकर आणि इतर विज्ञान कथाकारांच्या साहित्यिक योगदानाची समीक्षा अजून नीटपणे झालेली नाही. सामाजिक जाणिवेतून समाजविज्ञानाच्या आजच्या हालचालीकडे अभ्यासकाच्या नजरेतून निरखून निर्मिलेल्या विज्ञान कथा, विज्ञानकादंबऱ्यांतून या लेखकाने समाजाला अप्रत्यक्ष दिलेले सावधगिरीचे इशारे महत्त्वाचे आहेत. मराठी समीक्षाविश्वाने त्याचीही पुरेशी दखल घेतलेली नाही. आपण विज्ञानप्रसारासाठी विज्ञान कथा लिहीत नाही असं सुबोध जावडेकर म्हणत असले तरी त्यांच्या कथांतून नेणिवेच्या पातळीवर विज्ञानांचे संस्कार वाचकांवर होत राहिले आहेत.

देशातल्या आजच्या काहीशा अवैज्ञानिक वातावरणात विज्ञानाचा झेंडा उंच धरणारं लेखन करणं हा एका परीने समाजकार्याचाच एक भाग मानला गेला पाहिजे. सुबोध जावडेकरांच्या साहित्य कारकीर्दीचा महाराष्ट्र फाउंडेशनने केलेला आजचा गौरव हा या दृष्टीने फार मोलाचा आहे.

प्रतीकात्मक नजरेने पाहिलं तर हा सन्मान विज्ञानसंस्कृतीचा आणि पर्यायाने सर्व विज्ञानप्रेमींचा सन्मान आहे असं म्हणता येईल.

– अवधूत परळकर
awdhoot@gmail.com/9982066658

# ‘उद्याचा विचार आजच...’ – सुबोध जावडेकर




**सुबोध जावडेकर** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

नमस्कार,

सर्वप्रथम, ‘विज्ञान कथा’ या वाङ्मयप्रकारासाठी मला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिल्याबद्दल मी महाराष्ट्र फाउंडेशनचे मनापासून आभार मानतो. आणि त्याचबरोबर मासूम ही संस्था, साधना ट्रस्ट, भारतातली आणि अमेरिकेतली निवड समिती, या सर्वांनाही धन्यवाद देतो. हा पुरस्कार देऊन त्यांनी माझा गौरव तर केला आहेच, पण ‘विज्ञान कथा’ या वाङ्मयप्रकाराचाही गौरव केला आहे, असं मला वाटतं.

आणि याच भूमिकेतून मी या पुरस्काराचा स्वीकार करतो.

आज आपल्या आयुष्यात विज्ञानामुळे अनेक बदल होताहेत. नवे नवे प्रश्न पुढं येताहेत. कधी कल्पनाही केली नसेल असे नैतिक पेच समोर उभे राहताहेत. माणसा-माणसांतली नातीसुद्धा त्यामुळे बदलून जाणार आहेत. या बदलत्या नातेसंबंधांचा शोध घ्यावा, या भूमिकेतून मी विज्ञान कथा लिहितो. सुरुवातीच्या माझ्या कथांमध्ये परग्रह, अंतराळयानं, कालप्रवास अशा गोष्टी असत. अलीकडच्या माझ्या कथांमध्ये त्या येत नाहीत. पण त्या वेळी सुद्धा या गोष्टी माझ्या कथांच्या केंद्रस्थानी नव्हत्या. कारण विज्ञान कथा ही विज्ञानाची कथा नसून विज्ञानयुगात जगणाऱ्या माणसांची कथा असते, अशी माझी सुरुवातीपासूनच धारणा आहे.

विज्ञान कथा भविष्यात घडते, हे खरं आहे. असं जरी असलं तरी तो भविष्यकाळ हा आजच्या, इथं राहणाऱ्या माणसांचाच भविष्यकाळ असतो. त्यांच्या उद्याच्या आयुष्याचं चित्र रेखाटून विज्ञान

कथाकार आपल्या आजच्या जीवनावरच भाष्य करत असतो.

या चित्रणामध्ये अतिशयोक्ती असते, असं काहीजण म्हणतात. पण मला विचाराल तर त्यात अतिशयोक्ती तर नसतेच, उलट पुढील काळात काय काय बदल होतील, किती झपाट्याने होतील त्याचा अंदाज बांधण्यात आम्ही विज्ञान कथाकारच थोडे कमी पडतो.

आता बघा, विज्ञानकथेमध्ये आम्ही व्हीजीफोनचा उल्लेख खूप पूर्वीपासून करत असू. व्हीजीफोन म्हणजे व्हीडिओ कॉल करता येईल असा फोन. पण तेव्हा आम्ही असं गृहीत धरलं होतं की, असे फोन एकविसाव्या शतकात केव्हातरी अवतरतील. पण प्रत्यक्षात ते आधीच आले. ९४-९५साली. किंवा रोबॉट सर्जनचं उदाहरण घ्या. यंत्रमानव ऑपरेशन करतात हे आम्ही विज्ञान कथांमध्ये दाखवत होतो. पण ते वास्तवात केव्हा येईल असं आम्हाला वाटत होतं? आणखी पन्नास-शंभर वर्षांनी. प्रत्यक्षात दहा वर्षांपूर्वीच दिल्लीत पहिली रोबॉटिक सर्जरी झाली. आणि आज भारतात सत्तर ठिकाणी रोबॉट असिस्टेड सर्जरीची सोय आहे.

म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचा वेग किती प्रचंड आहे, याची कल्पना करा. काही तज्ज्ञांच्या मते एकविसाव्या शतकात कम्पुटर चिप्स खूप स्वस्त होतील. कागदाहून स्वस्त. आकाराने अतिशय छोट्या होतील. कुठल्याही वस्तूत त्या बसवता येतील. डोळ्यावर लावायच्या कॉन्टॅक्ट लेन्समध्ये त्या बसवल्या तर तुमच्या डोळ्यासमोर कम्पुटरचा पडदा दिसू लागेल. तो इंटरनेटशी जोडून तुम्हाला हवी ती माहिती, हवं ते पुस्तक, हवं ते चित्र क्षणात समोर आणता येईल. कुठलीही माहिती पाठ करायची, लक्षात ठेवायची गरजच पडणार नाही. असं झालं तर काय होईल? विद्यार्थ्यांची परीक्षा कशी घेणार? आणि कसली घेणार? कुणाची कॉन्टॅक्ट लेन्स किती पॉवरफुल आहे, याची?

आज हृदयरोपणाच्या, मूत्रपिंडरोपणाच्या शस्त्रक्रिया अगदी कॉमन झाल्या आहेत. पण काही काही वेळा असं होतं की, शरीर तो नवीन अवयव स्वीकारत नाही. भविष्यकाळात तुम्हाला तुमचा क्लोन









बनवून ठेवता येईल. त्या क्लोनचं हृदय किंवा मूत्रपिंड काढून तुम्हाला बसवता येईल. हा क्लोन तुमच्या स्वत:च्या पेशींपासूनच बनवलेला असल्यामुळे तुमच्या शरीराने ते नाकारण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. पण मग त्या क्लोनच्या आयुष्याचं काय? त्याचं हृदय काढून घेऊन त्याला मारून टाकायचं? त्याला जगायचा अधिकार नाही? माझ्या काही कथांमधून यांसारख्या प्रश्नांना मी हात घातलाय.

डोळ्यांना दिसणारही नाहीत इतक्या सूक्ष्म आकाराचे नॅनो रोबॉट्स उद्या बनवले जातील. ते तुमच्या शरीरात घालून त्यांच्याकरवी शस्त्रक्रिया करता येईल. हृदयाच्या रक्तवाहिनीतले ब्लॉक्स ते काढून टाकतील. मेंदूतला ट्युमर कापून काढू शकतील. पण यामुळे होईल काय? मृत्यूचा दर आणखी कमी होईल. आणि वृद्धांची संख्या मात्र बेसुमार वाढेल.

पण याहीपेक्षा विलक्षण अशा समस्या मानवजातीसमोर उभ्या ठाकणार आहेत. नुकतंच शास्त्रज्ञांनी मेंदूत साठवलेल्या स्मृती पुसून टाकायचं तंत्र विकसित केलंय. बाकी सगळ्या आठवणी शाबूत ठेवायच्या आणि एखादी विशिष्ट आठवण तेवढी पुसून टाकायची, असं करता येतं. गेल्या वर्षी तर खोटी, कृत्रिम आठवण मेंदूत पेरण्यातही यश मिळालंय. म्हणजे जे घडलेलंच नाही, ते आठवण म्हणून तुमच्या डोक्यात भरता येईल. आज हे प्रयोग उंदरांवर यशस्वी झालेत, उद्या माणसांवरही यशस्वी होतील यात मुळीच शंका नाही.

विचार करा, असं झालं तर काय होईल? साक्षीदाराची साक्ष हा पुरावा मानून न्याय दिला जातो. त्याच्या मेंदूतली गुन्ह्यासंबधीची आठवण पुसूनच टाकली तर तो साक्ष कशी देणार? आणि त्यापेक्षा भयंकर म्हणजे एखाद्या निरपराध माणसाला गुन्हा करताना आम्ही स्वत:च्या डोळ्यांनी बघितलंय असं सांगणारे दहा साक्षीदार कोर्टात हजर झाले तर? आपली न्यायव्यवस्थाच कोलमडून पडणार नाही का? या कल्पनेवर आधारलेली एक कथा मी काही वर्षांपूर्वी लिहिली होती.

येत्या काळात अशा अनेक समस्यांना, नैतिक प्रश्नांना आपल्याला तोंड द्यावं लागणार आहे. आपली मनोवृत्ती, आपली वागणूक, विचार करायची पद्धत, नातीगोती, नीती-अनीतीच्या कल्पना – सगळं सगळं बदलून जाणार आहे. या सगळ्याचं चित्रण विज्ञानकथेत येतं. ‘आजच वाचा, उद्यासाठी’ अशी जाहिरात मध्यंतरी एक वर्तमानपत्र करत असे. ते विज्ञानकथेला अगदी चपखल लागू पडतं. ती तुम्हाला उद्याचा विचार आजच करायला भाग पाडते. कधी तुम्हाला सुखवते, कधी धोक्याचा इशारा देऊन सावध करते. एका परीनं, या बदलांना सामोरं जाण्याकरता तुम्हाला तयार करते. हे विज्ञानकथेचं खास वैशिष्ट्य आहे.

विज्ञानकथेचे जे अनेक पैलू आहेत, जी बलस्थानं आहेत, त्यांपैकी काहींचा उल्लेख मी केला. विज्ञान कथा म्हणजे काय, तिचं वेगळेपण नेमकं कशात आहे आणि आपल्या आयुष्यात तिचा रोल काय, हे सांगायची संधी या निमित्ताने मला मिळाली.

ती दिल्याबद्दल आयोजकांना धन्यवाद आणि माझे विचार ऐकून घेतल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक आभार.

subodh.jawadekar@hotmail.com/9870369372

# आसरियार (संपादक) डॉ. के. वीरमणी – व्ही. कुमारसेन




डॉ. नरेंद्र दाभोलकर
स्मृती पुरस्काराने सन्मानित
**डॉ. के. वीरमणी,**
अध्यक्ष,
'द्रविड कळघम', चेन्नई
यांच्याविषयी...

**आसरियार (संपादक) डॉ. के. वीरमणी यांच्या नेतृत्वाखालील पेरियार मिशन :**

थंताई पेरियार इ.व्ही. रामास्वामी (१८७९-१९७३) यांची समाजातील दुर्बल घटकांत आत्मसन्मान जागृत करण्याची आणि त्यांना एक विवेकपूर्ण, प्रतिष्ठेचं जीवन मिळावं अशी तीव्र इच्छा होती. त्यासाठी आपल्या जीवनकार्याची सुरुवात एका वेगळ्या पद्धतीने, म्हणजे 'द्रविड कळघम'ची ('डीके'ची) स्थापना करून केली. आपण समोर ठेवलेलं हे क्रांतिकारक ध्येय पूर्णत: यशस्वी होण्यासाठी आपलं जीवनच नव्हे, तर पुढच्या कित्येक पिढ्या खर्च व्हाव्या लागतील याची पेरियार यांना मनोमन खात्री होती. त्यामुळेच त्यांनी आपली ही मानवतावादी चळवळ आणि त्यातल्या कार्यकर्त्यांची फळी स्वत:नंतरही दीर्घकाळ कार्यरत राहील अशा प्रकारेच संस्थेची सुरुवात केली. पेरियार यांनी आपल्यानंतर या चळवळीचं नेतृत्व योग्य लोकांकडे जाईल याची तजवीज आधीच करून ठेवली होती. थंताई पेरियार यांच्यानंतर या चळवळीचं नेतृत्व आधी अन्नई ई.व्ही.आर. मणिअम्माई (१९७३-१९७८) यांच्याकडे आलं व त्यांच्या पश्चात ते

आजतागायत आसरियार के. वीरमणी यांच्याकडे आहे. पेरियार यांनी आपल्या हयातीतच डॉ. वीरमणी या शिष्याला संस्थेची तात्त्विक व संघटनात्मक जबाबदारी घेण्यासाठी घडवलं होतं.

**अभ्यास व शालेय जीवन :**

आसरियार के. वीरमणी यांचा जन्म २ डिसेंबर १९३३ रोजी एका साध्याशा कुटुंबात झाला. तमिळनाडूमधलं कुडल्लोर नावाचं बंदर हे त्यांचं जन्मगाव. वीरमणी लहान असतानाच त्यांच्या मातोश्रींचं निधन झाल्यामुळे कुटुंबातील अन्य सदस्यांनी त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी उचलली. जुन्या पद्धतीच्या शाळेत अगोदर त्यांचं अनौपचारिक शिक्षण सुरू झालं. पुढे आपल्या औपचारिक शिक्षणाच्या काळात, के. वीरमणी यांनी अभ्यासातही आपली चुणूक दाखवली. त्याच काळात 'सेल्फ रिस्पेक्ट' या चळवळीचे सदस्य असलेल्या ए. द्रविडमणी यांच्याकडून त्यांना वैचारिक बैठकही प्राप्त झाली. वयाच्या अवघ्या ९व्या वर्षी वीरमणी यांनी आपलं पहिलं सार्वजनिक भाषण केलं होतं. पुढे 'सेल्फ रिस्पेक्ट' चळवळीच्या कितीतरी नेत्यांच्या उपस्थितीत त्यांनी अनेक सभा व परिषदांमध्ये भाषणं केली. त्यांनी पेरियार यांच्या उपस्थितीतही सभा गाजवली होती. त्यांचा पेरियार यांच्यासोबत परिचय झाला सन १९४४मध्ये. त्यानंतर पुढच्या काळात के. वीरमणी यांनी आपला अभ्यास आणि वेगवेगळे विवेकवादी संस्थात्मक उपक्रम या दोहोंचा समतोल साधत आयुष्याची वाटचाल सुरू केली.

**द्रविडल कळघमला वाहिलेलं जीवन :**

सन १९६२मध्ये पेरियार यांनी वीरमणी यांना चेन्नई इथे बोलावणं धाडलं. पेरियार यांनी वीरमणी यांच्यावर 'विदुथलाई' या तमिळ दैनिकाचा पूर्ण वेळ संपादक म्हणून काम पाहण्याची जबाबदारी सोपवली. के. वीरमणी यांनी आपल्यावर सोपवलेली ही जबाबदारी शिरोधार्य मानली आणि वकिलीचा व्यवसाय आटोपता घेतला.




'विदुथलाई' या दैनिकाची स्थापना सन १९३५मध्ये करण्यात आली. गेली ५९ वर्षं के. वीरमणी त्याचे संपादक म्हणून सलगपणे काम पाहत आहेत. प्रकाशन क्षेत्रातला हा एक विक्रमच म्हटला पाहिजे. तमिळ भाषेत 'आसरियार' या शब्दाचा अर्थ आहे 'संपादक'. 'विदुथलाई' या दैनिकाच्या प्रकाशनामध्ये वीरमणी यांची असलेली गुंतवणूक आणि त्याकरता स्वत:ला वाहून घेणं या गोष्टींमुळे पुढे पुढे चळवळीचे कार्यकर्ते आणि हितचिंतक त्यांना प्रेमाने 'आसरियार' (म्हणजेच 'संपादक') असंच संबोधू लागले.

आसरियार डॉ. के. वीरमणी यांनी पेरियार यांचा विवेकवादाचा व आत्मसन्मानाचा वारसा पुढे चालू ठेवला आहे. आसरियार सध्या 'पेरियार

सेल्फ रिस्पेक्ट प्रपोगंडा इन्स्टिट्यूशन (PSRPI)' या सार्वजनिक ट्रस्टचे सचिव आहेत. पेरियार यांनी आपली सर्व संपत्ती वापरून हा ट्रस्ट स्थापन केला. या ट्रस्टने पेरियार यांचं सर्व लेखन, भाषणं मुद्रित तसंच इलेक्ट्रॉनिक माध्यमातून प्रकाशित केलेली आहेत. आसरियार यांनीदेखील तमिळ आणि इंग्रजी या भाषांमध्ये १५०हून अधिक पुस्तकं लिहिलेली आहेत. ही पुस्तकं पेरियार यांची विचारधारा, तिचा समाजावर होणारा परिणाम आणि या चळवळीने मिळवलेलं यश अशा विषयांवरची आहेत.

समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय, शिक्षण आणि रोजगार मिळावा याकरता पेरियार यांनी सुरू केलेली ही सामाजिक चळवळ आता आसरियार यांच्या नेतृत्वाखाली चालवली जाते. देशातील सध्याच्या सामाजिक, राजकीय वातावरणाकडे पाहता ही अगदी सुयोग्य चळवळ आहे, असे म्हणावं लागेल.

**वैधानिक दुरुस्त्यांना मोलाचं साहाय्य :**

सन १९२८ पासूनच तत्कालीन मद्रास प्रोव्हिन्समध्ये दुर्बल घटकांना राखीव जागा मिळण्याबाबतचा हक्क होता. या कायदेशीर हक्काविरोधातील मद्रास उच्च न्यायालयाच्या निकालानंतर, पुढे सर्वोच्च



पेरियार ई.व्ही. रामस्वामी नायकर यांच्या सोबत...

न्यायालयाने असं निश्चित केलं की, हा आदेश भारतीय राज्यघटना १९५०मध्ये तरतुदींच्या विरोधातला आहे. या निकालासंदर्भात पेरियार यांनी राज्यभर मोठ्या प्रमाणात निदर्शनांचं नेतृत्व केलं. त्यानंतर या तरतुदींनुसार, दुर्बल घटकांना १९५१मध्ये पहिली घटनादुरुस्ती करून त्यात कलम १५ (४) समाविष्ट करून आरक्षणाचे लाभ देण्यात आलेले होते.

पेरियार यांच्या मार्गावरून वाटचाल करत आसरियार डॉ. के. वीरमणी यांनीही तमिळनाडू राज्य सरकारला याच प्रकारे साहाय्य केलं. सन १९९३मध्ये घटनेच्या ७६व्या दुरुस्तीनंतर सातव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ३१ (क) अंतर्गत तमिळनाडू राज्य सरकारला त्या राज्यामध्ये एकंदर आरक्षण (हे देशात सर्वाधिक आहे) कायम ठेवण्यासाठी एक विशेष विधेयक मंजूर करून घेण्यास डॉ. वीरमणी यांच्या विद्वत्तेचा लाभ मिळाला. याअगोदर सामाजिक न्यायाच्या इतिहासात असं जास्तीचं आरक्षण केवळ सत्ताधीशांच्या कार्यकारी आदेशांद्वारेच अमलात आणलं जाऊ शकत होतं.

याखेरीज, केंद्र सरकारच्या व खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण राहावं याकरता २००६मध्ये ९३वी घटनादुरुस्ती करून त्यात कलम १५ (५) समाविष्ट करण्यात आलं. नुकत्याच झालेल्या घटनादुरुस्तीचा म्हणजेच कलम १५ (४) मधील दुरुस्तीचा पाया पहिली घटनादुरुस्ती हा होता. पेरियार आणि त्यांची विचारधारा पुढे नेणारे त्यांचे प्रमुख शिष्य आसरियार यांनी सामाजिक न्याय मिळवून देणाऱ्या या तीन घटनादुरुस्ती प्रक्रियांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. या चळवळीने निवडणुकांच्या राजकारणात कधी भाग घेतलेला नसल्यामुळे, तिला, समाजात जागृती करून आणि राज्य व केंद्र सरकारमधील सत्ताधाऱ्यांवर प्रभाव टाकून सामाजिक न्यायासाठी या तीन घटनेतल्या दुरुस्त्या करून घेता आल्या. पेरियार चळवळीचं हेच मोठं बलस्थान आहे.

आसरियार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या सामाजिक चळवळीचं मुख्य काम म्हणजे पेरियार यांच्या आत्मसन्मान, विवेकवाद, सामाजिक न्याय, अंधश्रद्धा-निर्मूलन आणि विज्ञाननिष्ठ विचारसरणीचं विकसन, खेरीज स्त्रीस्वातंत्र्यासारख्या अनेक गोष्टींचा प्रचार व प्रसार करणं हे आहे. या साऱ्या गोष्टी लोकांचं शिक्षण व प्रबोधन करण्यासाठी आयोजित केल्या जातात, त्यात कोणतीही सक्ती किंवा बळ यांचा वापर केला जात नाही. हा एक अहिंसात्मक मार्गाने दिला जाणारा लढा आहे, समता व शांतता मिळवण्याकरता लोकांच्या मनात हिंसेचा उद्रेक घडवून आणणारा हा धडा नव्हे.

**अंधश्रद्धा-निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचं विकसन :**

आसरियार समाजात रूढ झालेल्या अंधश्रद्धांचं निर्मूलन करण्यासाठी अनेक मोहिमा नियमितपणे राबवत असतात. उदाहरणार्थ, सुमारे २५ वर्षांपूर्वी काही विशिष्ट हितसंबंध असलेल्या लोकांनी ‘गणपती दूध पितो’ असा प्रचार सुरू करून ही अंधश्रद्धा लोकांमध्ये पसरवण्याचा प्रयत्न केला होता. या वेळी आसरियार यांनी याविरोधात तत्काळ कृती करायचं ठरवलं. चेन्नई शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या एलआयसी इमारतीसमोर ते स्वत: रस्त्यावर उतरले आणि या अंधश्रद्धेचा प्रचार करणाऱ्यांवर जोरदार हल्ला चालवला. त्यांच्या या घणाघाती हल्ल्यामुळे अंधश्रद्धेचा फायदा उठवणाऱ्या धार्मिक आणि राजकीय दलालांना अखेर काढता पाय घ्यावा लागला. ‘गणपती दूध पितो’ या

अंधश्रद्धायुक्त कल्पनेच्या निर्मूलनाला नुकतीच २५ वर्षं पूर्ण झाली. त्या निमित्ताने, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या 'महाराष्ट्र अंधश्रद्धा-निर्मूलन समिती' या विवेकवादी संस्थेने आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात आसरियार यांनी वरील घटनेचा उल्लेख केला होता.

**निदर्शनाच्या मार्गाचं अनुसरण :**

सामान्य जनता आणि राज्यातील सत्ताधारी यांचं महत्त्वाच्या प्रश्नांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी निदर्शनांद्वारे विरोध दर्शवणं हा द्रविड कळघमचा एक मुख्य मार्ग आहे. कधी कधी तातडीने सोडवण्याचा प्रसंग समोर असेल, तर अशा वेळी निदर्शनं करण्याचीही वेळ येते. अशा प्रकारे सार्वजनिक स्थळी निदर्शनं केल्यामुळे आपल्या नावाचं अटक वॉरंट निघेल किंवा तुरुंगवासाला सामोरं जावं लागेल याची आसरियार यांना पूर्ण कल्पना असते. आजवर त्यांना ५०हून अधिक वेळा अटक झालेली आहे.

**संपादकीय जबाबदाऱ्या :**

डॉ. के. वीरमणी यांच्या कुशल संपादकपदाखाली पुढील विविध नियतकालिकं प्रकाशित केली जातात. 'विदुथलाई' (मुक्ती) (१९३५) हे दैनिक, 'उन्माई' (सत्य) (१९७१) हे पाक्षिक, 'पेरियार पिन्जू' (पेरियार बालकं) (१९९८) हे मुलांसाठीचं मासिक, आणि 'द मॉडर्न रॅशनलिस्ट' (१९७१) हे इंग्रजी मासिक अशी वेगवेगळी, पत्रकारितेच्या क्षेत्रातील अमोघ शस्त्रे वापरून ही संस्था आपला विचार पुढे नेत असते.

आसरियार के. वीरमणी यांनी आजवर अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आहेत. त्यांत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. त्यांत पेरियार सेन्टेनरी पॉलिटेक्निक, पेरियार कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस आणि पेरियार मणिअम्माई इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी (अभिमत विद्यापीठ) इ. चा समावेश आहे. ते या अभिमत विद्यापीठाचे कुलगुरूही आहेत. या साऱ्या शैक्षणिक संस्थांची स्थापना पेरियार यांनी स्थापन केलेल्या सार्वजनिक ट्रस्टद्वारे आणि नंतर आसरियार वीरमणी यांनी स्थापन केलेल्या अनेक ट्रस्ट्सद्वारे करण्यात आलेली आहे. याआधीच्या पिढीतल्या ज्या लोकांना शिक्षण मिळू शकलं नाही, अशा दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना या साऱ्या संस्था शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून देत असतात. या संस्थांच्या माध्यमातून आसरियार यांनी स्त्रियांच्या आयुष्यातही मोठी क्रांती घडवून आणलेली आहे.

द्रविड कळघमसोबतच आसरियार डॉ.के. वीरमणी यांच्याकडे 'द रॅशनलिस्ट फोरम' या संस्थेचं नेतृत्व आहे. ही संस्था 'विवेकवाद' या विषयामध्ये कार्य करणाऱ्या 'फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनलिस्ट असोसिएशन्स (FIRA)' या देशभरात लोकप्रिय असणाऱ्या संस्थेशी संलग्न आहे. पेरियार यांची विवेकवादी तत्त्वं आणि त्यांच्या जीवनाचं मिशन यांचा तमिळनाडू राज्याच्या बाहेरही जागतिक पातळीवर प्रसार व्हावा याकरता आसरियार यांनी आता प्रयत्न सुरू केलेला आहे. आसरियार यांनी जागतिक पातळीवर पोचण्यासाठी आता 'ग्लोबलायझेशन ऑफ पेरियार मिशन' हे महत्त्वाचं कार्य हाती घेतलेलं आहे. त्याकरता सन २०११ आणि २०१७मध्ये दोन 'वर्ल्ड एथिस्ट कॉन्फरन्सेस' आयोजित

करण्यात आल्या होत्या. यांत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या अनेक नेत्यांनी व संस्थांनी सहभाग घेतला होता. याखेरीज, सन २०१७मध्ये, जर्मनीतल्या कलोन इथे 'पेरियार आत्मसन्मान चळवळ परिषद' घेण्यात आली. सन २०१९मध्येही याच धर्तीवर अमेरिकेतल्या मेरीलँडमधल्या सिल्व्हर स्प्रिंग इथे 'पेरियार मानवतावाद आणि आत्मसन्मान परिषद' घेण्यात आली. ती 'पेरियार इंटरनॅ शनल USA.'च्या सहयोगाने घेण्यात आलेली होती. 'अमेरिकन ह्यूमनिस्ट असोसिएशन'ने आसरियार के. वीरमणी यांना 'लाइफटाइम ह्यूमनिस्ट अचिव्हमेंट ॲवॉर्ड' प्रदान करून गौरवलेलं आहे.

**के. वीरमणी सामाजिक न्याय पुरस्कार :**

सामाजिक न्यायासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यासाठी आसरियार यांच्या नावाने १९९६पासून 'पेरियार इंटरनॅशनल, USA द्वारे 'के. वीरमणी ॲवॉर्ड फॉर सोशल जस्टिस' दिलं जातं. दरवर्षी 'सामाजिक न्याय' या क्षेत्रात महत्त्वाचं काम करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार प्रदान केला जातो. आजवर जगभरातल्या २१ व्यक्तींना या पुरस्काराने गौरवण्यात आलेलं आहे.

**आसरियार यांच्यावर झालेले हल्ले :**

पेरियार चळवळ ही शोषितांची मानसिकता बदलण्यासाठी आहे. शोषितांमध्ये हिंसाचार दिसून येत नाही. हाती घेतलेले हे काम खूप कठीण आहे. ज्या अल्पसंख्य उच्चवर्णीय लोकांना समाजातल्या बहुसंख्यांच्या कष्टांचा व सेवांचा लाभ मिळतो, ते अशी समता सहजासहजी मान्य करत नाहीत. आपल्याला मिळणारे फायदे कायम राहावेत, यासाठी असे उच्चवर्णीय कोणत्याही थराला जातात. मग हिंसाचार करण्यासही ते मागेपुढे पाहत नाहीत. आजवर आसरियार यांच्यावर एकंदर पाच वेळा हल्ले करण्यात आलेले आहेत.

- दिनांक २० जुलै १९८२ रोजी विरुधुनगर जिल्ह्यातील मामसापुरम इथे आसरियार यांच्यावर एका हिंसक जमावाने हल्ला केला होता. त्या वेळी त्यांच्या नाकाला झालेल्या इजेवर सुमारे एक आठवडा वैद्यकीय उपचार करून घ्यावे लागले होते.
- जमावाने असाच आणखी एक हिंसक हल्ला ११ एप्रिल १९८५ रोजी उत्तर चेन्नई इथेही केला.
- सालेम जिल्ह्यातील थम्मामपट्टी इथे २८ ऑगस्ट १९८७ रोजी त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. मात्र असा हल्ला होऊनही, आसरियार यांनी पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणेच तिथल्या सार्वजनिक सभेत आपलं भाषण केलं.
- द्रविडियन स्टुडंट्स कळघम कॉन्फरन्सला जात असताना २८ सप्टेंबर २०१३ रोजी विरुधाचलम इथे एका जमावाने त्यांच्या वाहनांच्या ताफ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी स्वत: ही परिस्थिती सावरली आणि ते कार्यक्रमस्थळी पोचले. तिथे त्यांनी या परिषदेत आपलं भाषणही केलं.
- २०१९च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकांच्या प्रचारमोहिमेदरम्यान थिरुपूर इथे त्यांच्यावर भगव्या शक्तींनी हल्ला चढवला होता. त्यात त्यांच्या मोटारीचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं होतं.

आसरियार वर्षातला अनेक काळ वेगवेगळ्या ठिकाणी प्रवास करून समाजातील सर्व थरांतील

लोकांना भेटण्यात व त्यांच्याशी संवाद साधण्यात घालवतात. पेरियार चळवळ ही मुख्यत: लोकांसाठीची व लोकांच्या सहभागातून चालणारी आहे. ही चळवळ अखंड चालत राहावी याकरता केंद्रस्थानी, प्रादेशिक, जिल्हा, तालुका, गाव आणि खेडं या पातळ्यांवर संघटनेची सुविहित रचना करण्यात आलेली आहे. आसरियार यांनी द्रविड कळघम एक सामाजिक चळवळ म्हणून विकसित केली आहे. लोकांमध्ये 'ब्लॅक शर्ट कॅडर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या दोन पिढ्यांमध्ये मतभेद असलेले दिसून येत नाहीत. अगदी कोव्हिड-१९ साथीच्या संकटादरम्यानही, आसरियार दररोज झूम मीटिंगच्या माध्यमातून आपल्या साऱ्या कार्यकर्त्यांच्या संपर्कात होते. कोव्हिड-१९ साथीचा पेरियार चळवळीवर कोणताच अनिष्ट परिणाम झालेला नाही. माहिती-तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून आपली चळवळ यशस्वीरीत्या सुरू राहील याची काळजी आसरियार यांनी घेतलेली आहे. आज आसरियार ८८ वर्षांचे असले, तरी ते तरुण आणि उत्साहाने भारलेले आहेत असं म्हणणं अतिशयोक्तीपूर्ण ठरणार नाही. साऱ्या जगाला मानवतावादाची शिकवण देऊन तो समाजामध्ये अधिकाधिक रुजावा यासाठी ते अहर्निश पेरियार मिशनचं नेतृत्व करत आहेत.

* **व्ही. कुमारसेन** हे चेन्नईच्या
अण्णा विद्यापीठात यंत्र अभियांत्रिकी विभागातील
ऊर्जा अध्ययन संस्थेत प्राध्यापक आहेत.

dktreasurer.tn@gmail.com/8838639737

---

** अनुवाद :*
*सुश्रुत कुलकर्णी / sushrutkulkarni@gmail.com/9822522475*

# किरण येले : सर्वसामान्य लोकांचा प्रातिनिधिक आवाज



ग्रंथ पुरस्कार (ललित)
**किरण येले,** मुंबई.
साहित्यकृती :
**तिसरा डुळा** : कथासंग्रह

किरण येले यांच्या 'तिसरा डुळा' या कथासंग्रहाला महाराष्ट्र फाउंडेशनचा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर झाला आणि फेसबूकसह अनेक समाजमाध्यमांतून 'आपल्या लेखका'ला पुरस्कार मिळाल्याची भावना व्यक्त होऊ लागली. ही गोष्ट खरीच आहे की, किरणने कायमच हे आपलेपण जपलं आहे. हे आपलेपण निव्वळ साहित्याशी संबंधित लोकांपुरतं मर्यादित नाही. तो ज्या नाटकाच्या जगाशी जोडला गेला आहे त्या ग्लॅमरस दुनियेमुळेही हे आपलेपण आलेलं नाही. तर या सगळ्यापेक्षाही किरण ज्या सर्वसामान्य माणसांचा स्वत:ला प्रतिनिधी मानतो आहे, त्यांना स्वत:च्या जगण्याविषयी लिहिता येत नाही म्हणून मी लिहिता झालो आहे असं म्हणतो आहे, त्या मनाने मोडलेल्या, नात्यांनी उसवलेल्या शेवटच्या स्तरातील माणसांशी जोडलेल्या आस्थेवाईक संबंधांतून आलेलं हे आपलेपण आहे. कष्टकऱ्यांच्या घामावर लिहिणारे किंवा तळागाळातल्या बायाबापड्यांच्या अन्याय आणि दु:खाला कथा-कादंबरीतून वाचा फोडणारे अनेक जण आहेत. काही जण याच निम्नस्तरीय शोषित-वंचितांच्या वर्गातून येऊन नव्या जगात स्थिरावले आहेत. पण किरण येलेचं वेगळेपण हे आहे की, तो आजवरच्या आपल्या रस्त्यावरच्या जगण्याच्या अनुभवांशी संबंधित माणसांना फक्त शब्दरूप देऊन थांबत नाही; तर तो त्या माणसांशी तितक्याच संवेदनशील मनाने जोडून राहिला आहे. म्हणूनच तर, लॉकडाउनच्या काळात सगळे जीवनव्यवहार

ठप्प झाल्यावर नाका कामगार, तृतीयपंथीय, भिकारी, सेक्सवर्कर्स, आदिवासी पाड्यांवरचे हातावर पोट असलेले कष्टकरी अशांची होऊ लागलेली उपासमार त्याला अस्वस्थ करत होती. आपल्या काही समविचारी सहकाऱ्यांच्या साथीने या लोकांच्या वस्त्यांवर जाऊन जीवनावश्यक वस्तू, किराणा, भाज्या वगैरे मदत पोचवायचा 'साहित्यबाह्य उद्योग' तो करत राहिला होता. आपल्या गावातील मोकळ्या जागांवर बिल्डरलॉबीचा डोळा आहे हे लक्षात येताच तिथे एकेका दिवंगत ज्येष्ठ साहित्यिकाच्या नावाने झाडं लावून उद्यान उभा करणारा किंवा महिन्यातील एका शनिवारी एकेका प्राथमिक शाळेत जाऊन, प्रामुख्याने झोपडपट्टी वा चाळीच्या पार्श्वभूमीतून आलेल्या सामान्य कुटुंबांतील मुलांशी गप्पा, गोष्टी, गाणी अशा माध्यमातून संवाद साधत, त्यांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देणारा किरण येले नावाचा माणूस समकालीन साहित्यिकांपेक्षा वेगळा ठरतो तो यामुळेच.

सामान्य माणसांचं महत्त्व अधोरेखित करताना तथाकथित लब्धप्रतिष्ठितांच्या दांभिक वृत्तीवर उपहासात्मक सुरात कोरडे ओढणाऱ्या'आम्ही चिल्लर...' या कवितेने किरणने काव्यरसिकांचं लक्ष वेधून घेतलं. ही कविता दोन हजार साली 'शकुन' या टोपणनावाने प्रकाशित झालेल्या 'चौथ्यांच्या कविता' या त्याच्या पहिल्या संग्रहात समाविष्ट केली गेली.लिहायला लागल्यावरही रस्त्यावरचा बिनचेहऱ्याचा एक सामान्य माणूस हीच आपली ओळख कायम राहील, हे त्याने पाहिलं. पण आपल्यातलं सामान्यपण टिकवणाऱ्या किरणला साहित्याच्या दुनियेत खरी ओळख मिळाली ती 'बाईच्या कविता'



या बहुचर्चित कवितासंग्रहामुळे. स्त्रीच्या स्त्री असण्याशी जोडल्या गेलेल्या असंख्य सूक्ष्म स्तरावरील भावजाणिवांविषयी, मानसिक आणि शारीरिक पातळीवरील संवेदनांविषयी, पुरुषी नजरेतून बाईला समजून घेताना आड येणाऱ्या अहंकाराविषयी पहिल्यांदाच मराठी कवितेत इतक्या कंगोऱ्यांनिशी कुण्या कवीने लिहिलं होतं. ही कविता स्त्रियांनाही स्वत:कडे अधिक चिकित्सेने पाहायला लावणारी आणि स्वत:ची नवी ओळख पटवून देणारी होती. बाईच्या अंतरंगात शिरून कधी तिच्या नेणिवेच्या पातळीवरील सूक्ष्म भावविभ्रमांचा शोध, तर कधी बाह्यकृतींच्या आड दडलेल्या दडपलेल्या इच्छा, आकांक्षा, वासना यांचा थेट उच्चार यांमुळे ही कविता विविध अभिरुचीच्या स्त्री-पुरुष वाचकांना आपलीशी वाटली.

कवितेकडून गद्य लेखनाकडे वळताना कवी म्हणून वाचकांच्या मनात असलेली आपली प्रतिमा धूसर करून नवी प्रतिमा ठसवायचं एक मोठं आव्हान लेखकासमोर असतं. अनेकांची यात फसगतही होते. किरण मात्र 'मोराची बायको'या कथासंग्रहामुळे बदललेल्या लेखन-प्रवासातही तितकाच यशस्वी झाला असंच म्हणावं लागेल. परिघावरच्या डुचमळणाऱ्या ज्या सर्वसामान्य माणसांचं जगणं चित्रित करण्याची आस किरणने बाळगली होती, त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकण्यात तो यशस्वी झाला होता. माणसा-माणसांमधील संबंध, नाती आणि बिननाती, त्यांतील ताणेबाणे, आकर्षण, ओढ आणि स्खलन, त्यामागील नैतिकता आणि नैतिकतेचं ओझं यांसारख्या, माणसांच्या अस्तित्वाशी जखडलेल्या, अनेक गोष्टींची चिकित्सा किरणने या कथांमधून केली आहे. स्त्री-पुरुष संबंधांच्या सूत्राच्या अनुषंगाने मराठीत आजवर अनेकांनी लिहिलं आहे. आधुनिक ई-काळाने जन्माला घातलेल्या आभासी जगात वावरणाऱ्या महानगरातील मध्यमवर्गीय, उच्चभ्रू आणि त्यांच्यासह चाळीतल्या, रस्त्यावरच्या सामान्य माणसांपर्यंत अनेकांच्या जगण्या-मरण्याशी हे नैसर्गिक व अनैसर्गिक स्वरूपाचे संबंध निगडित असतात. पण अशा प्रकारच्या लेखनाचा सर्वांत मोठा धोका असा की, आपले सिनेमा, नाटकं, टीव्ही मालिका आणि सवंग स्वरूपाचं रंजनवादी साहित्य यांमुळे अशा लेखनाला एक प्रकारचा बटबटीतपणा आपसूकच प्राप्त झाला आहे. त्यामुळेच साहित्याकडे गंभीरपणे पाहणारा वाचक अनेकदा अशा लेखनाकडे काहीशा साशंकपणे पाहतो. 'मोराची बायको'मधील किरणच्या कथांबाबतही हा धोका संभवू शकत होता. पण किरण स्वत: नाटक-मालिकांच्या दुनियेत वावरणारा असूनही या कथा कुठेही अकारण मेलोड्रामाटिक वा भावविव्हळ झालेल्या नाहीत. ज्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या कथा घडत जातात, त्या परिस्थितीच्या वास्तववादी चित्रणामुळे, मनोविश्लेषणात्मक चिकित्सेमुळे त्यांतील नैसर्गिकता टिकून राहते. नव्या जगाचा नागरिक बनलेल्या माणसाच्या मनातील भयगंड, संवादाची असोशी, मानसिक व शारीरिक असमाधान, त्यातून आलेली कुंचबणा व ती कोंडी फोडण्याची जीवघेणी धडपड, अशा काही आशयसूत्रांच्या सहाय्याने किरण माणसांतील संबंधांचा शोध घेताना दिसतो. हे करताना तो फॅन्टसी, संवादांची आधुनिक माध्यमं, स्वप्न आणि आभासात्मक निवेदनतंत्र, संज्ञाप्रवाह अशा अनेक प्रकारच्या रचनाबंधांचा चपखलपणे वापर करतो. बंबय्या हिंदीपासून ते आधुनिक जगण्यातील वेगवेगळ्या स्लँग्ज, बोली नमुने यांचं, पात्रांच्या सामाजिक-सांस्कृतिक स्तराप्रमाणे केलेलं उपयोजनही कथेतील वातावरणनिर्मितीला पूरक ठरतं.

'मोराची बायको'नंतरचं पुढचं अधिक आश्वासक पाऊल म्हणजे 'तिसरा डुळा' हा कथासंग्रह.

या संग्रहातील कथा वाचताना मला मराठीतले एक श्रेष्ठ कथालेखक भाऊ पाध्ये यांची आठवण होते, असं म्हटलं तर अनेकांच्या भुवया उंचावतील. पण जयंत पवार या, समकालातल्या महत्त्वाच्या कथाकाराप्रमाणे किरण येलेही मला या संग्रहातील कथांपुरता तरी भाऊ पाध्ये आणि सआदत हसन मंटो यांचा वारसा चालवणारा कथाकार वाटत राहतो. मुंबईसारख्या महानगरातील निम्नस्तरीय जगण्याचे सूक्ष्म तपशील, अधोस्तरावर कार्यरत असलेले आणि बाहेरच्या सुरक्षित जगाला जराही कल्पना न येणारे अंतर्गत संघर्ष, क्षणोक्षणी अंगावर येणारं अस्वस्थ करणारं दाहक वास्तव ज्या उघड्यावागड्या शैलीत भाऊ पाध्येंनी आपल्या साहित्यातून मराठीत आणलं, तीच परंपरा आजच्या वर्तमानात किरणही या कथांमधून चालवताना दिसतो आहे. रस्त्यावरच्या सर्वसामान्य फाटक्या, मोडक्या, भुकेकंगाल आणि जगण्याच्या लढाईत सतत पिछाडीवर ढकलल्या जाणाऱ्या; राजकारणाच्या खेळात प्याद्यांप्रमाणे वापरून गरज संपली की, चोळामोळा करून फेकल्या जाणाऱ्या माणसांच्या या कथा आहेत. त्यांची नावं, वस्त्या, देवधर्म वगैरे हिंदू, मुस्लीम वा ख्रिश्चन असल्यासारखी वाटली तरी ती सगळी स्वार्थी, व्यवहारी जगाकडून नागवली जाणारी बिनचेहऱ्याची माणसं आहेत. त्यामुळे धर्माने, नावाने मुसलमान असलेला हारुनफ्रेमवाल्याऐवजी लग्नाच्या वरातीत डोक्यावरून झुंबर वाहणारा धनकू किंवा जत्रेत शंकर भगवान बनणारा म्हादू अशी नावांची, त्यांच्या धर्मांची अदलाबदल केली तरी त्यांच्या वाट्याला आलेल्या जगण्याच्या संघर्षात काहीच फरक पडणार नाही. धर्माच्या नावावर पेटवलेल्या दंगलीत अत्यंत क्रूरपणे मारली जाणारी माणसं कुठल्याच एका विशिष्ट धर्माची नसतात. ती फक्त जगण्यासाठी, टीचभर पोटाची भूक शमवण्यासाठी आयुष्यभर आटापिटा करणारी सामान्य माणसं असतात. ज्या धर्माचं लेबल लावून ती आयुष्यभर जगत आलेली असतात, त्याच धर्माच्या माणसांकडून वेळप्रसंगी






ती मारली जातात. धर्म आणि राजकारणाच्या नावाखाली माणसांनी माणसांच्या जीवाशी चालवलेला हा अमानुष खेळ ‘तिसरा डुळा’मधील बहुतांश कथांचं मध्यवर्ती सूत्र म्हणून सांगता येईल. निमित्तं वेगवेगळी असली तरी, हा खेळ काळाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर सत्तेच्या दोऱ्या आपल्या हातात ठेवू पाहणाऱ्या प्रवृत्तींकडून सातत्याने खेळला गेला आहे. तो मंटोच्या काळात होता, इस्मत चुगताईच्या काळात होता, भाऊ पाध्येंच्या काळात होता आणि आताच्या वर्तमानातही तो तसाच खेळला जात आहे. या खेळाच्या सूत्रधारांना पाहू शकेल असा तिसरा डोळा ज्या संवेदनशील लेखक-कलावंतांना लाभलेला असतो, त्यांनाच त्या नृशंस खेळाची पाळंमुळं उघडी करण्याचं धाडस दाखवता येतं. आसपासच्या उघड्यानागड्या वास्तवाच्या खाली दडलेला आणि त्या वास्तवाला सतत धगधगत ठेवणारा राखेआडचा निखारा किरणसारख्या लेखकांनाच दिसत असतो. सामान्य जीवांच्या आयुष्याची राखरांगोळी करण्याच्या त्या निखाऱ्याच्या दाहक क्षमतेचं भान अशा लेखकांना असतं. म्हणूनच तर किरणसारखा लेखक लिहून जातो, देशभर पसरलेली दंगल आता, माणसं, वस्तू, धनधान्य, देव, प्रेषित, धर्मग्रंथ आणि तत्त्वं असं खूप काही जाळून शांत झाली होती. या सगळ्यापेक्षा दोन गोष्टी अशा होत्या, ज्या दिसत नसल्या तरी जळून संपल्या होत्या. एक – विश्वास आणि दोन – शांतता. (‘तिसरा डुळा’, पृ. ६९) माणसाच्या जगण्यातल्या या दोन गोष्टी –परस्परांवरचा विश्वास, नात्यांवरचा विश्वास, माणुसकीवरचा विश्वास आणि जगण्यातली शांतता, तना-मनाची शांतता – टिकून राहिल्या, तरच माणूस म्हणून आपलं अस्तित्व शाबूत राहू शकतं, याची एक अत्यंत समंजस आणि परिपक्व जाणीव किरण येलेच्या या कथांमधून अंत:स्तरावर पाझरत राहिली आहे. कुठल्याही एका विशिष्ट जाती-धर्माची बाजू न घेता अत्यंत तटस्थपणे लिहिलेल्या या कथा आजच्या खारवटलेल्या समाजमनाचं प्रत्ययकारी चित्र रेखाटण्यात यशस्वी झाल्या आहेत.

कविता आणि कथालेखनाप्रमाणे किरण येलेने नाटकाच्या क्षेत्रातही आपला ठसा उमटवला आहे. ‘प्लॅटफॉर्म नं. ९’, ‘बाई, अमिबा आणि स्टील ग्लास’ यांसारखी त्याची नाटकं मराठी रंगभूमीवर रसिकमान्य ठरली आहेत. टीव्हीवरच्या काही मालिकांसाठीही त्याने संवाद वा पटकथालेखन केलं आहे. एकूणच, आजचं वर्तमान वास्तव समर्थपणे शब्दांकित करण्याची क्षमता असलेल्या लेखकांमध्ये किरण येले हे नाव अग्रस्थानी आहे, असं विश्वासाने म्हणता येईल. लिहिण्याबरोबर सामान्यांच्या जगण्याच्या संघर्षातही त्यांच्यासाठी कृतिशील असलेल्या किरणचा यापुढचा प्रवास कसा असेल याचीही उत्सुकता आहे.

किरण येलेच्या भावी वाटचालीला शुभेच्छा!

– प्रवीण दशरथ बांदेकर

samwadpravin@gmail.com/ 9422036100

# ‘लिहिणं माझ्यासाठी थेरपी...’ – किरण येले

**किरण येले** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.



सर्वप्रथम महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेचे आभार, की, त्यांनी मानाचा ‘ललित ग्रंथ पुरस्कार’साठी ‘तिसरा डुळा’ या कथासंग्रहाची निवड केली. महाराष्ट्र फाउंडेशनच्या मुंबईत झालेल्या अनेक पुरस्कार वितरण सोहळ्यांना मी जातीने उपस्थित राहून त्याचं वेगळेपण अनुभवलं आहे. कधीकाळी आपण त्या मंचावर असू आणि आपल्याला हा पुरस्कार मिळावा हा विचार चमकून गेलाही, पण लगेच भानावर आलोही होतो – स्वप्नातून बाहेर यावं तसा. आज जेव्हा ‘हा पुरस्कार तुम्हाला देऊ इच्छितो’ असा दूरध्वनी सुप्रसिद्ध लेखक मुकुंद टाकसाळे यांनी केला, तेव्हा क्षणभर काही सुचलं नाही. तो विचार आठवला आणि आता जबाबदारी वाढली याचं भान आलं. अनेक माणसं आज आठवत आहेत ज्यांनी मला आज इथे आणून उभं केलं आहे. त्यांत सआदत हसन मंटो, सिल्विया प्लाथपासून जयंत पवार, नीरजा, सतीश काळसेकर, अनंत भावे, पुष्पा भावे, प्रवीण बांदेकर, अरुण म्हात्रे, संदेश ढगे आहेत ज्यांनी

कळत-नकळत माझ्यावर संस्कार केले. म्हणून या साऱ्यांचे आभार. खरं सांगायचं तर हा पुरस्कार माझ्या वाचकांचा आणि 'त्या रस्त्यावरच्या माणसांचा' आहे ज्यांनी मला कथा लिहायला भाग पाडलं. म्हणून हा पुरस्कार मी त्यांना मिळालेला पुरस्कार आहे असं मानतो.

खरंतर मला कधीच कथा लिहायची नव्हती. कविताही मी लिहीन असं मला कधीच वाटलं नव्हतं. भांडुपसारख्या वस्तीत जिथे रोजच्या जगण्याचा लढा सकाळी चाळीतल्या एकमेव नळाला येणाऱ्या पाण्याच्या रांगेत सुरू व्हायचा आणि रात्री रस्त्यावर तलवारी घेऊन धावणाऱ्या तरुणांना पाहत संपायचा, तिथे कविता कशी उगवली ते मला आजही कळलं नाही. त्यात मी कबड्डीसारखा रांगडा खेळ बऱ्यापैकी खेळायचो. नाक्यावर रात्री उशिरापर्यंत उभा राहायचो. त्यामुळे साहित्याशी अगदी दूरान्वयेही संबंध यायचा नाही. नाही म्हणायला, आमच्या चाळीत 'बब्या' नावाचा तरुण होता. तो गोदरेज कंपनीत चांगल्या पगारावर होता. पण थ्रील म्हणून कांजूरमार्गच्या हुमा टॉकीजवर ब्लॅक करायचा. मारामाऱ्या करायचा. तो भाई होता.. मी त्याच्यासोबत असायचो. बब्याला वाचनाची आवड होती. त्याचा उसुल होता – एरियात लफडी नाय करायची. त्यामुळे तो बाहेर लफडी करायचा आणि घरी परतल्यावर दारात खुर्ची टाकून सुहास शिरवळकर, बाबा कदम वाचत बसायचा. त्याच्यासोबत पुस्तक बदलण्यासाठी लायब्ररीत जाण्यापुरताच काय तो माझा साहित्याशी संबंध यायचा. मग बब्याच्या डोक्यात कुदळ घालून कुणीतरी त्याचा मर्डर केला आणि तो संबंधही संपला. पण रात्रदिवस नाक्यावर उभं राहणं चालू होतं. रात्री उशिरापर्यंत नाक्यावर श्याम बेनेगलच्या आर्ट फिल्मपासून ओशोच्या प्रवचनापर्यंत आणि थापभायपासून दाऊदपर्यंत चर्चा करायचो. शेखर सावंत नावाचा मित्र एका हातात जळती सिगारेट आणि दुसऱ्या हातात पुस्तक घेऊन यायचा आणि पुस्तकातलं काही सांगत राहायचा. डीवायएफआयची मुलं यायची आणि कम्युनिझम सांगत राहायची. या सगळ्यांच्या संगतीत कदाचित घुसळण होत राहिली असावी आणि नेमाडे सर म्हणतात तसं त्या दिवसभरच्या जगण्याचं ऊर्ध्वपतन होऊन एक ओळ यावी तशी एक ओळ आली.. 'आम्ही चिल्लर, सुटे पैसे' आणि मी कविता लिहू लागलो. मग मंटो वाचला आणि नाटक आलं. मग कधीतरी कथा.

मागे एकदा सुप्रसिद्ध लेखक श्रीकांत बोजेवार यांनी विचारलं, 'एक लेख हवा आहे. दोन दिवसांत देशील का? विषय – 'मी का लिहितो?' मी म्हटलं, 'हा प्रश्न तर मी खूप वेळा स्वत:ला विचारून झालो आहे. लेख दोन तासांतही देता येईल.' 'मी का लिहितो?' या प्रश्नाचं उत्तर देताना मंटो म्हणाला होता, 'तो आप पूछ रहे हो मै खाना क्यो खाता हू?' 'लिहिणं' ही मंटोसाठी नैसर्गिक क्रिया होती. माझ्यासाठी ती प्रतिक्षिप्त क्रिया आहे. 'मी का लिहितो' हा प्रश्न मी स्वत:ला अनेक वेळा विचारून झालो आहे आणि त्या प्रत्येक वेळेस मला एकच उत्तर मिळालंय, 'त्यांना लिहिता येत नाही म्हणून.' मंटो म्हणतो, 'अफसाना मेरी जेबमे पडा रहता है.' मला वाटतं, 'कथा आणि त्यातील पात्र माझ्या अवतीभवती कायम रेंगाळत असतात. माझं लक्ष जावं म्हणून माझा अनुनय करत असतात, माझ्या आत आणि बाहेर सतत गलका करत असतात. कधी माझा अनुनय करतात, तर कधी शिवीगाळ करतात. त्यांचे आवाज, बोलणं, रडणं, भेकणं, खिदळणं, विक्षिप्त वागणं मी पाहत असतो. कधी माझ्याही नकळत मी त्यांच्यासारखं वागून पाहत असतो. एकटं असताना मी अनेकदा गुडघ्यांवर रांगून पाहिलं आहे, अंधासारखं चालून पाहिलं आहे. बाईसारखे पाय वर करून पाहिले

आहेत. मी ती ती पात्रं जगण्याचा प्रयत्न करतो, यामुळेच असेल कदाचित, त्या त्या पात्रांची भाषा, वागणं, बोलणं, कथात्म परिसराचे बारीकसारीक तपशील माझ्या कथांतून अधिक येत त्या कथा दीर्घ होत असाव्यात. आजही 'मी का लिहितो' असा विचार करतो तेव्हा मला अनेक घटना आठवतात, त्यांतील दोन घटना ..

घरी परतायला रात्री खूप उशीर झाला की, मी ट्रेनच्या लगेज डब्यातून प्रवास करतो. या वेळेस डब्यात माथाडी कामगार असतात, समोसे विकून परतणारे असतात, केक-बिस्किटं विकणारे असतात, बारमधल्या मुलींना बार बंद झाल्यावर घरी सोडायला निघालेले तरुण असतात. पोटातला इवलासा, पण कितीही भरला तरीही रोज रिकामा होणारा जादुई खड्डा भरून काढण्यासाठी 'शरीरातला घाम आणि मनातला राम' विकून परतणारी ही माणसं त्या वेळेस संपूर्ण दिवसाचा लेखाजोखा एकमेकांना सांगत असतात. हा लेखाजोखा म्हणजे त्यांचा लढा असतो, त्या दिवसाचा, दुःखाशी, नियतीशी. तो लढा मला जगणं शिकवतो. तो ऐकण्यासाठी रात्री उशीर झाल्यावर मी नेहमी ट्रेनच्या लगेज डब्यातून प्रवास करतो. एक दिवस असाच उशिरा घरी परतत होतो. दारावर दोन तरुण हलक्या नशेत लटकत होते. एक दुसऱ्याला म्हणाला, 'सच बोल रहा हू भाईजान, मेरकू तो लगा सायराच है तुम्हारी.. पर सोचा, ऐसे जगह सारा कैसे?' आणि माझे कान तातडीने धावत जाऊन त्या दोन तरुणांशेजारी उभे राहिले. पहिला दलाल होता. त्याच्याकडे एक मुलगी आली होती जी हुबेहूब दुसऱ्याच्या वाग्दत्त वधूसारखीच दिसत होती. तो म्हणाला, 'भोत रो रही थी. घर जाना करके.' दुसरा काही क्षण गप्प राहिला, मग ठाम आवाजात म्हणाला, 'कल मय आता उधर.' पहिला म्हणाला, 'पागल हो गया क्या? आजतक ऐसी जगह नय जानेका बोलता रहा और अब निकाह तय हो गया तो उदर आता? क्यो?' दुसरा म्हणाला, 'उसकू छुडाने..' पहिला म्हणाला, 'अरे पर आजतक कभी नय किये तुम किसिको छुडानेकी बात; ईसीको क्यो?' दुसरा म्हणाला, 'क्यो की वो सायरा जैसी दिखती है.' आणि मी हादरलो. कुणीतरी फक्त आपल्या माणसासारखं दिसतंय म्हणून त्याचं दुःखही आपलं मानणारा तो दारू प्यायलेला तरुण मला डब्यातल्या इतर दारू न प्यायलेल्या माणसापेक्षा भानावर असलेला वाटला. त्या रात्री मी जे लिहिलं ती पहिली कथा. मला वाटतं, मी ती लिहिली कारण 'त्या तरुणाला लिहिता येत नव्हतं.'

दुसरा प्रसंग : माझी एक खूप सुंदर मैत्रीण होती. काळासावळा वर्ण, तकतकीत त्वचा, लांबसडक केस, सुडौल शरीर आणि वागण्या-बोलण्यात तडफदार. घरच्यांच्या मनाविरुद्ध तिने पळून जाऊन लग्न केलं. मग एक-दोन वर्षांनंतर मी घरात पुस्तकांचा पसारा मांडून काही करत असताना दारात एक बाई आली. कळकटलेली साडी, केसांचा वेडावाकडा कट, पिवळेशार दात, जाड भिंगाचा चश्मा. म्हणाली, 'किरण, कसा आहेस?' मी आश्चर्यचकित. म्हटलं, 'कोण आपण?' तर म्हणाली, 'अरे, ओळखलं नाहीस मला? मी भारती..' आणि मी हादरलो. नंतरचे दोन तास ती एकच विनंती करत होती, 'मला आयकार्ड बनवून दे. माझ्याकडे आता काहीच नाही माझं. सगळं नेलं रे त्यानं. उद्या कुणी विचारलं, कशावरून तू भारती? तर काय सांगू? काहीतरी पुरावा हवा न जवळ.' या घटनेंनंतरच्या अस्वस्थतेतून एक कविता आली..

*बाई नखं वाढवते*
*आणि आयुष्यभर*
*रंगवत राहते.*

– ती मी लिहिली, कारण 'तिला लिहिता येत नव्हतं.'

मी त्यांच्यासाठी जरी लिहीत असलो तरी मी हे सांगेन की, मी स्वत:साठी लिहितो. पण मी जरी स्वत:साठी लिहीत असलो, तरी स्वत:साठी लिहीत नाही. 'लिहिणं' ही माझी गरज आहे. मी नाही लिहिलं, तर माझ्या आतली ही सगळी पात्रं मला नीट जगू देणार नाहीत. ती सतत मला काही सांगत, दाखवत असतात, 'ते बघ, तिकडे बघ, काय चाललं आहे.. हे बघ, इकडे बघ.. तो काय करतोय.. तो भिकारी बघ, कसा बसलाय, तो काय खातोय पहा, कोंबडीचे पाय, जे तुम्ही फेकून देता. ती ती वेश्या बघ कशी उभी आहे. काय विचार करत असेल ती? तुला उभं राहता येईल तसं? झोपता येईल तिच्यासारखं पाय फाकवून?' मी नाही लिहिलं तर ही पात्रं मला माणसांतून उठवतील. मी वेडा होईन किंवा मला ब्रेन हॅमरेज होईल. अनेक वेळा बायको मला झोपेतून उठवत विचारते, 'काय बोलताय?' झोपेत मी नाही, माझ्या आतली पात्रं बोलत असावीत. झोपेत ती पात्रं किंवा त्यांच्यातला मी शोधत असेन आसपासच्या एखाद्या कृतीचे वा घटनेचे आंतरिक संदर्भ, त्या घटनेतले गुंते. हे सारं मी करतो ते लिहायचं आहे म्हणून नाही. मी लिहितो ते या साऱ्या त्रासाचा निचरा होऊन थोडं जगायला मिळावं म्हणून. ते लिहिताना मी पुन्हा ते जगतो, रडतो, गळाठल्यासारखा पडून राहतो दिवस-दिवसभर काही न करता हरल्यासारखा. मला माहीत आहे, हे आजारपण आहे माझं. तसंही कवी, लेखक असणं कधीही आनंददायी नाही वाटलं मला. तो शापच वाटला सरस्वतीचा, की, 'जा, आजपासून तुला जास्त जाणवत राहील कोणतीही गोष्ट. त्रास होत राहील सामान्य गोष्टींचा. दिसत राहील जे लपवून ठेवलंय तेच, ऐकू येईल मनात दाबलंय तेच.'

एक सुप्रसिद्ध वाक्य आहे, 'ए लिटिल रीडिंग इज ऑल द थेरपी ए पर्सन नीड्स समटाइम.' मला वाटतं, माझ्यासाठी 'लिहिणं' ही थेरपी आहे. मी लिहितो, कारण तोच एक पर्याय आहे माझ्याकडे स्वत:ला बरं करण्याचा.

ई.एल. डोटोरोव नावाचा लेखक म्हणतो, 'Writing is socially accepted form of Scizophrenia.' या वेडेपणातून काही सुलट वाटणाऱ्या गोष्टी वेड्यांना उलट दिसू लागतात. अशीच एक गोष्ट.

'Survival of the Fittest' हा सृष्टीचा नियम आहे. जो बलवान आहे, सशक्त आहे, प्रतिकूल परिस्थितीत तग धरू शकतो, त्यालाच या जगात जगण्याचा अधिकार आहे, असं हा नियम सांगतो. आपण पाहतो की, प्राण्यांत बलवान नर, जुन्या म्हाताऱ्या नराला पळवून कळपाचा ताबा घेतो. जनावरांचे कळप प्रवास करतानाही, नव्या जन्मलेल्या पिलांना मध्यभागी ठेवत, म्हाताऱ्या आणि आजारी प्राण्यांना मागे ठेवत प्रवास करतात. हेतू हा की, एखाद्या हिंस्र प्राण्याने हल्ला केला तर या नको असलेल्या प्राण्यांचा आधी बळी जावा. असे प्राणी आजारपणामुळे व थकल्यामुळे मागे राहिले तर कळप त्यांना टाकून पुढे निघून जातो. माणसाचं वेगळेपण इथेच आहे.

माणूस जनावर का नाही, तर माणूस सृष्टीचा हा नियम नेमका उलट करतो. थकलेल्या, आजारी, कमकुवत माणसांना मध्यभागी ठेवून त्यांना तगवण्याचा, जगवण्याचा प्रयत्न करतो, म्हणून तो 'माणूस' अशी माणूसपणाची व्याख्या आहे.

पण आपण पाहतोय की, अशा कमकुवत, आजारी, पिचलेल्या लोकांना संपवण्याचा प्रयत्न काही लोक करत आहेत. या सगळ्या कथा, अशा संपलेल्या लोकांच्या कथा आहेत.

या कथांना महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका या प्रतिष्ठित संस्थेने बहुमानाचा ललित ग्रंथ पुरस्कार प्रदान केला याबद्दल महाराष्ट्र फाउंडेशन अमेरिका या संस्थेचे मी आभार मानतो की, तुमच्यामुळे आता ही परिघाबाहेरची माणसं वाचकांना आणि समाजाला दिसू लागतील, त्यांचं जगणं समजू लागेल. या कथाजाणिवा ज्यांना आपल्या वाटल्या आणि त्यांनी या कथासंग्रहाची निवड केली ते माननीय परीक्षक सुप्रसिद्ध कथाकार आसाराम लोमटे, सुप्रसिद्ध कादंबरीकार कवी रवींद्र इंगळे उत्रादकर तसंच सुप्रसिद्ध विचारवंत किशोर बेडकीहाळ सर यांचे मनापासून आभार. माझे परिचित-अपरिचित वाचक – ज्यांनी अनेक वेळा मला लिहिण्यास बळ दिलं, माझ्या लेखनावर प्रेम केलं, रेटा लावला ज्यामुळे मी लिहीत राहिलो, ज्यांच्यामुळे मी जे मनाला वाटलं, भिडलं, खटकलं ते मांडत राहिलो – त्यांचेही आभार. आणि माझं हे असं रस्त्यावरच्या माणसांना पुस्तकात आणणं स्वीकारून ज्यांनी त्या माणसांच्या वेदना, दुःख प्रकाशित केलं त्या ग्रंथालीचे आणि सुदेश हिंगलासपूरकर यांचेही आभार.

kiran.yele@gmail.com
yelekiran@yahoo.co.in/9869260780

# वेदनेचं समूहगान : ‘तेरवं’

रा.शं. दातार नाट्यपुरस्कार
**श्याम पेठकर**, नागपूर
संहिता : **‘तेरवं’**

मी आगळावेगळा
माही न्यारीच जिंदगानी
माहे मरणबी आहे
खरं अवकानी पाणी
काया जमिनीतला कापूस
मले हरिक कवितेचा
त्याच्या भुईले गोळवा
गोड उसाच्या पेराचा
माह्या मरणाले कोणी
म्हणतील येळा
देह टांगता ठेवला
जसा फुलोऱ्यातला कानोला

उपरोक्त कविता शेतकऱ्याच्या आत्महत्येसंदर्भात आहे, हे वाचताक्षणीच लक्षात येतं. पण ही कविता एका आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याने लिहिलेली आहे असं कळल्यावर आपण कवितेकडे पुन्हा गांभीर्याने बघायला लागतो. विदर्भातील अकोल्याजवळील बाभुळगाव जहांगीर गावातील श्रीकृष्ण कळंब या शेतकऱ्याने स्वत:ला फासावर लटकवून घेतलं. पंचनाम्यात त्याच्या खिशात ही कविता सापडली. मरणगंध असणारी ही कविता शेतकऱ्याची वेदना उजागर करते. ‘मढं झाकून पेरणी करतो तो शेतकरी’ असा तुकारामांनी व्यक्त केलेला विश्वास भोवतालच्या वर्तमानात सध्या खंडित झाला आहे. शेतकरी जिवानिशी जातो. मुक्त होतो. जाळभाज उरतो तो मागे राहिलेल्या माणसांचा. विशेषत्वाने विधवा झालेल्या बायका पोळून निघतात. करपून जातात. या विधवा बायकांचा समूहस्वरातला दुर्लक्षित जाळभाज म्हणजे ‘तेरवं’ हा रंगमंचीय आविष्कार होय. ‘आम्ही तेरवं मांडलं बाई, तेरवं मांडलं माय’ असं म्हणत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या बायका रंगमंचावर स्वत: तेरवं घालतात तेव्हा आपण आतून हादरतो.

श्याम पेठकर हे ‘तेरवं’ दीर्घांकाचे लेखक. ‘शामभाऊ’ या नावाने प्रसिद्ध असलेला हा नाटककार मित्र पेशाने पत्रकार आहे. दीर्घकाळ वर्तमानपत्रात अनेक प्रयोग करणारा, अनेक नवोदितांना लिहितं

करणारा हा लेखक स्वभावाने जगन्मित्र आहे. नाटक, कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन अशा बहुविध लेखनप्रकारांत शामभाऊंनी स्वत:ची प्रतिभा पणाला लावली आहे. राज्य नाट्यस्पर्धेसाठी लागणाऱ्या हुकमी संहितेकरिता रंगकर्मींसाठी श्याम पेठकर हे खास ठेवणीतलं नाव आहे. स्पर्धांमधून अनेक प्रतिष्ठित पारितोषिकं मिळवून शामभाऊ स्पर्धेच्या चौकटीबाहेर पडले. कारण पारितोषिकांच्यावर जाऊन शामभाऊंना काही मूलभूत मांडायचं होतं. 'रगतपिती', 'एक होता माणूस', 'बंदी क्रमांक सत्तावन्न त्र्याण्णव', 'दाभोळकरचे भूत', 'दमन', 'टिंगल टिंगल लिटल स्टार', 'वेडा', 'अलकनंदा', 'श्रीकांत प्रभुणेची प्रेमकथा', 'डेबुजी डॉट कॉम,.. असं बहुरंगी नाट्यलेखन शामभाऊंनी केलं आहे.अनेक सन्माननीय रंगमंचावर या संहितांचे प्रयोग सादर झाले आहेत. ('दाभोळकरचे भूत' नाट्यप्रयोगाच्या निमित्ताने शामभाऊंना धमकीही आली होती. प्रयोगाच्या अगोदर एका निनावी संस्कृतीरक्षकाने वारंवार फोन करून 'प्रयोग केल्यास होणाऱ्या धोक्याची जाणीव' 'एक हितचिंतक' या नात्याने त्यांना बऱ्याचदा करून दिली होती. पण या धमकीकडे फारसं लक्ष न देता, तिचा फार गवगवा न करता नागपूरच्या वसंतराव देशपांडे रंगमंदिरात त्यांनी 'दाभोळकरचे भूत'चा दणदणीत प्रयोग केलाच.)

'ऋतुस्पर्श' हा ऋतूंवरील ललितबंधात्मक लेखांचा संग्रह समीक्षक-वाचकांनी एकसाथ गौरविला आहे. 'गावझुला' व 'भावलीचे लगीन' या दोन कादंबऱ्या. 'गावझुला' कादंबरीत अमूर्त शैलीत गाडगेबाबांना अधोरेखित केलं आहे. 'भावलीचे लगीन' कादंबरीवर चित्रपट येऊ घातला आहे. 'टिप्पारणी' सारख्या निवडक लेखांच्या संग्रहात शामभाऊंच्या सामाजिक जाणिवांची मांडणी आहे. 'टिकल ते पोलिटिकल' या दूरचित्रवाणी मालिकेसाठी केलेलं उपरोधिक- उपहासपूर्ण लेखन असो, की बहुचर्चित 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' मराठी चित्रपटासाठी केलेलं संवादलेखन असो – शामभाऊंच्या लेखणीची बांधिलकी ढळत नाही. महाराष्ट्र शासनाचे अनेक राज्य पुरस्कार, मटा सन्मान, भैरूरतन दमाणी पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी ही लेखणी गौरवान्वित झाली आहे.



माणसाचं निधन झाल्यावर हिंदू धर्मानुसार तेराव्या दिवशी एक धार्मिक विधी असतो. त्या दिवशी गोड जेवणाचा मोठा कार्यक्रम होतो. आजही खेडेगावांत मोठ्या प्रमाणात बुंदीचं (नुक्तीचं) गावजेवण दिलं जातं. या गोड जेवणामागे मृत्यूचं कटू दुःख विसरण्याचा संकेत आहे. पण झालेल्या मृत्यूचं कारण जेव्हा कर्ज, दुष्काळ, नापिकीमुळे केलेली आत्महत्या असते, तेव्हा इथे तेराव्याचा संदर्भच बदलून जातो. हे 'तेरवं' शोषक व्यवस्थेच्या प्रीत्यर्थ असतं. तेरवं घालायला पुढाकार घेणाऱ्या आहेत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा बायका. मराठी रंगभूमीचा अवकाश रंजन करून किंवा निरांजन ओवाळूनच थांबला नाही, तर या रंगमंचाने प्रसंगी भंजनही केलेलं आहे. स्त्रीची वेदना केंद्रस्थानी असलेल्या मराठी नाटकांची परंपरा मोठी आहे. सहज आठवतील अशी नाटकांची प्रातिनिधिक नावं घेतली तरी, बाला-जरठ विवाहाचा प्रश्ना अधोरेखित करणारं 'संगीत शारदा', स्त्रीला पशुपातळीवर नेणाऱ्या बीभत्स पुरुषी मानसिकतेचं दर्शन घडवणारं 'बेबी', रूढी-परंपरेत अडकलेली 'देवनवरी', विविध पातळ्यांवर वेगवेगळ्या अवस्थांत स्त्रियांची होणारी घुसमट मांडणारं 'चारचौघी'-'सावल्या', स्त्रीला जगणं असह्य करणाऱ्या पुरुषप्रधान विवाहसंस्थेला कटघऱ्यात उभं करणारं 'ठष्ट' अशी अनेक भंजनाची उदाहरणं देता येतील. कालानुरूप निर्माण झालेल्या प्रश्नामुळे स्त्रियांची झालेली घुसमट अशा नाटकांनी रंगमंचावर आणली. त्याच परंपरेत 'तेरवं' आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांचं दुर्लक्षित दुःख परिणामकारकरीत्या रंगमंचावर उजागर करते.

शेतकरी-आत्महत्येबद्दल खूप चर्चा झाली. अहवाल आले. सरकारं बदलली. दिलेलं पॅकेज संपलं. पण शेतकरी-आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्या करून शेतकरी मुक्त होतो, पण परिस्थितीने



लादलेलं वैधव्य घेऊन जगणाऱ्या बायकांची वेदना दुर्लक्षित राहते. तीच वेदना 'तेरवं'मध्ये समूहस्वरात सामोरी येते. नवऱ्याने आत्महत्या केली म्हणून मुळूमुळू रडत बसणाऱ्या या भावूक बायका नाहीत, तर संघर्षासाठी उभ्या राहिलेल्या लढवय्या आहेत. अर्थात हा लढा एवढा सोपा नाही. कारण बाईचं शरीर आणि मन चुरगळायला स्वत:च्या घरापासून सुरुवात होते. स्वत:च्या घरातच तिच्यासाठी मोठा अडथळा असतो. हे या संहितेचं आशयसूत्र आहे. घरच्या-दारच्या प्रत्येक पुरुषाला संधी वाटणारी विधवा बाई (नकारात्मक छटा असलेल्या 'विधवा' शब्दासाठी 'एकल स्त्री' हा चांगला पर्यायी शब्द संहितेत आहे.) या नाटकाची नायिका आहे.शेतकरी कुटुंबालाच कटघऱ्यात उभं करणारं आशयसूत्र मांडताना जोखीम होती. पण नाटकाच्या गीतप्रधान रचनेमुळे आशय नुस्ता स्फोटक न होता परिणामकारक झाला आहे. समूहनाट्य किंवा पथनाट्याची थेट प्रश्नाला भिडणारी आविष्कारशैली रंगमंचीय शैलीत मिसळून एक नवीन दृश्यबंध (रूपबंध) लेखक-दिग्दर्शकाने घडवला आहे. संहितेत रूढ अर्थाने कथानक नाही, तर विधवा बायकांच्या छोट्या छोट्या कहाण्या एकमेकीत बेमालूम गुंफल्या आहेत. थोडक्यात या संहितेची रचना म्हणजे एखाद्या समूहगानासारखी आहे. पीडित बायकांचा समूह या गाण्यातल्या अंतऱ्यात पूरक दृश्य सादर करतो आणि ध्रुवपदात ओव्यांच्या आर्त गायनाने (व पदन्यासाने) मथितार्थ ठळक केला जातो. (ओवीलेखन श्याम पेठकर व भैय्या पेठकर यांचं आहे. तर संगीतकार आहेत वीरेंद्र लाटणकर) दु:खाचं असलं तरी, ते गाणं आहे आणि कथानकाच्या सूत्रधार बायका असल्यामुळेच हे गाणं शक्य आहे. जात्यावर दळताना ओव्यांतून झिरपणाऱ्या दु:खाशी या गाण्याचं आंतरिक नातं आहे. प्रश्नांना घाबरून पुरुषांनी पळ काढलाय, पण बायका मात्र निश्चयाने उभ्या आहेत. आत्मभान जागृत झालेल्या



बायकांनी 'तेरवं' मंडळ स्थापन केलंय. हे मंडळ आत्महत्या झालेल्या घरी जाऊन नव्या एकल स्त्रीला नुस्ता धीरच देत नाही, तर लढण्याची ऊर्जा देतं. प्रत्येक घटनेतून समदु:खी बायका एकत्र येत जातात आणि लढवय्या बायकांचा समूह बनत जातो. या समूहभावनेतूनच परिस्थितीला सामोरं जाण्याचं बळ मिळतं. एरवी नाटकातील भूमिका सादर करणारे कलावंत रंगमंचावर अभिनय करतात तेव्हा आपल्यातला रसिक जागा होतो, आपण दाद देतो. 'तेरवं'मध्ये मात्र या विधवा बायका स्वत:ची कहाणी श्याम पेठकरांच्या शब्दात सांगत असतात तेव्हा आपल्यातला माणूस जागा होतो, आपण अंतर्मुख होतो. हे या नाटकाचे सामर्थ्य आणि संहितेचं वेगळेपण आहे. कानाला गोड वाटणारी वऱ्हाडी भाषा आणि अर्थपूर्ण पण स्वाभाविक संवाद आशयाचा परिणाम वाढवतात.

या संहितेची गोष्ट, दिग्दर्शक हरीष इथापे या रंगकर्मी मित्राने स्थापन केलेल्या 'ॲग्रो थिएटर'चा संदर्भ घेतल्याशिवाय पूर्ण होत नाही. दहा वर्षांपूर्वी शेतात स्थापन केलेल्या रंगमंचावर अनेक विधायक उपक्रम राबवले जातात. त्यांत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बायकांसोबत चर्चा करताना, त्यांचे प्रश्न समजून घेताना 'तेरवं' नाटकाची निर्मिती झाली आहे. इथापे आणि पेठकरांनी या बायकांसाठी नाट्य प्रशिक्षण शिबिर घेऊन त्यांच्यातला आत्मविश्वास जागवला. या पीडित बायकांना रंगमंचावर आणणं हाच मुळात वेगळा 'प्रयोग' आहे. मिट्ट काळोखात चमकवलेल्या विजेरीच्या प्रकाशात दिसलेलं दृश्य अवधान एकवटून घेणारं असतं. आत्महत्यांच्या निमित्ताने शेतकरी कुटुंबात निर्माण झालेले प्रश्न, नात्यात वाढलेले ताण, असाह्यता, शारीरिक-मानसिक शोषण यांना सामोरं जाण्याचा निर्धार आश्वासक ठरतो. हे आत्मभान रंगमंचापुरतं मर्यादित न राहता प्रत्यक्ष जगण्यात उतरतं तेव्हा नाटक फलद्रूप झालेलं असतं.

यवतमाळ इथे झालेल्या ९२व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटक म्हणून प्रसिद्ध लेखिका नयनतारा सैगल यांना दिलेलं निमंत्रण वापस घेतलं गेलं. संकुचित विचारातून विरोध झाला. मोठा वाद झाला. नवीन उद्घाटक कोण बोलवायचा असा पेच निर्माण झाला. अशा वेळी 'तेरवं' नाटकामुळे आत्मभान जागृत झालेल्या वैशाली येडे उद्घाटक म्हणून उभ्या राहिल्या. त्या भव्य रंगमंचावरून त्यांनी खडे बोल सुनावले, 'माणसं पुस्तकं वाचून नाही समजत. त्यासाठी माणसांतच जावं लागतं. तरीही साहित्यानं जगण्याचं बळ मिळतं. 'तेरवं' नाटकानं जगण्याचं बळ दिलं. बाई सोईला असते. बोलणारी बाई नाही चालत. डोलणारी अन् डोलवणारी पाहिजे असते. जुन्या काळापासून गोधन अन् स्त्री पण धनच आहे. आमच्या नशिबी आलेलं पांढरं कपाळ व्यवस्थेने आमच्यावर लादलेलं हाय. तो तर आत्महत्या करून मेलाच, पण आमच्या जित्तं असण्याचा कोणी विचारही नाही करत. म्हणून मग आम्ही 'तेरवं' मांडलं. या जिवंत भाषणानं नेहमीची उद्घाटकीय चौकट मोडून टाकली. या वैशाली येडे 'तेरवं' नाटकातील प्रमुख कलाकार आहेत. या एकल बायकांच्या विचारात बदल घडवणारं आणि जगण्यात बळ देणारं नाटक म्हणून 'तेरवं'चं स्थान मराठी रंगभूमीवर दखलपात्र आहे.

– दासू वैद्य

dasoovaidya@gmail.com/9403584111

## ‘लेखनानं खूप माणसं जोडता आली’ – श्याम पेठकर

**श्याम पेठकर** यांनी पुरस्काराच्या निमित्ताने व्हीडिओवर केलेलं भाषण.



‘तेरवं’ च्या निमित्ताने मला महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार जाहीर झाला. ‘तेरवं’ चे प्रयोग कोरोनाच्या काळामध्ये बंद होते. पण आता या निमित्ताने पुन्हा ‘तेरवं’ चर्चेत आलं आहे. आणि ते इथप्रत पोचलं होतं याचा मला मनस्वी आनंद झाला. कारण मी लिहितो ते माझ्या मनातलं, आमच्या मनातलं, समूहाच्या मनातलं काहीतरी सांगण्यासाठी लिहितो. या शेतीमाती आणि गावगाडा या संदर्भात आम्ही नेहमीच नियमित काम करत राहिलो. नंतर ‘नाम फाउंडेशन’ त्यामध्ये आलं, मग आम्ही ते काम करत होतो.

या शेतकरी महिलांसोबत काम करत होतो, तेव्हा नेहमीच असं वाटायचं की, विदर्भामध्ये पुरुषांनी, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या,पण त्या सगळ्या प्रतिकूल परिस्थितीशी बायका मात्र झगडत राहिल्या. म्हणजे ‘मर्दां’नी आत्महत्या केल्या, आणि या विधवा स्त्रियांनी मात्र प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करणं सोडलं नाही. या अशा एकूण नऊ ते दहा हजार महिला आहेत. त्यांना ‘बायका’ तरी कसं म्हणायचं? कारण त्यांचं सरासरी वय फक्त अठ्ठावीस वर्षांचं आहे. आणि वयाच्या केवळ बावीस-तेविसाव्या वर्षी त्या विधवा झाल्या आहेत. ज्या वयाच्या मुलींचा आपण लग्नाचा विचारही करत नाही, त्या वयात या मुली विधवा झाल्या

आहेत. अशा जवळजवळ नऊ हजार सातशे मुली आणि महिला आहेत.पस्तीस वयाच्या वर दहा ते वीस टक्केच मुली आहेत.

त्यांच्यासोबत आम्ही 'ग्रोथिएटर' नावाची संकल्पना सुरू केली. आम्हाला जाणीव झाली की, पूर्वी मजबूत असलेला गावागावातला सांस्कृतिक संवाद सध्या जवळजवळ संपला आहे, त्यामुळे देखील आत्महत्या वाढल्या असाव्यात. हा सांस्कृतिक संवाद पुन्हा सुरू व्हावा याकरता आम्ही त्यांचंच कथानक त्यांच्याच भाषेत, त्यांच्याच परिवेशामध्ये मांडलं जावं याकरिता हे प्रयत्न सुरू केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. अनेक गावांमध्ये हे प्रयोग झाले. त्यांच्याकडून त्यांचं कथानक रंगमंचावर करून घ्यायचं असाही विषय सुरू झाला. विदर्भामध्ये दिवाळीनंतर सुगीच्या दिवसांत दंडार आहे, गंगासागर आहे, असे खेळ खेळले जातात. ते बंध आता कमी झाले आहेत, अत्यल्प झाले आहेत. ते परत सुरू करण्याचे प्रयत्न आम्ही करू लागलो. आणि मग आम्ही या महिलांसोबत दिवाळी साजरी करायला गेलो. त्या वेळी शेकोटीपाशी बसून या महिलांशी बोलताना लक्षात आलं की, यांचा संघर्ष फार मोठा आहे.

मग मी एके दिवशी त्यांना एक प्रश्न विचारला की, या क्षणी किंवा आत्महत्येच्या आधी जर तुम्हाला तुमचा नवरा भेटला असता तर तुम्ही त्याच्याशी काय बोलला असता? यावर त्या फार हृदयद्रावक बोलत राहिल्या. एक महिला म्हणाली की, "मला आता बोलायला माणसं नाहीत." म्हणजे वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांना माहेरचे दूर करतात आणि सासरचे देखील. त्यांचं नाव सातबाराच्या उताऱ्यावर चढू नये म्हणून त्यांना दूर करतात. ती म्हणाली की, "बोलायला माणसं नाहीत, दुसऱ्याच्या शेतात कामाला जाता येत नाही, म्हणून मला माझ्या सासरच्या शेतातच वेठबिगारी काम करावं लागतं. मी फक्त झाडांशी बोलते आणि माझ्या लक्षात येतं की, बराटीचं झाड माझं ऐकतं, माझं बोलणं त्याला कळतं. तुरीच्या झाडाला माझं बोलणं कळतं, हे आता माझ्या लक्षात आलं आहे." आणि मग मी यावर नाटक लिहिण्याचा प्रयत्न केला. मी लिहिलं म्हणण्यापेक्षा त्या महिलांनी ते नाटक माझ्याकडून लिहून घेतलं. त्या सारख्या माझ्या मागे लागायच्या. ते नाटक लिहून झालं आणि हरीश इथापेच्या डोक्यात आलं की, ते नाटक आपण त्या महिलांकडूनच का करून घेऊ नये? मग आम्ही त्या महिलांकरता एक नाट्य प्रशिक्षण शिबिर घेतलं. आणि त्या नाटकाचे प्रयोग सुरू झाले. त्या निमित्ताने त्या महिलांचे प्रश्न मांडले गेले. यवतमाळच्या 'अखिल



भारतीय साहित्य संमेलना'चं उद्घाटन आमच्या नाटकातल्या वैशाली येडेने केलं. या महिलांच्या समस्यांवरचा उपाय काय आहे, तर त्यांचं लग्न झालं पाहिजे. आता त्यांची लग्नं होऊ लागली आहेत. वैशाली येडेचं लग्न झालं, आता नंदा राऊतचं होणार आहे.

माझं बाकीचं लेखन देखील समाजाचं किंवा खऱ्या माणसांचं जगणं मांडणारंच आहे. त्यावर नरहर कुरुंदकरांच्या विचारसरणीचा, किंवा गाडगेबाबांच्या किंवा सुदामकाका देशमुख यांच्या चळवळीचा प्रभाव आहे. माझ्या घरातलं वातावरणही मला या दृष्टीने सुसंगत मिळालं. माझे वडील तीन भाषांत पारंगत आहेत.माझ्या आईचं वाचन चांगलं आहे. माझा मोठा भाऊ लिहितो. मला भाग्यश्रीच्या रूपाने सोबतही तशीच मिळाली. ती पण लिहिते, गाते. माझी मोठी लेकही लिहिते. या पार्श्वभूमीवर माझं लेखनाचं पर्व सुरू झालं. मग नाटकाव्यतिरिक्त मी लेखनाचे बाकीचे प्रकार हाताळले. 'बाहुलीचं लगीन' ही कादंबरी लिहिली. मग 'ऋतुस्पर्श' हे निसर्गाच्या संदर्भातलं ललित लेखन केलं. ते निसर्गाच्या संदर्भातलं आहे.

मी 'दाभोळकराचं भूत' लिहिलं. त्या नाटकाचे प्रयोग मुस्कटदाबी केल्यासारखे अचानक थांबले. त्याचा एक वेगळा थरार असतो. आणि तो मला जास्त महत्त्वाचा वाटतो. लेखनाच्या माध्यमातून अशी अनेक माणसं येतात, सोबती येतात, अशी खूप माणसं मला लेखनाने दिली. तो मला माझा मोठा पुरस्कार वाटतो. आणि मग लोकांना मी अमुक लिहावं असं वाटतं अशा; लोकांना हवं असतं अशा; टाळ्या, शिट्ट्या येतील अशा; पुरस्कार येतील अशा; सत्कार होतील अशा लिखाणाकडे, म्हणजे 'जो बिकता है, वो लिखता है' अशा लिखाणाकडे माझा कल होईल का, या सगळ्या गोष्टींसाठी म्हणून आपण लिहितं होणार तर नाही ना, अशी मला भीती वाटते. तसं या पुरस्काराने होणार नाही, याची मला खात्री आहे. कारण हा पुरस्कार देण्यामागचं जे तत्त्व आहे, शास्त्र आहे, ते खूप वेगळं आहे. त्यामुळे या पुरस्काराने तसं होणार नाही असं मला वाटतं. तसं होऊ नये ही सगळ्यांच्या चरणी प्रार्थना! नमस्कार!

pethkar.shyamrao@gmail.com/8554982677

---

** व्हीडिओ भाषणाचं शब्दरूप :*
*शुभदा चंद्रचुड / smcmrc@gmail.com/9881402798*

## पाण्याचा जागल्या : प्रदीप पुरंदरे



ग्रंथ पुरस्कार (वैचारिक)
**प्रदीप पुरंदरे**, पुणे.
साहित्यकृती : **'पाण्याशप्पथ'**

'काडरबेस्ड संघटने'त दोन प्रकारचे कार्यकर्ते असतात. पहिले सतत 'ॲक्शन ऽऽऽॲक्शन' असं ओरडतात आणि कशाचीही पर्वा न करता स्वत:ला त्यात झोकून देतात. दुसऱ्या प्रकारचे कार्यकर्ते शांत, फारशा प्रतिक्रिया न देणारे, सतत अभ्यास करून वेगवेगळ्या पातळ्यांवर आपला विषय कसा प्रभावीपणे मांडता येईल आणि उद्दिष्टापर्यंत कसं पोहोचता येईल हा विचार करून त्यासाठी एकट्यानेच कृती करण्याची धमक अंगी ठेवणारे असतात. प्रदीप पुरंदरे हा या दुसऱ्या प्रकारात मोडतो. हिंदू-मुस्लीम, दलित-सवर्ण, शेतकरी-व्यापारी, हमाल-दलाल, मराठवाडा विद्यापीठाचं नामांतर हवं-नको अशा अनेक मूलभूत प्रश्नांवर आणि आंदोलनांत त्याची वैचारिक बांधिलकी पुरोगामी आणि समतावादीच होती आणि आजही आहे. अशा अनेक प्रश्नावर तो आवर्जून बैठकांना येतो, भाषणांना येतो, आपली संमती देतो, आर्थिक मदतही करतो. हे सारं फारसा गाजावाजा न करता. अगदी मूकपणे. पण हाच गडी दुष्काळमुक्ती, साक्षरता, उजनीधरण, जायकवाडी धरणाचे लाभ-हानी चर्चासत्र यांबाबतीत कायम आघाडीवर राहिलेला आहे. जायकवाडी धरणग्रस्तांचं उपोषण, मराठवाडा पाण्याचा अनुशेष, जलयुक्त शिवार योजनेमधील कंत्राटदाराचा हस्तक्षेप, वैधानिक विकास मंडळाच्या

कामकाजाचा लेखाजोखा हे त्याचे कायम जिव्हाळ्याचे आणि आस्थेचे विषय राहिलेले आहेत. जलसिंचन कायद्याच्या उपविधी बदलण्यासाठी करायचा पत्रव्यवहार असो, वा सिंचन आयोगासमोर मांडायची तांत्रिक बाजू असो, वा समन्यायी पाणीवाटपा संबंधीच्या सार्वजनिक हित याचिका असोत – या सर्व कामात प्रदीप पुरंदरे हा सर्वांच्या फार पुढे असतो.

धीरगंभीर चेहरेपट्टी, पांढऱ्या केसामुळे वाटणारे ज्येष्ठत्व, बाकदार नाक आणि उठणारा भालप्रदेश व्यक्तिमत्वावर शांततेची इतकी गडद झालर पांघरतो की, आत खळाळणाऱ्या आठमाही-बारमाही पाण्याचा पत्ताही लागत नाही. 'वाल्मी'सारख्या संस्थेत ३० वर्षं संशोधन, प्राध्यापकी करणारा हा आमचा मित्र जेव्हा एखाद्या वृत्तपत्रात नेमक्या भाषेत लेख लिहून सिंचन-पाटबंधारे-जलसंधारण खात्याची पार भंबेरी उडवून देतो, तेव्हा 'हाच का तो' असा प्रश्न मनात उभा राहतो. लेख इतका संयमी आणि मोजक्या भाषेत असतो की, धोरणकर्त्यांना त्यातील कोणतीच गोष्ट अमान्य करता येत नाही. आपल्या प्रत्येक युक्तिवादाला तो जल सिंचन वा पाटबंधारे खात्यातील जीआर, उपविधी, कायदे आयोगाच्या अहवालातील वेच्यांचे नेमके संदर्भ देत असतो. त्याचा लेख किंवा टिपण बिनतोड युक्तिवादाचा उत्कृष्ट नमुना असतो. गेल्या काही वर्षांपासून जागल्या (The Whistle Blower) म्हणून त्याने सामाजिक माध्यमातून जे लेखन सुरू केलं त्यामुळे तर जलधोरणाचे स्वरूप सामान्य लोकांना कळू लागलं. अलीकडे त्याचे अनेक मित्र त्याला 'पाण्याचा जागल्या' असंच म्हणू लागले.




पण प्रदीप काही एका रात्रीतून आणि वाचीव माहितीच्या आधारे 'जागल्या' बनला नाही. त्याने प्रत्यक्ष सिंचन खात्याचे अनुभव घेतले, कोंडमारा सहन केला, शासकीय सेवेच्या मर्यादा मान्य करून योग्य त्या मार्गाने संघर्ष केला. त्या मर्यादा ओळखून जिथे शक्य आहे तिथे चळवळीतील मित्रांना त्याने पाण्याचे प्रश्न आणि त्यामागील राजकारण समजून सांगितलं आहे. डाव्या आणि मध्यमक्रमी अशा सर्वच संघटनांत त्याचे मित्र आहेत. शहादा भागातील सर्व श्रमिक संघटना, लाल निशाण, सीटू, सीपीआय, युक्रांद, सेवादल, हमाल मापाडी, रिपब्लिकन, समाजवादी यांच्यापैकी ज्यांना ज्यांना पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा वाटतो, त्या सर्वांबरोबर प्रदीपचे सूर जुळलेले असतात. मला आठवतं, तो 'मराठवाडा' दैनिकात

काही लेख आणून देण्यास येत असे आणि त्या वेळी संपादक असलेल्या पन्नालाल सुराणा यांच्याशी चर्चा करत असे. तेव्हा तो 'वाल्मी'त होताच.

'सिंचन नोंदी' या नावाने त्याचं एक सदरसुद्धा मग पुढे सुरू झालं. या सदरातील काही मुद्द्यांमुळे केंद्रीय जल सचिव माधवराव चितळे दुखावले गेले आणि त्यांनी महाराष्ट्र जल सचिवांना चक्क पत्रच लिहून 'या पुरंदरेंना आवरा' अशी विनंती केली. झालं असं की, 'माते नर्मदे' या दत्तप्रसाद दाभोळकर यांच्या पुस्तकावर प्रदीपने 'समाज प्रबोधन पत्रिके'त लेख लिहिला होता. त्यात प्रदीपने सिंचन धोरणं आणि मोठ्या धरणाबाबतचे सरकारचं नियोजन याविषयीची आपली परखड निरीक्षणं नोंदवली होती. ती केंद्रीय जल सचिवांना आवडली नाहीत. नेमक्या त्या लेखापूर्वीच 'मराठी विज्ञान परिषदे'च्या एका चर्चासत्रात प्रदीपने 'महाराष्ट्रातील सिंचनाची स्थिती' यावर शोध निबंध सादर केला होता. चर्चासत्रात जल सचिव सहभागी होते. शोध निबंधातील काही मुद्द्यांमुळे ते नाराज झाले होते. प्रदीप वाल्मीत असल्याने एका अर्थाने शासकीय सेवेतच होता आणि तरीही त्यानं सत्यकथन केल्यानं जल सचिव नाराज होणं क्रमप्राप्तच होतं. तसे ते झाल्यावर पुरंदरे यांचे 'सिंचन धोरणासंबंधीचे गैरसमज दूर करण्याचे पत्र'च निघाले. मग शासकीय पाणी शहांनी त्याचा सोयीचा अर्थ काढून प्रा. प्रदीप पुरंदरे यांच्यावर बंडखोरीचा शिक्का उठवलाच! सोलापुरातून महाविद्यालयीन आणि कर्नाटकातून इंजीनिअरिंगचं शिक्षण पूर्ण केल्यावर पाटबंधारे खात्यात उजनी प्रकल्पावर प्रदीपला पहिली नेमणूक मिळाली. आणि त्याच्या लक्षात आलं की, 'या खात्यातील 'कार्य(?)संस्कृती' आपल्याला मानवणारी नाही. त्यामुळे दुसरीकडे मुक्काम हलवला पाहिजे.' पाटबंधारे खात्यात असल्याने पाण्याचा जो काही संबंध येतो तेव्हढाच त्याचाही होता. फरक एवढाच की, धोरण, नियम आणि अंमलबजावणी यापलीकडे जाऊन हा पाटबंधारे खात्याचा कर्मचारी प्रामाणिकपणे 'पाण्या'कडे पाहत होता. उजनी धरणावरील अधिकाऱ्यांनी प्रदीपची ब्याद कटवण्यासाठी औरंगाबादस्थित 'वाल्मी' इथे त्याला १० महिन्यांच्या एका प्रशिक्षणासाठी पाठवलं. हे प्रशिक्षण त्याच्या करिअरमधील 'टर्निंग पॉइंट' ठरला. 'वाल्मी'ने आपल्याला 'जलसाक्षर' बनवलं, असं प्रदीपचं म्हणणं आहे. पण हीच जलसाक्षरता आणि पाणी व्यवस्थापनाचं ' 'वाल्मी' मॉडेल' त्याने जेव्हा उजनी प्रकल्पाच्या टेंभुर्णी लाभ क्षेत्रात राबवायचं ठरवलं, तेव्हा आपण इथेही 'मिसफीट' आहोत असं त्याला वाटलं आणि मग लगेच चालून आलेली 'वाल्मी' मधीलच प्राध्यापकी त्याने स्वीकारली. पाटबंधारे खातं, लाभ क्षेत्रातील पाण्याची गणितं, धरणावरील अधिकाऱ्यांचे हितसंबंध, त्यांची जल-कायद्याविषयीची अनास्था लक्षात आल्याने नेमकं काय करता येऊ शकेल याचा अंदाज प्रदीपला आला. त्याच्या म्हणण्यानुसार तो 'वाल्मी'त आला आणि त्याला पुढची दिशा सापडली.' अभियांत्रिकीची पदवी, रूडकीला पदव्युत्तर शिक्षण आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेऊन प्रदीपने आपलं ॲकॅडेमिक शिक्षण आधी पूर्ण केलं होतं. पण त्याचा पाणीविषयक दृष्टिकोन तयार झाला तो 'वाल्मी' या संस्थेतच. आणि याच काळात मराठवाडा भागात सातत्याने पडणाऱ्या दुष्काळाने 'जायकवाडी प्रकल्पा'च्या उपयुक्ततेविषयी प्रश्नचिन्ह निर्माण केलं. पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या 'जनता विकास परिषदे'ने या विभागाच्या समन्यायी पाणीवाटपाचा, पाण्याच्या अनुशेषाचा मुद्दा उपस्थित केला. त्यासाठी जी आंदोलनं झाली त्यांनीही प्रदीपचा पाण्याविषयीचा चिंतनात्मक दृष्टिकोन दृढ केला.

*तुम पानी जैसे बनो, जो अपना रास्ता खुद बनाता है*
*पत्थर जैसे न बनो, जो दुसरों का रास्ता रोक लेते हैं*

– हे ‘वाल्मी’त असतानाच त्याने ठरवलं आणि आपला मार्ग निश्चित केला.

कालव्याचं ऑपेरेशन, पाण्याचं ऑडिट, जलसिंचन प्रकल्पाचे मापदंड, सिंचन कायदे आणि नियम, पाणीपट्टी वसुली आणि सनियंत्रण, अशा विषयांचा प्रशिक्षक असणाऱ्या प्रदीपने प्रत्यक्ष कालवे, धरणं, चाऱ्या, बंधारे पालथे घालून पाणी पाळी, पाण्याचा ताण, आठमाही सिंचन, उसाला दिलं जाणारे पाणी, शहरी पाणीपुरवठ्यातील त्रुटी हे व्यावहारिक पातळीवर अनुभवलं होतं. त्यामुळे तो कायम ‘जागल्या’च्या भूमिकेत राहिला. त्याने जेव्हा ‘मराठवाडा’ दैनिकातून ‘सिंचन नोंदी’ हे सदर सुरू केलं, तेव्हा सिंचन विषयावर सटीक लिहिलं जाणारं ते पहिलंच सदर ठरलं.

त्याची पुढे पुस्तिका झाली. या पुस्तकाला तत्कालीन केंद्रीय अन्नमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी नेमकी प्रस्तावना लिहून प्रदीपच्या दृष्टिकोनास पाठिंबाच दिला होता. प्रदीपचं या आपल्या पहिल्या पुस्तिकेविषयी म्हणणं असं की, ‘आपल्या सिंचन प्रकल्पांमध्ये सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वेगाने कमी होतेय. त्यामुळे प्रकल्पांच्या सिंचनक्षमता लक्षणीयरीत्या खालावत आहेत. आजच्या सिंचन प्रकल्पांत ना धड अभियांत्रिकी आहे, ना व्यवस्थापन. आहे ते फक्त भ्रष्ट, गलथान आणि सर्व प्रकारचे स्वार्थी हितसंबंध जोपासणारं प्रशासन. त्यामुळे नियंत्रणशून्य पाणीवापर होत असून आपले सिंचन प्रकल्प मोठ्या प्रमाणावर आजारी आहेत. कालवा चालवण्याचं आणि एकंदरीत सिंचन प्रकल्प उभारण्याचं आपलं तंत्र मुळातच अत्यंत मागास, जुनाट आणि अवैज्ञानिक आहे. नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान लोकाभिमुख वैज्ञानिकतेच्या दृष्टिकोनातून आणलं गेल्यास आणि शेतकरी नियंत्रित पद्धतीने राबवले गेल्यास निश्चित फरक पडू शकतो. हा दृष्टिकोन घेऊन मी ‘सिंचन नोंदी’ लिहिल्या.’

पाणी-जागरूकतेविषयी ‘लाभक्षेत्रे- कुरुक्षेत्रे’ नावाचं अतिशय गंभीर असं सदर औरंगाबादच्या ‘साप्ताहिक आधुनिक किसान’मधून प्रदीप लिहीत असे. पुढे ‘मानव लोक’ या संस्थेने या सदराची ‘विधिलिखित’ ही पुस्तिका केली. या पुस्तिकेत त्याने सिंचन कायदे अमलात यावेत म्हणून वैयक्तिक आणि सामूहिक पातळीवर काय प्रयत्न झाले आणि ते निरर्थक कसे गेले याची खंत व्यक्त केली होती. त्याचबरोबर महाराष्ट्रात येऊ घातलेल्या सिंचन कायद्यांची अंमलबजावणी कशी होत नाहीय, पुढचं पाठ





मागचं सपाट अशी शासन दरबाराची परिस्थिती, पाणी मिळणारे आणि न मिळणारे या दोन गटांत महाराष्ट्राची झालेली विभागणी आणि पर्यायाने पाण्यावरून होणारं युद्ध याचे सारे संकेत 'विधिलिखित' मधून प्रदीपनं दिले होते. या लेखनाच्या काळातच तो त्याच्या प्रिय 'वाल्मी' संस्थेतून निवृत्ती घेण्याच्या तयारीत होता. सिंचन आठमाही-बारमाही, कायदे, सार्वजनिक हितयाचिका, वैधानिक विकास मंडळ आणि त्यामार्फत मागास विभागाच्या पाण्याचे हक्क यांबद्दल त्याने महाराष्ट्रातील जवळपास सर्व वृत्तपत्रं, वाहिन्या, ब्लॉग्ज, फेसबुक यांच्यामार्फत जागृती मोहीमच हाती घेतली होती. १९८५ मधील साक्षरता अभियानात तो पूर्ण वेळ काम करत होता. आता 'जल-साक्षरते'साठी तो 'पाण्याचा जागल्या' झाला होता. 'वाल्मी'चं बिघडत चाललेलं स्वरूप पाहून त्याने एकट्यानेच संस्थेबाहेर उपोषण केलं. 'केळकर समिती'च्या अहवालात आणि 'गोदावरी जल-आराखडा' तयार करण्याच्या कामात प्रदीपने ठोस भूमिका निभावली. काही शासकीय जल समित्यासाठी त्याने काम केलं. न्यायालयीन लढाईत सुद्धा तो पुढेच राहिला. पाण्यासाठी काम करणाऱ्या अनेक छोट्या-मोठ्या संस्थांच्या व्यासपीठावरून त्याने पाण्याच्या जागल्याचं काम निभावलं.

प्रदीप आपल्या काही पाणीविषयक भूमिका कधीच सोडत नाही. आणि त्यासाठी तो शासन दरबारी पाठपुरावा करताना कंटाळत नाही. अनेक वेळा तो सिंचन धोरणासाठी ॲडव्होकसीसुद्धा करतो आणि संघर्षसुद्धा. 'पाण्याशप्पथ' या त्याच्या तिसऱ्या महत्त्वाच्या पुस्तकात राज्याच्या पाणी प्रश्नाचा आढावा, जल नीती, चार कायदे आणि त्यांचा अन्वयार्थ, पाण्याचं अंदाजपत्रक, पाणीपट्टी आकारणी, कालवा देखभाल, सिंचन घोटाळा, सिंचन श्वेतपत्रिका, बारमाही, चितळे समितीविषयीची परखड मतं, मराठवाड्याचं पाणी आणि विकासाची करुणाष्टकं, जायकवाडीची शोकांतिका, शिरपूर पॅटर्न, जलयुक्त शिवार, नदीजोड प्रकल्प अशा अनेक विषयांवर आपली रोखठोक पण संयत मतं मांडलेली आहेत. जल कायदे, जल निर्णय हे तसे शासकीय परिभाषेत असल्याने कळण्यास अवघड जातात. पण प्रदीपने कायद्याच्या कलमांचा नेमका अर्थ आणि अन्वयार्थ समजून सांगितल्याने 'पाण्याशप्पथ' हे सिंचन व्यवस्थेतील तपशील आणि तथ्य लोकाभिमुख दृष्टिकोनातून कसं मांडता येऊ शकतं, याचं नमुनेदार उदाहरण ठरलेलं आहे. मराठीत प्रथमच असं लेखन होत असल्यानं प्रदीप पुरंदरे हे प्रशंसेस पात्र आहेत.

'पाण्याचा जागल्या' होणं ही खडतर गोष्ट आहे. त्यासाठी अभ्यास, कोरडवाहू जनतेशी बांधिलकी, संघर्षाची तयारी, माध्यमं हाताळण्याचं कसब आणि जिद्द असावी लागतेच. प्रदीपमध्ये हे गुण आहेतच, त्याबरोबर 'वाल्मी'त त्याची सहकारी असणारी आणि संसारात त्याला भक्कम साथ देणारी विद्या हिचंसुद्धा योगदान हा 'जागल्या' घडवण्यात आहे.

– निशिकांत भालेराव
nishikant.bhalerao@gmail.com/ 9881098156

# पाण्याशप्पथ खरं सांगेन...



**प्रदीप पुरंदरे** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

'पाण्याशप्पथ' या माझ्या पुस्तकाला अर्ज वगैरे न मागता सन्मानपूर्वक पुरस्कार दिल्याबद्दल महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेचा आणि दोन्ही पुरस्कार-निवड-समित्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

'पाण्याशप्पथ' ची सुरुवात 'आधुनिक किसान'मधील माझ्या 'लाभक्षेत्रे-कुरूक्षेत्रे' या लेखमालेपासून झाली. अनेक वर्तमानपत्रांनी माझे सिंचनविषयक लेख छापले. हे सर्व लिखाण 'लोकवाङ्मय गृहा'ने पुस्तकरूपात प्रकाशित केले. दत्ता देसाईंनी अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली. 'आधुनिक किसान'चे संपादक निशिकांत भालेराव, लोकवाङ्मय गृहाचे डॉ. भालचंद्र कानगो व श्री. दत्ता देसाई यांचे मन:पूर्वक आभार. सिंचन प्रकल्पातील शेतकरी आणि जलसंपदा विभागातील अभियंते यांनी सिंचन या विषयात मला प्रशिक्षित केलं. मी त्यांचा आभारी आहे. विद्या - माझी पत्नी - तिने मला सदैव समर्थ साथ दिली. धन्यवाद, विद्या.

जलविकासाचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. मृद व जल संधारण, विहिरी, सर्व प्रकारचे छोटे-मोठे सिंचन प्रकल्प, उपसा सिंचन, इत्यादी. जो पर्याय निवडला त्या पर्यायाशी प्रामाणिक राहणं, त्याची पथ्यं पाळणं, तो जास्त चांगल्या प्रकारे विकसित करणं अपेक्षित असतं. वैद्यकीय क्षेत्रातलं उदाहरण घेऊ या. ॲलोपथी, होमिओपथी, आयुर्वेद, युनानी... अनेक पर्याय आहेत. त्यांतून समजा तुम्ही ॲलोपथी निवडलीत. आता ती यशस्वीपणे अमलात आणायची असेल तर किमान एमबीबीएस डॉक्टर हवा. रोगाचं निदान करण्यासाठी काही तपासण्या कराव्या लागतात; त्यासाठी लॅबोरेटरीज् आवश्यक.उपचारांसाठी औषधं लागतात. विशिष्ट सोयी-सुविधा व उपकरणं असलेले दवाखाने

आवश्यक असतात. पण कोणी जर म्हणायला लागलं की, हे काही मिळणार नाही आणि तरीही ॲलोपथीप्रमाणेच उपचार करा, तर आरोग्य-व्यवस्था ठप्प होईल. आणि मुख्य म्हणजे रुग्ण दगावतील. सिंचनाच्या बाबतीत नेमका हा प्रकार झाला आहे. कालौघात काही विशिष्ट कारणांमुळे आपण छोट्या-मोठ्या सिंचन प्रकल्पांची ॲलोपथी स्वीकारली. पण ती कार्यक्षमपणे अमलात आणण्यासाठी ज्या बाबी करायला पाहिजेत त्या मात्र आपण केल्या नाहीत. करत नाही. पाण्याचा अभ्यास करायला जल-वैज्ञानिक नाहीत. जल-नियोजन आम्ही करत नाही. देखभाल-दुरुस्ती दुर्मीळ झाली. पाणी मोजायला प्रवाहमापक नाहीत. पाण्याचं नियमन करायची व्यवस्था नाही. विहित पद्धती (एसओपी) आम्ही विसरलो. पन्नास टक्के पदं रिक्त. कायदे उदंड, पण ते अमलात आणायला नियम नाहीत, अधिकाऱ्यांची कायदेशीर नियुक्ती नाही. सिंचनप्रकल्पातील अनागोंदी व अराजक 'पाण्याशप्पथ'ने उघडं केलं. महाराष्ट्रातील सिंचनप्रकल्पांच्या दारुण वास्तवाचा तपशील 'पाण्याशप्पथ'मुळे पहिल्यांदाच समाजापुढे आला.

सिंचनप्रकल्प म्हणजे प्रस्थापित विकास नीतीचा ग्रामीण व शहरी भागांना पाण्याने जोडणारा बालेकिल्ला! समन्यायी पाणीवाटपाचा संघर्ष त्या बालेकिल्ल्यापर्यंत न्यायचा असेल तर सिंचनव्यवस्था नीट अभ्यासा, प्रकल्पस्तरावर परिणामकारक हस्तक्षेप करा, आहे त्या व्यवस्थेत प्रथम लोकसहभाग वाढवा, ती राबवण्याचा प्रयत्न करा, जनरेटा निर्माण करा आणि मग व्यवस्थाबदलाचे प्रयत्न करा..... हे 'पाण्याशप्पथ' मधील मांडणीचं मध्यवर्ती सूत्र आहे.

धरणातल्या पाण्याचं शास्त्रीय नियोजन, धरण आणि कालव्यांची देखभाल-दुरुस्ती व कार्यक्षम प्रचालन, पाणीवाटपाच्या वेळापत्रकांची काटेकोर अंमलबजावणी, पाण्याचं अचूक मोजमाप आणि विश्वासार्ह नोंदी, पाण्याचा हिशेब व जललेखा ...या सर्वांकरिता विहित पद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान व कायदे उपलब्ध आहेत. त्यांची अंमलबजावणी न करणं हा गुन्हा आहे. हजारो कोटींची गुंतवणूक वाया घालवणं आहे. धरणं हवीत का नको हा प्रश्न पूर्ण झालेल्या सिंचन-प्रकल्पांबाबत गैरलागू आहे. आम्ही धरणांचे विरोधक म्हणून त्या प्रकल्पांकडे वट्टात बघणार नाही, ही भूमिका सिंचन घोटाळा करणाऱ्यांना रान मोकळं सोडते. जलविकासाची पाटी कोरी नाही. त्या पाटीवर जी काही गिचमिड झाली आहे ती लगेच पुसून टाकता येत नाही. काय असायला हवं आणि ते कसं मिळवायचं याची सुरुवात जे आहे त्यापासून होते. जलविकासाच्या प्रत्येक पर्यायाला मर्यादा आहेत. त्या ओळखा. इतर पर्यायांबरोबरचे नातेसंबंध जपा. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विसंगती असतात. विसंगतींचं व्यवस्थापन करतच मार्ग काढावा लागतो. अभिनिवेशातून एकारलेपण येतं. ते टाळा. 'पाण्याशप्पथ'चं म्हणणं एवढंच आहे. हे मागणं लै नाही बाप्पा!.

pradeeppurandare@gmail.com/9822565232

# विजा झेलणारं झाड : अरुणा सबाने

कार्यकर्ता पुरस्कार (प्रबोधन)
**अरुणा सबाने**, नागपूर

अरुणा सबाने हे नाव गेली दोन-अडीच दशकं विदर्भात ओळखलं जातं, ते मुख्यत: स्त्रियांचे प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरणारी धाडसी कार्यकर्ती म्हणून. सीमा साखरे आणि रूपा कुलकर्णी यांच्या पुढच्या पिढीतील अरुणा सबाने यांनी वाणीसह आपल्या लेखणीलाही प्रबोधनाची चूड लावली. म्हणून त्यांची प्रत्येक कृती त्यांच्या स्वत:सकट त्यांच्या भोवतालच्या महिलांनाही स्वातंत्र्याची ऊब मिळवून देणारी ठरली. दाभोलकर-पानसरे यांच्या हत्यांपासून उभ्या झालेल्या 'दक्षिणायन' चळवळीच्या निमित्ताने सबाने यांचं नाव महाराष्ट्रातील लेखक-कलावंतांच्या परिचयाचं झालं.

स्त्रियांचे प्रश्न असोत, की लेखकांचं अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि असहिष्णुतेचा मुद्दा असो – अरुणा सबाने हे सातत्याने पुढे येणारं नाव महाराष्ट्राला आता नवीन राहिलेलं नाही. पण त्यांच्या जवळच्या माणसांना त्यांच्या एकापेक्षा अनेक भूमिका माहीत आहेत. त्या संवेदनशील विषयावर लिहिणाऱ्या लेखिका आहेत, ध्येयवादाने भारित झालेल्या संपादक आहेत, प्रकाशिका आहेत. घराच्या



चार भिंतीआड अत्याचार सोसणाऱ्या मूक पीडितांच्या त्या प्रवक्त्या आहेत आणि रात्रीबेरात्री घराबाहेर काढून टाकलेल्या महिलांच्या त्या आधार आहेत. आपल्या खासगी आयुष्यात त्या एक आदर्श आई, सासू आणि आजी तर आहेतच; पण त्यांचं खाजगी आयुष्य तरी कुठे संपतं आणि सार्वजनिक जीवन कुठे सुरू होतं, हेही त्यांना ओळखणाऱ्यांना कधी कळलं नाही. कारण आपलं हक्काचं घर सोडून आलेली खंबीर स्त्री, मुलांची जबाबदारी स्वीकारणारी आई आणि आपल्या भोवतालच्या पीडित महिलांना बळ देणारी कार्यकर्ती अशा त्यांच्या विविध भूमिका एकमेकीत मिसळलेल्या आहेत. अनेकदा आयुष्यातील वेगवेगळ्या भूमिका वेगवेगळ्या उद्देशाने घेतलेल्या असतात. त्यांत एकात्मता असतेच असं नाही. परंतु अरुणा सबाने यांच्या सगळ्या भूमिकांचं बीज एकच आहे. एक खंबीर स्त्री, आई, लेखिका, मोर्चातील कार्यकर्ती, प्रकाशक, संपादक, वसतिगृहाची संचालक आणि आयुष्यातून उठलेल्या बायकांच्या आधारवड. या वृक्षाने स्वत:च आपल्या अंगावर किती विजांचे प्रहार झेलले असतील? पण तरीही या फांद्या आकाशात उंच उंच वाढत गेलेल्या दिसतात.

अरुणा सबाने ह्यांनी आपलं घर सोडलं (म्हणजे सोडावं लागलं) ही दुर्दैवी घटना. पण त्या दुर्दैवाचे दशावतार लोकांपुढे सांगत बसल्या नाहीत. अरुणा सबाने यांनी मुलांना मोठं करताना स्वत:लाही मोठं केलं. सगळ्या प्रकारच्या संघर्षातून जाताना पुन्हा स्वत:ला आपल्या कथा-कादंबऱ्यांतून उभं केलं. एव्हढंच नव्हे, तर परंपरा, नातं आणि स्त्री-पुरुषसंबंधाच्या सनातनी चिखलातून एक एक पाऊल पुढे टाकत स्वत:बरोबर त्यांनी भोवतालच्या अन्यायग्रस्त महिलांच्याही वेदनांना बोलतं केलं. त्यांच्या कथा-कवितांना साहित्याच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी 'आकांक्षा' मासिक सुरू केलं. पुढे तो प्रवाह अधिक रुंद झाला, त्याचं 'आकांक्षा' प्रकाशन झालं.




'विमुक्ता' या अरुणा सबाने यांच्या कादंबरीची अर्पणपत्रिका बघा;

'दु:ख, अवहेलना भोगूनही
पुन्हा नव्यानं उभी राहिली
जी सतत माझ्या आजूबाजूलाच
वावरत असते, तिलाच...'

'विमुक्त स्त्री' जी स्पर्शाने आणि नजरेने दाखवता येत नाही, पण ती शब्दातून जिवंत करता येते. 'विमुक्ता' च्या दुसऱ्या आवृत्तीच्या मनोगतात अरुणा सबाने आपल्या वाचकांच्या प्रतिक्रिया लिहितात. त्यांपैकी एक अशी : 'तुमची कादंबरी वाचल्यावर मला कळलं की, मी माझ्या आईला, बहिणीला किती गृहीत धरत होतो. त्यांची स्वत:ची काही मतं असू शकतात, हे माझ्या ध्यानीमनीही नव्हतं. 'विमुक्ता'ने मला शिकवलं स्त्रीकडे आधी एक व्यक्ती म्हणून




बघितलं पाहिजे. माझी आई, माझी बहीण आधी एक व्यक्ती आहेत. नंतर त्या माझ्या आई किंवा बहिणी आहेत.'

अरुणा सबाने यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्या सर्व पुस्तकांच्या प्रेरणा म्हणजे त्यांच्या आयुष्यातील त्या एका घटनेचं बीज आहे. पण त्या बीजाचा परीघ केवळ त्यांच्या स्वतःच्या दुःखाच्या कुंपणात राहिलेला नाही. तो समस्त स्त्रीत्वाच्या क्षितिजापर्यंत विस्तारला गेला आहे. स्त्रीवादी जाणिवांना प्रत्यक्ष चळवळीच्या पातळीवर कामाचं परिमाण मिळवून देणाऱ्या कथा-कादंबऱ्या आणि वैचारिक लेखन-संपादन तर अरुणा सबाने यांच्या नावावर आहेच, पण अलीकडेच आलेलं त्यांचं 'माझ्या आईचा बॉयफ्रेंड' हे आगळंवेगळं पुस्तक प्रसिद्ध झालं आहे. घरातील नातेवाईकच नव्हे, तर कित्येकदा बाप-भाऊ यांचे लैंगिक अत्याचार हे कधी फारसे चव्हाट्यावर येत नाहीत. विकृत खुनशी नवऱ्याच्या छळाला बळी पडणारी स्त्री आणि नवरा गेल्यावर उतारवयात 'पार्टनर' शोधणारी स्त्री हा मध्यमवर्गीय घरात कुचेष्टेचा आणि घृणेचा विषय असतो. पण अरुणाताईंनी त्यांच्याजवळ आलेल्या अशा स्त्रियांच्या दुःखाचे पदर अतिशय हलक्या हाताने या पुस्तकात उलगडून दाखवले आहेत. प्रत्येक समाजकार्य महाविद्यालयात शिकवलं जावं असं हे पुस्तक आहे.

म्हणूनच अरुणा सबाने यांचं साहित्य, त्यांचे प्रश्न आणि प्रत्यक्षात त्या ज्या काही चळवळी आणि उपक्रम करतात, त्या वेगवेगळ्या नाहीतच. त्यांनी त्यांच्या 'माहेर' नावाच्या संस्थेत अशा स्त्रियांना आधार दिला. त्यांचे प्रश्न समजून घेतले. त्यांना ऐकून घेणं हे सुद्धा एक मोठं काम असतं. स्त्रीपुरुष संबंधाच्या पारंपरिक चौकटीत त्यांचं म्हणणं ऐकून घ्यायलाही कोणताच कोपरा नाही. नात्यांचे सगळे संबंध रक्ताच्या आणि कायद्याच्या औपचारिकतेत बद्ध असतात. तिथे बायकांचे खरे प्रश्न ऐकून घ्यायला जागाच नसते. कोंडलेल्या वाफेला बाहेर पडायला सेफ्टी व्हॉल्व नसतो. रक्ताच्या किंवा कायद्याच्या नात्याशिवाय एक नातं असतं – मैत्रीचं! पण वास्तवात ते असतं का? हाच प्रश्न अरुणा सबाने यांच्या 'विमुक्ता' आणि 'मुन्नी' मधील पात्रं एकमेकांना विचारतात. त्यांच्या या कादंबऱ्या बारकाईने वाचल्या तर लक्षात येतं की, 'मित्र हाच सखा असतो' अशी स्त्रीसाठी एक रोमँटिक कल्पना मध्यमवर्गीय साहित्यात आढळते. पण ती प्रत्यक्षात तशी असते का? आपल्या समाजातील रूढ स्त्रीपुरुषसंबंधात मित्र आणि मैत्रीचे संबंध हे मृगजळासारखे कसे असतात, हा एक पैलू अत्यंत सूक्ष्मपणे अरुणा सबाने यांच्या कादंबरीतून अधोरेखित होतो.

त्यांच्या कादंबऱ्यांतील खरे प्रश्न पुन्हा वेगळेच आहेत. जाणीवपूर्वक घराबाहेर पडलेली स्त्री किंवा अपघाताने घराबाहेर पडून देहविक्रीच्या सापळ्यात अडकलेली स्त्री हा खरा प्रश्न नाही. ज्या स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचा आपण उठताबसता जयघोष करतो, त्यांचं सामाजिक वास्तव हे

अशा महिलांच्या रूपाने प्रश्नचिन्ह म्हणून आपल्यापुढे उभं ठाकलेलं असतं. खरा प्रश्न हा आहे की, कोणत्याही कारणाने घराबाहेर पडलेल्या स्त्रियांच्या संदर्भात तिचे जवळचे नातेवाईक, भोवतालचा समाज आणि प्रसारमाध्यमं असोत, की पोलीस यंत्रणा असो – त्यांची काय भूमिका असते. अशा स्त्रीच्या पाठीशी 'स्वातंत्र्य आणि समता' या मूल्यांच्या रक्षणासाठी यांपैकी कुणीच उभं राहत नाही. तिला एकटीला स्वत:चं संरक्षण करावं लागतं. आपल्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करावा लागतो. समतेच्या तत्त्वासाठी संपूर्ण परंपरा आणि रूढींच्या दगडी भिंतीवर कपाळ आपटावं लागतं. अशा रक्तबंबाळ स्त्रियांच्या कहाण्या अरुणा सबाने यांच्या कथा-कादंबऱ्यांत येतात. पण त्या रक्तबंबाळ आहेत, म्हणून पराभूत आहेत असं नाही. त्यांना न्यायासाठी आपला स्वत:चा मार्ग स्वत:च निर्माण करावा लागला असं दिसतं. घरात किंवा घराबाहेर बलात्कार झालेल्या, आपल्याच कुटुंबियांकडून अत्याचार झालेल्या किंवा भोगवस्तू म्हणून फसवल्या गेलेल्या स्त्रियांना 'माहेर' हा एक आधार वाटू लागला. अक्षरश: रात्री-बेरात्री घराबाहेर पडलेल्या स्त्रियांना अरुण सबाने यांनी आपल्या घराचा आसरा देऊन त्यांना विश्वास दिला आहे.

अरुणा सबाने यांचं साहित्य असो, की 'आकांक्षा' किंवा 'माहेर' सारखी संस्था असो – या सगळ्यात स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचं अधिष्ठान आहे. म्हणून त्यांच्या लेखनातील वैचारिक भूमिकेत आणि प्रत्यक्ष कार्यात एकात्मता दिसते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील याच एकात्मतेचा भाग म्हणजे त्या सामाजिक अन्याय व अत्याचार विरोधातील वेगवेगळ्या चळवळींमध्ये केवळ भाग घेत नाहीत, तर नेतृत्वही करतात. स्त्री अत्याचार परिषद असेल, अंधश्रद्धा निर्मूलन समिती असेल, हुंडाविरोधी आघाडी असेल, पाणी परिषद असेल किंवा अभिव्यक्तिस्वातंत्र्य व असहिष्णुतेच्या मुद्द्यावरील दक्षिणायनसारखं आंदोलन असेल – या सगळ्यात अरुणा सबाने हे नाव सातत्याने आघाडीवर असतं.



'पाणी परिषद' आणि 'जलसाहित्य संमेलन' हे अरुणा सबाने यांच्या दीर्घकाळच्या कार्याचा अपरिहार्य भाग बनतो, तेव्हा त्यामागील त्यांची भूमिका आणखीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगत आहे असं दिसतं. पाणी हे मानवी जीवनाचं जीवन आहे. पण सत्ता आणि संपत्तीप्रमाणे पाण्याचीही भांडवलशाही या समाजात दिसते. आपण लोकशाहीत राहतो, पण क्षणोक्षणी लोकशाहीची मूल्यं पायदळी तुडवण्याचा अनुभव येतो. हा अनुभव तर कुटुंब आणि घरापासून सुरू होतो. घर सांभाळणारी स्त्री म्हणून तिचा गौरव केला जातो. घरातील एकूणच कामाचा केंद्रबिंदू पाणी हेच असतं. सकाळी झोपून उठल्यावर पाण्याचा प्रश्न प्रथम घरातील स्त्रीलाच सोडवावा लागतो. ती स्त्री नुकतीच हळद लागलेली नववधू असो, बारा-तेरा वर्षांची मुलगी असो, की ऐंशी वर्षांची म्हातारी असो – कुटुंबव्यवस्थेत पाण्याची व्यवस्था स्त्रीच्या माथी मारलेली असते. म्हणून स्त्रियांवरच्या अत्याचाराबद्दल विचार करताना त्यांना पाणी ही एक समस्या दिसली. भर उन्हात मैलभर अंतरावरून डोक्यावर मडकं घेऊन पाणी आणणाऱ्या खेड्यातील स्त्रिया असोत, की डोळ्यावरील अर्धवट झोप गुंडाळून भल्या पहाटे सार्वजनिक नळावर रांगेत उभ्या राहणाऱ्या शहरातील झोपडपट्टीतील बायका असोत – त्या असमानतेच्या बळी आहेत. यात पुरुष कधी दिसत नाही हा एक स्त्री-पुरुष विषमतेचा भाग आहेच. पण कोणत्याही शहराच्या सिव्हील लाइन्समध्ये हे दृश्य दिसत नाही, हा परत सामाजिक विषमतेचा भाग आहे. नैसर्गिक संसाधन म्हणून पाण्यावर सर्वांचाच सारखा हक्क आहे. पण काहींना मुबलक पाणी मिळतं आणि काही तहानलेले राहतात. या वास्तवाचा सामना मोठ्या संघटना, संस्था त्यांच्या पातळीवर करत असतील. पण अरुणा सबाने यांना हा प्रश्न महत्त्वाचा वाटला आणि त्यांनी यावर प्रबोधनाचा -जलसाक्षरतेचा कार्यक्रम हाती घेतला. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी 'जलसाहित्य संमेलना'ची चळवळ सुरू केली. त्या चळवळीला आता व्यापक स्वरूप प्राप्त झालं आहे.

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) या संस्थेचा २०२०चा अतिशय प्रतिष्ठेचा कार्यकर्ता (प्रबोधन) पुरस्कार अरुणाताईंना जाहीर झाला आणि वाटलं, विजा झेलणाऱ्या झाडावर जणू आकाशातून पुष्पवृष्टीच झाली. अरुणाताई, अभिनंदन !!

– प्रमोद मुनघाटे

pramodmunghate304@gmail.com/7709012078

## ‘अजूनही काम करणार, करत राहणार...’ – अरुणा सबाने



**अरुणा सबाने** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

नमस्कार,

मला महाराष्ट्र फाउंडेशनचा समाजकार्य प्रबोधन पुरस्कार मिळाला आहे. त्याबद्दल मी महाराष्ट्र फाउंडेशनच्या सर्व मंडळींना धन्यवाद देते. अनेक जण मला विचारतात की, हा समाजप्रबोधन पुरस्कार तुम्हाला ज्या कार्याबद्दल मिळाला आहे, त्या कार्यामागची तुमची प्रेरणा कोणती? याचं उत्तर असं आहे की, मला सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळावी असा एखादा विशिष्ट प्रसंग माझ्या आयुष्यात घडला आहे असं नाही. खरं म्हणजे समाजकार्याचं बाळकडू मला जन्मत:च मिळालं. मी ज्या कुटुंबात जन्माला आले,त्या कुटुंबात माझे वडील, माझा भाऊ हे दोघंही सामाजिक कार्यातच कार्यरत होते. वडील गांधीवादी होते. त्यांनी शेती भूदान यज्ञात दिली होती. तेव्हापासून मी हे सगळं बघत होते, ऐकत होते. आणि ते पाहत पाहतच मी मोठी झाले. मी शिक्षणासाठी जेव्हा नागपूरमध्ये आले, तेव्हा मला सर्वप्रथम भेटले ते म.य. दळवी आणि नेताजी राजगडकर. त्यांच्या संपर्कात आल्यानंतर माझ्यावर आणखी वेगळे, चांगले संस्कार होत गेले. लहानपणीच्या संस्कारांना एक विशिष्ट दिशा मिळाली. नागपूरमध्ये मी त्यानंतर

सतत चळवळीमध्ये राहिले. मग ती हुंडाविरोधी चळवळ असो, बलात्कारविरोधी चळवळ असो, चळवळीतले अनेक मोर्चे असोत, मी त्यांत असायचेच. 'मथुरा प्रकरण' हे भारतातलं पहिलं बलात्काराचं गाजलेलं प्रकरण. त्याच्या निषेधार्थ नागपूरमध्ये जो भव्य मोर्चा निघाला होता, त्यात सामील होणारी मी अगदी लहान वयाची, केवळ सतरा-अठरा वर्षांची मुलगी होते.

हुंडाविरोधी चळवळीमध्ये ज्या काही केवळ आठ-नऊ तरुणी होत्या, त्यांत मी एक होते. त्यामुळे हे सर्व करता करता सामाजिक कार्यासंदर्भातलं एक सुयोग्य वळण माझ्या आयुष्याला लागत गेलं आणि मी सतत चळवळीतच राहिले. चळवळच माझ्यामध्ये राहिली असं म्हटलं तरी चालेल. आणि भावी आयुष्यात तर या चळवळीनेच मला जगवलं, असं म्हटलं तरी हरकत नाही. पुढे मी बरंच काही काम करत गेले. लिहीत गेले. आणि त्यानंतरच्या माझ्या आयुष्यात एक टर्निंग पॉइंट आला. त्यानंतर काही दिवस माझ्यासमोर अंधार होता – अचानक आलेला. माझं आयुष्य स्थलांतरितच म्हटलं पाहिजे. आणि त्यातून मी जेव्हा सावरले, माझे पोटापाण्याचे प्रश्न जेव्हा मिटले, त्यानंतर मी सर्वप्रथम 'माहेर' नावाची एक संस्था स्थापन केली. त्यामागचा उद्देश असा होता की, अडचणीतल्या स्त्रियांना मदत करायची, मुख्यत्वे परित्यक्त महिलांना. आणि नंतर तर मग फक्त स्त्रियाच नाहीत तर, अडलेला कुठलाही घटक असो, त्याला मदत करायची, असं माझं धोरण राहिलं.. आपण या सर्वांना मदत करू शकतो ही जाणीव मला झाली आणि मला आत्मविश्वास आला.

त्याच दरम्यान मला वर्तमानपत्रात एक कॉलम चालवायला मिळाला. त्यातून मी खूप लिहिती झाले. ते लिहिलेलं वाचल्यानंतर अनेकांना, विशेषत: अडलेल्या महिलांना असं वाटायला लागलं की, या मॅडम छान मार्गदर्शन करू शकतात. आणि मग माझ्याकडे खूप केसेस यायला लागल्या. अनेकदा



मला अतिशय वाईट वाटायचं की, अंगावरची हळद पण सुकलेली नसायची, हातांवरची मेंदी पण निघालेली नसायची, अशा मुलींना त्यांचे पालक माझ्याकडे घेऊन यायचे. अशा नवोदित वधूंपासून, ते चक्क साठ वर्षांच्या महिलांपर्यंत संसाराचा उबग आलेल्या, छळल्या गेलेल्या, अत्यंत त्रासलेल्या अशा स्त्रिया माझ्याकडे येऊ लागल्या. त्यांत एका डीवायएसपीच्या पत्नीचं प्रकरण मला फार भयंकर वाटलं होतं. अशा अनेक केसेस मला सांगता येतील. एक तर आई आणि तिच्या तीन मुली असं चौघींचंही शोषण होणारं एक कुटुंब होतं. अशा अनेक केसेस माझ्याकडे येत गेल्या. आणि मी हिरिरीने त्या सगळ्या केसेस हाताळण्याचा, त्यांना न्याय मिळवून देण्याचा, प्रसंगी पोलीस स्टेशनला जाण्याचा किंवा त्या स्त्रियांना पोलिसांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न करू लागले. कारण आपल्याकडे सामाजिक प्रतिष्ठेचा खूप मोठा बागुलबुवा बसलेला असतो आपल्यावर. त्यामुळे अनेकींना पोलिसांशिवाय मदत हवी असायची. अशाही स्त्रियांना मला माझ्या आयुष्यात मदत करता आली.

आणि हे सारं करता करता वळणं मिळत मिळत अश्वमेध यज्ञाला आम्ही विरोध केला.तो यज्ञही माझ्या आयुष्याची एक मजबूत बाजू मला पुढे न्यायला कारणीभूत ठरला. अशा अनेक गोष्टी सामाजिक कार्य करत असताना माझ्यासोबत घडत गेल्या.आणि एक वेळ अशी आली की, या कामांसोबतच मी जलसंवर्धन या विषयाकडे वळले. कारण मुळात मी एक शेतकऱ्याची, पाटलाची मुलगी होते. लहानपणापासून पाणी हा विषय किती महत्त्वाचा आहे हे मला माहिती होतं. आणि लोक पाण्याचा किती नासोडा करतात याची मला जाणीव होती. पाणी आहे म्हणून काय नासोडा करायचा? ‘नासोडा’ हा माझ्या आईचा शब्द. तो माझ्या खूप लक्षात राहिला होता. आणि मी पण पहायचे की, शहरी माणूस किती भरमसाठ पाणी खर्च करतो. तर मग मी या विषयाकडेही वळले. मी एक ‘अखिल भारतीय जलसाहित्य संमेलन’ आयोजित केलं. त्या माझ्या कामाची विशेषत्वाने नोंद घेतली गेली. जपानला ‘थर्ड इंटरनॅशनल वर्ल्ड वॉटर कॉन्फरन्स’ घेतली गेली. त्यामध्ये सहभागी होण्याकरता त्यांनी मला बोलावलं. आणि ही ‘जलसाहित्य’ची संकल्पना माझ्या मनात नेमकी काय आहे, त्याविषयी मला काय म्हणायचं आहे, हे व्यासपीठावरून सांगण्याची मला संधी दिली.

अशा अनेक गोष्टी मी करत गेले, करते आहे. आजही मला अनेक गोष्टी करायच्या आहेत. माझ्या या कामाची नोंद महाराष्ट्र फाउंडेशनने घेतली, त्याचा मला खूप आनंद होतो आहे. आणि एक महत्त्वाचं म्हणजे या पुरस्काराने मला आणखी काम करायचं बळ मिळालं आहे. लोक मला म्हणायचे, ‘आता तुम्ही साठी ओलांडली, काय काम करता?’ पण या पुरस्कारामुळे मला आणखी काम करायला बळ मिळालं आहे, त्यामुळे मी आणखी काम करत राहणार आहे.

हा पुरस्कार दिल्याबद्दल मी पुनश्च एकदा आपल्या सर्वांचे आभार मानते, विशेषत: सुनील देशमुख आणि त्यांच्या सहकार्यांचे, आणि थांबते.

*arunasabane123@gmail.com/9970095562*

# मुक्या संस्कृतीला वाचा

कार्यकर्ता पुरस्कार (संघर्ष)
**सुधीर अनवले**, उदगीर

समाजकार्य हा व्यवसाय बनत चालला असल्याच्या काळात सुधीर रामदासराव अनवले नावाच्या एका तरुणाने बदलाची सुरुवात स्वत:पासून केलेली आहे. स्वत:ला त्याने आज भटक्या-विमुक्तांच्या चळवळीत बांधिलकीच्या भावाने झोकून दिलं आहे. 'उपरा' कार लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात कार्यकर्ता म्हणून काम करताना एके काळी त्याने भटक्या-विमुक्तांची शोधयात्रा काढलेल्या पालखीला खांदाही दिला होता. स्वभावातच बंडखोरी असलेला सुधीर नंतर मात्र कोणत्याही झाडाखाली थांबला नाही. झाडाखाली झाड वाढत नसतं, म्हणून मग त्याने स्वत:चं आभाळ स्वत:च शोधलं आणि २००४मध्ये भटक्या-विमुक्तांच्या चळवळीत स्वतंत्रपणे काम करण्यासाठी 'भारतीय भटक्या-विमुक्त जमाती विकास संघटना' स्थापन करून आपल्या पावलांचे ठसे सामाजिक चळवळींच्या नकाशावर रोवण्यास प्रारंभ केला.



आज लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, हिंगोली, परभणी, सोलापूर, बुलडाणा, गडचिरोली, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, नाशिक, अहमदनगर, वर्धा, अकोला, नागपूर, यवतमाळ या जिल्ह्यांतील ९८ तालुक्यांमध्ये या संघटनेच्या कार्याचं जाळं पसरलं आहे. भटक्या-विमुक्तांच्या पालावर कुठं अन्याय दिसलाच, तर सुधीर लगेच तडकून उठतो. भटक्या-विमुक्त समाजात बदल करण्यासाठी 'वासुदेव' समाजातील या वासुदेवाचा अखंड जागर सुरू आहे. तो करताना त्याला सततच संघर्षाचा सामना करावा लागला, पण तो कधी डगमगला नाही. त्याच्या मनाला 'फंडिंग' चा विचार कधी शिवला नाही. समाजकार्यासाठी सरकारी मदत वा विदेशी निधी मागण्याच्या आणि चळवळीशी द्रोह करण्याच्या मोहानेही त्याला कधी खुणावलं नाही. संस्थेतून आपलाही उदरनिर्वाह चालावा, आपल्या पोराबाळांचं भलं करावं, परदेशवाऱ्या घडाव्यात अशी भावना बऱ्याच धंदेवाईक सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये अलीकडं दिसू लागली आहे. तिचा लवलेशही सुधीरमध्ये नाही. चळवळीशी बेइमानी करायची मांडवली त्याने कधीच केली नाही.

भटक्या-विमुक्तांचे अनेक प्रश्न सध्या धगधगते आहेत. त्यासाठी अनेक मोर्चे व उपोषणांचं हत्यार या लढवय्या तरुणाने उपसलेत. भटक्या-विमुक्त जमातीतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांतील अस्वस्थता हेरून त्याने त्यांची 'सुशिक्षित बेरोजगार परिषद' आयोजित केली होती. अनेक विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी २००२ साली एल्गार पुकारला होता. चळवळी बळकट करायच्या, तर कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिलं पाहिजे, हा कळीचा मुद्दा लक्षात आल्यानंतर त्याने लातूरला राज्यपातळीवर व मराठवाडा स्तरावरही 'कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरां'चे सातत्याने आयोजन केलं. २०१०मध्ये भटक्या-विमुक्तांची 'भाकरी परिषद' आयोजित केली होती. या परिषदेला असलेल्या जवळपास ५ हजार भटक्या-विमुक्तांच्या उपस्थितीमुळं महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचं लक्ष या



तरुणाने वेधून घेतलं होतं.

या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्यासाठी गेल्या २० वर्षांपासून सुधीर फुले-आंबेडकरांच्या विचारांवर परिसंवाद व चर्चासत्रांचं आयोजन करतो आहे. भटक्या-विमुक्तांमधील अंधश्रद्धा व रूढी-परंपरांच्या निर्मूलनासाठी त्याची महाराष्ट्रभर भटकंती आजही चालूच आहे. जातपंचायतींचा प्रभाव कमी व्हावा किंबहुना या प्रथेचं निर्मूलनच व्हावं यासाठी सुधीरने केलेल्या प्रयत्नांची दखल घ्यावी लागेल. फुले- आंबेडकरी विचारांचा कट्टर पुरस्कर्ता म्हणून राज्यातील अनेक प्रतिष्ठित व्याख्यानमालांमधून त्याने पुरोगामी चळवळीची वैचारिक मांडणी केली आहे. या सक्रीय चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र यांच्या वतीने सुधीरला २०१७मध्ये राज्यस्तरीय उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देऊन ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या हस्ते गौरवण्यात आलं होतं.

तशा सुधीरच्या अंगी नाना कळा आहेत. औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात सतत ४ वर्षं तबलावादनातील सुवर्ण पदक, अ.भा. युवक महोत्सवात तबलावादनातील तिसरा पुरस्कार, संगीतकार शंकर-जयकिशन व राम कदम यांच्यासोबत कार्यक्रमात सहभाग ही त्याची काही उदाहरणं. 'मुप्टा' संघटनेचा बीड इथे २०१७ मध्ये देण्यात आलेला राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार आणि असेच काही अन्य पुरस्कार त्याच्या शिरपेचात आहेत.

चळवळीचा धांडोळा घेणारा 'भटक्या-विमुक्तांची चळवळ : स्वरूप व व्यवहार' हा ग्रंथ आणि 'भटक्या-विमुक्त चळवळीच्या कविता' हा त्याचा काव्यसंग्रह आता प्रकाशनाच्या वाटेवर आहे. शिवाय 'लोकमत', 'सकाळ', 'एकमत' आदी वृत्तपत्रांतून व राज्यातील अनेक नियतकालिकांमधून भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांवर सुधीरचे अनेक लेखही प्रकाशित झालेले आहेत.



प्रत्येक संस्कृती, मानवाच्या सामाजिक इतिहासाची प्रत्येक अवस्था आपल्यासोबत काही संकटं आणि आव्हानं घेऊन येत असते. हे सामाजिक तुटलेपण पाहून आपण सारे भिऊन गेलो आहोत. असहिष्णुतेचा अमानवी चेहरा आपल्याला सतत भयग्रस्त ठेवतो आहे. या भयग्रस्ततेच्या अंगजाळ उन्हात अनेक शोषित आणि वंचित होरपळून जात आहेत. या पार्श्वभूमीवर अदम्य जिद्दीने सुधीर न थकता लोकलढे लढतो आहे. त्यांना आपल्या परीने बळ देतो आहे. त्याने त्यासाठी कित्येकदा प्रशासनाच्या आणि प्रस्थापितांच्या अभेद्य भिंतींना धडका दिल्यात. निरपेक्ष वृत्ती ठेवून, मोडून पडलेल्या माणसांचे संसार उभे केले आहेत. मात्र हे करताना आपली वैचारिक आयुधं त्याने शाबूत ठेवली आहेत. त्यामुळे सुधीर अनवले कधी या आयुधावाचून दिसलाच नाही. भटक्या-विमुक्तांना त्यांचं हरवलेलं आभाळ शोधून देणारा एक संवेदनशील आणि तरीही पोलादासारखी दुर्दम्य जिद्द असणारा सुधीर त्यांच्या मुक्या संस्कृतीला वाचा देण्याचा अथक प्रयत्न आयुष्यभर करतो आहे. रस्त्यावर उतरून तो त्यांची लढाई बुलंद करतो आहे. भटक्या विमुक्तांच्या चळवळीचा अहोरात्र जागर करणारा हा 'वासुदेव' जागल्या बनून मराठवाड्यात भक्कमपणे उभा आहे. या लोकपीठाचा तो आजीव सदस्यच आहे.

*'फार झाली वादळांची ही चढाई,*
*जिंकण्यासाठीच माझी ही लढाई'*

असं म्हणणाऱ्या सुधीरने पोटात ओरडणाऱ्या कावळ्यांचा धम्म बरोब्बर ओळखला. जगण्याचं वेगळं तत्त्वज्ञान मग तो सांगत बसला नाही. गजानन माधव मुक्तिबोधांची 'चकमकीच्या ठिणग्या' नावाची एक कविता आठवते. तीत एक ओळ आहे - 'आता तर ब्रम्हराक्षसांच्या सावल्या गांधीजींच्या चपला घालून फिरत आहेत...' सभोवार असं विषाक्त वातावरण असतानाही सुधीरने हातातली मशाल कधी खाली ठेवलेली स्मरत नाही. सामाजिक चळवळींच्या कष्टप्रद अध्यायाचा तो प्रतिनिधी आहे. भटक्यांचं बेघर जगणं त्याने वाचलं आणि त्या जगण्याला शब्द देऊन त्याने त्यांचा जागर मुखर केला. वंचितांच्या लढाया दाखवून आमदारकी वा शिक्षणसंस्था पदरात पाडून घेण्याचा मोह त्याला कधी झाला नाही.

भटक्या-विमुक्तांमधील अंधश्रद्धा संपून त्यांच्यात विज्ञानवादी दृष्टिकोन रुजावा यासाठी चर्चासत्रं, भटक्या-विमुक्तांचं साहित्य संमेलन, भटक्या-विमुक्तांच्या हस्तोद्योग व पारंपरिक व्यवसायातून निर्माण केलेल्या वस्तूंसाठी बाजारपेठ असे सुधीरचे अनेक संकल्प आहेत. या सर्व गोष्टींसाठी, लढ्यांसाठी त्याच्या हातांना बळ देणं एवढं तरी आपण करणार आहोत की नाही?

– जयप्रकाश दगडे
9422470518

# ‘जातिव्यवस्था आणि ईश्वर नाकारला पाहिजे’ – सुधीर अनवले



**सुधीर अनवले,** उदगीर
यांनी या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण.

जयभीम,

दलितांपेक्षा दलित असलेल्या भटक्या-विमुक्तांच्या चळवळीमध्ये मी लातूर भागात काम करतो.भटक्या-विमुक्तांचा संघर्ष हा मानवमुक्तीचा संघर्ष आहे, असं आम्ही मानतो.याचं कारण असं की, या जमाती अस्पृश्य नाहीत, तर त्या उपेक्षित आहेत. उपेक्षितता कधी जन्माला येते? जेव्हा अस्पृश्यतेचा अतिरेक होतो, तेव्हा उपेक्षितता जन्माला येते. उपेक्षित असणं याचा अर्थ पूर्णपणे दुर्लक्षित असणं. ज्या जमाती अलुतेदारीमध्ये आहेत, त्या सगळ्या जमाती इथे उपेक्षित राहिलेल्या आहेत, वंचित राहिलेल्या आहेत.याचं कारण असं की, या जमाती गरीब आहेत, अज्ञानी आहेत आणि असंघटित आहेत. त्यामुळे यांचे जे काही प्रश्न आहेत, यांचं जे काही दुखणं आहे,किंवा वेदना आहेत, त्या इथल्या प्रस्थापित व्यवस्थेच्या लक्षात आल्याच आहेत, असं नाही.

या सगळ्या जमाती गावगाड्याच्या बाहेर राहतात. म्हणजे जिथे गावाची शीव संपते, तिथे गावाच्या शिवेच्या शेजारी सगळ्या दलितांची वस्ती असते. आमची वस्तीसुद्धा गावाच्या पलीकडे राहते. म्हणजे जिथे लोक संडासला जातात, किंवा

ज्या जागेला आपण हागणदारी म्हणतो, ती आमच्या भटक्या-विमुक्त लोकांची वतनदारी असते. आलेली सगळी पालं तिथेच उतरतात. तिथूनच आमचे सगळे व्यवहार सुरू होतात. पोट भरण्यासाठी म्हणून आमच्या जमातीतील माणसं भीक मागत असतात, चोऱ्यामाऱ्या करत असतात. समाजाला मान्य नसलेले किंवा ज्या व्यवसायांना या व्यवस्थेमध्ये प्रतिष्ठा नाही असे व्यवहार आम्ही करत असतो.आणि त्यामुळे होतं असं की, जेव्हा तुम्ही करत असलेल्या कामालाच प्रतिष्ठा नसते,तेव्हा त्या जमातीच्या माणसाला सुद्धा ती प्रतिष्ठा नसते. आणि या सगळ्याचा जर विचार केला, तर आज आम्हाला गावात घर नाही आणि रानात शिवार नाही. याविषयी आम्ही सातत्याने बोलत असतो. गावात एखाद्याचं घर असलं की, शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोचतात. पण आमचं असं होतं की, गावात आमचं घरच नसतं. आम्ही गावाची शीव जेव्हा पाठीवर घेऊन फिरत असतो, म्हणजे 'विंचवाचं बिऱ्हाड' पाठीवर अशा पद्धतीने जेव्हा आम्ही कायम फिरत असतो, तेव्हा शासकीय योजना कोणती चाललेली आहे, याची आम्हाला माहिती नसते. आणि त्यामुळे आम्ही गावात कधी आलो तर सर्व्हे झालेला असतो आणि आम्ही कायम वंचित राहतो. त्यामुळे मग आमच्या जगण्या-मरण्याचे प्रश्न निर्माण होतात. सकाळची चूल पेटली, तर संध्याकाळची पेटेलच असं विश्वासाचं वातावरण आजपर्यंत कोणत्याही सरकारने या महाराष्ट्रात, या देशात (कारण भटके-विमुक्त केवळ महाराष्ट्रातच आहेत असं नाही) दिलेलं नाही. भटके-विमुक्त पूर्ण देशामध्ये आहेत. पूर्णपणे फिरणाऱ्या या जमाती आहेत. कोणतंही सरकार जरी सत्तेवर आलेलं असलं तरी यांपैकी कोणत्याही सरकारांनी आमच्याकरता काहीही भलं केलेलं नाही.

आणि त्यामुळे एक तर घर नाही आणि दुसरा अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आम्ही सगळेजण शिक्षणापासून फार दूर आहोत. म्हणजे आजही आपण सर्व्हे केला तर, आणि लोक काहीही म्हणत असले तरी, आज आपल्या लक्षात येईल की, आजचे जे तरुण शिकत आहेत, ते सगळे कॉम्प्युटरची भाषा बोलतात एकविसाव्या शतकामध्ये. आणि आम्ही 'बे एकं बे' चा पाढा म्हणतो. म्हणजे आम्हाला किती पुढे जावं लागेल हे आपल्या लक्षात येईल. मग हे सगळं करत असताना आत्ताचा जो ट्रेन्ड आहे, त्याच्याशी जर आम्हाला जुळवून घ्यावं लागेल असं असेल, तर आम्हाला कार्यकर्ता म्हणून खूप मोठं काम करावं लागणार आहे. पहिल्यांदा आम्हाला शिक्षणामध्ये यावं लागेल. कारण आजही जर आपण सर्व्हे केला तर काय दिसतं?

उदाहरण म्हणून सांगतो, की, समजा आपण मसणजोगी समाज बघितला, तर आजही या समाजात हातावरच्या बोटावर मोजण्याइतकेच डॉक्टर्स आपल्याला सापडतील. उदाहरण म्हणून आपण जर नांदेड जिल्हा घेतला, तर तिथे या समाजातून पहिली मुलगी परवा एम.बी.बी.एस. झाली आहे. आमच्या लातूर जिल्ह्याचा आपण विचार केला तर, आजही तिथल्या मसणजोगी समाजामध्ये, तिथल्या कतारी समाजामध्ये अजून एकही मुलगा आपल्याला बारावी झालेला दिसत नाही.

म्हणजे शिक्षणामुळे विकास होतो, प्रगती होते,असं आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा आम्ही त्या प्रक्रियेतच नाही, असं आमच्या लक्षात येतं. मग अलीकडच्या काळामध्ये आयसीएससी किंवा सीबीएससीचा जो अभ्यासक्रम आलेला आहे, त्याच्यामध्ये आम्ही कधी जाणार असा प्रश्न पडतो. आम्ही मुळातच जिल्हा परिषदेत आहोत. मग आता या दृष्टिकोनातून आम्ही असा प्रयत्न करतो

आहोत की, कुठेतरी एका ठिकाणी मुलांची योग्य सोय व्हावी. आता आश्रमशाळा निघालेल्या आहेत, पण आश्रमशाळा व्यवस्थित चालत नाहीत. आमच्या मुलांचं तिथे शोषणच होतं. आणि म्हणून या शिक्षणाच्या प्रक्रियेतून सुद्धा आम्ही बाहेर पडतो.

बाब अशी आहे की, अलीकडच्या काळामध्ये आमच्या सगळ्या भटक्या-विमुक्तांचं जीवन हे जातीच्या प्रमाणपत्रावर अवलंबून आहे. आणि जर २०२०मध्ये सुद्धा आम्हाला जातीची प्रमाणपत्रं मिळत नसतील, तर पुढे होणार कसं? भटक्या-विमुक्तांचा प्रश्न असा आहे की, या सगळ्या बेचाळीस जमाती आहेत. त्या सगळ्या छोट्या छोट्या जमाती आहेत. त्या सगळ्यांना एकत्रित करणं म्हणजे राळ्याचा लाडू बांधण्यासारखं आहे. राळ्याचा लाडू कधी एकत्रित बांधता येत नाही, तशाच या जमाती कधी एकत्रित होऊ शकत नाहीत. कारण या प्रत्येक जमातीची संस्कृती, पोत वेगवेगळं आहे. त्यांची भाषा वेगवेगळी आहे. त्यांच्या देवदेवता वेगवेगळ्या आहेत.त्यांची राहणी-करणी वेगवेगळी आहे. त्यांचं राहणीमान वेगळं आहे. ही सगळी विविधता आहे. आणि म्हणून जरी असं म्हटलं जात असलं की, 'विविधता में एकता है', तरी मला असं वाटतं की, ते पूर्णपणे फोल आहे. 'विविधता'मध्ये 'अनेकता'च असते. आणि विविधतेमध्येच विरोध असतो.

मग हे सगळे विरोधाभास असणाऱ्या या सगळ्या जमाती जेव्हा एकत्रित राहतात, तेव्हा त्यांचे सगळे प्रश्न खूप मोठ्या प्रमाणावर निर्माण होतात. आणि याचा अर्थच असा की, ही जी जातिव्यवस्था आहे, ती तुम्ही नाकारली पाहिजे. पहिल्यांदा ईश्वर नाकारला पाहिजे. त्यानंतर जातिव्यवस्था नाकारली पाहिजे. जेव्हा तुम्ही या दोन्ही गोष्टी नाकारता, तेव्हा तुम्हाला निरामय जीवन जगता येऊ शकतं. माणूस म्हणून तुम्ही या व्यवस्थेत उभे राहू शकता. अन्यथा मग जगण्यासाठी तुम्हाला सातत्याने संघर्ष करावा लागतो. १९७२मध्ये सुरू झालेली ही चळवळ आज २०२०मध्येही सुरू आहे. म्हणजे मला असं म्हणायचं आहे की, पन्नास वर्षांच्या या कालावधीत आमच्या किमान तीन पिढ्या गेल्यानंतरही आमचे प्रश्न अजून जसेच्या तसेच राहिलेले आहेत.

मित्रहो, भटक्या-विमुक्तांचे जगण्याचे प्रश्न खूप आहेत. आमच्या 'भारतीय भटक्या-विमुक्त जमाती विकास संघटने'च्या वतीने आम्ही आमच्या भटक्या-विमुक्त जमातींच्या दैनंदिन जगण्यातले जे प्रश्न आहेत, त्या प्रश्नांवर कायम संघर्षाची भूमिका घेत असतो. आणि ही भूमिका घेत असताना आम्हाला त्या माणसाला कोणत्या पद्धतीने, कशा रीतीने त्याच्या हिताच्या संदर्भातलं वातावरण निर्माण करता येईल हे आपल्याला लक्षात आणून द्यायचं आहे. बोलण्यासारखं भरपूर आहे. आपण मला संधी दिली. 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने मला पुरस्कार देऊन आमच्या चळवळीचा सन्मान केला. इथे मी महत्त्वाचा नाही, चळवळ महत्त्वाची आहे. आपण सगळ्यांनी माझं म्हणणं ऐकून घेतलं, त्याबद्दल धन्यवाद!!

*sudhirvjnt94@gmail.com/9422470598*

---

* *व्हीडिओ भाषणाचं शब्दरूप :*
*शुभदा चंद्रचुड / smcmrc@gmail.com/9881402798*

# 'आधी पुनर्वसन मग धरण'

युवा पुरस्कार
**चेतन साळवे**, धडगाव, जिल्हा नांदुरबार

गेल्या २० वर्षांपासून नर्मदा आंदोलनाच्या माध्यमातून एकत्र काम करत असलेले माझे सहकारी चेतन साळवे यांना महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाला याचा मला अत्यंत आनंद होतो आहे.

सरदार सरोवरच्या महाकाय धरणाच्या बाबतीत नेमकी काय भूमिका घ्यायला हवी याचे अभ्यास १९८५पासून झाले आणि होत होते. या सर्व अभ्यासांतून 'आधी पुनर्वसन, मग धरण' या भूमिकेवर आंदोलन आलं होतं. आंदोलनाच्या मागणीवरून जागतिक बँकेने 'मोर्स कमिटी'ची स्थापना करून स्वतंत्रपणे अभ्यास केल्यानंतर या धरणाला आर्थिक पाठबळ न देण्याचा निर्णय घेतला आणि सर्वोच्च न्यायालयात टाकलेल्या याचिकेमुळे धरणाचं काम १९९५पासून १९९९पर्यंत थांबलं होतं व पुनर्वसनाशिवाय येणारं पुढचं बुडीत टळलं म्हणून घाटीत शांतता होती. कोर्टाचा निर्णय आला आणि धरणाचं काम सुरू करण्याची परवानगी देण्यात आली. पाहायला गेलं तर पूर्णपणे लोकविरोधी लागलेल्या या निर्णयात, धरणाची उंची प्रत्येकी ५ मीटर अशी टप्प्याटप्प्याने वाढवण्यापूर्वी तिन्ही राज्यांकडून धरणाच्या त्या उंचीपर्यंत बुडितात येणाऱ्या विस्थापितांचं पुनर्वसन आणि होणाऱ्या पर्यावरणीय हानीची क्षतिपूर्ती या अटी ठेवल्या गेल्या होत्या. धरणाची उंची वाढवण्यासाठी पुनर्वसन झाल्याचं दाखवणं गरजेचं होतं आणि शासनाचे खोटे अहवाल द्यायला सुरुवात झाली होती. मैदानावरची लढाई पुन्हा नव्याने उभी करण्याशिवाय पर्याय नव्हता आणि या लढ्यात सामील होण्यासाठी युवकांना आवाहन करण्यात आलं. नंदुरबार जिल्हा हा नुकताच धुळ्यापासून स्वतंत्र झाला होता.

आम्ही म्हणजे मी मुंबईहून; शोभा, गीता मालेगावहून; विश्राम यवतमाळहून; क्लिफ्टन, प्रवीण बंगळूरूहून; जयंतीलाल, हरीलाल, ब्रिजलाल, तुकाराम, धनसिंग असे धडगाव तालुक्यातीलच





कार्यकर्ते विविध भागांतले, विविध स्तरांतले, विविध आर्थिक, सामाजिक स्थिती असलेले – असे सारेजण या आंदोलनात उतरलो. चेतन हा नंदुरबारला लागून असलेल्या धुळे जिल्ह्यातील निमगूळ या गावचा ग्रामीण युवक. चेतन घरातला मोठा मुलगा असल्यामुळे आणि घरची परिस्थिती बेताचीच असतानाही आंदोलनात 'पूर्ण वेळ कार्यकर्ता' म्हणून काम करायला सर्वांसोबत उतरला. त्याने घेतलेला हा निर्णय त्याच्या ठायी संवेदनशील मन, अन्यायाची असलेली चीड आणि वडिलांच्या विद्रोही विचारांचा प्रभाव असल्याने त्याने घेतला असणार.

प्रत्यक्ष शासनाला जाब विचारण्यासाठी तालुक्याच्या तहसीलदारांपासून, जिल्हा कलेक्टर ते मुंबई–दिल्ली, जिथे निर्णय घेतले जातात तिथपर्यंत आपल्या मागण्या घेऊन महिनोंमहिने लोकांबरोबर रस्त्यावर झालेल्या शांततापूर्ण मार्गाच्या संघर्षात चेतन यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. दिवस-दिवस आपल्या मागण्या घेऊन रस्त्यावर उतरलेल्या लोकांचा उत्साह, ताकद चेतनच्या लयबद्ध गाण्यांनी जिवंत राहिली तीही तब्बल २० वर्षं. रस्त्यावर उतरून आपल्या मागण्या मागत असताना काही महत्त्वाचे निर्णय पदरात पाडत आणि आपल्या कार्यक्षेत्रात परतलं की, त्याचा पाठपुरावा व अंमलबजावणी करण्याचं काम खूप महत्त्वाचं असतं. कार्यकर्त्याची खरी कसोटी या सातत्याच्या पाठपुराव्यात लागत असते.आंदोलनाच्या मागणीनंतर प्रकल्पबाधितांची खरी संख्या निश्चित करण्यासाठी 'कार्यबल'ची (Task Forceची) स्थापना करण्यात आली, तर नर्मदेसह त्याच्या उपनद्यांना येणाऱ्या पुरामुळे नेमकं किती क्षेत्र पाण्याखाली जाणार यासाठी तलांकनिश्चितीचं सर्वेक्षण करण्याचं ठरलं. या सर्वेक्षणात चेतनचं प्रत्यक्ष योगदान राहिलं आहे. धरण पुढे रेटण्याची घाई झालेल्या शासनाच्या 'कार्यवाहीदर्शक अहवालातील' (Action TaJen Report) त्रुटी काढून रेकॉर्ड सुधारणं गरजेचं होतं.



तेव्हा सरदार सरोवर धरणामुळे प्रत्यक्ष बाधित होत असलेल्या परंतु शासनाच्या यादीत अस्तित्व नसलेल्या या लोकांचे पुरावे गोळा करून त्यांना घोषित करवून त्यांना पुनर्वसनाचे हक्क प्राप्त करून देण्यात चेतनचा प्रत्यक्ष सहभाग राहिला आहे. पुनर्वसनाचे लाभ मिळवून देताना 'जमिनीच्या बदल्यात जमीन' हे धोरण ठेवून ती जमीन घेण्यालायक आहे की नाही यासाठी जिल्हा स्तरावर 'जमीन पाहणी पसंती खरेदी समिती'चे अशासकीय सदस्य म्हणून एकत्र काम करत असताना चेतनच्या ग्रामीण भागाचा अनुभव नेहमीच कामी आलाय. २००८ साली जमिनीच्या खरेदीप्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार शोधून काढल्यावर आम्हाला अनेक प्रकारची आमिषं दाखवण्यात आली. प्रकरण काढू आणि वाढू नये म्हणून दबाव निर्माण करण्यात आला. परंतु आम्ही त्याला बळी न पडता जेव्हा सत्य शोधून काढलं, तेव्हा तत्कालीन जिल्हाधिकारी सौरभ राव यांना कायदेशीर पद्धतीने योग्य ती कार्यवाही करावीच लागली. त्याचे परिणाम म्हणून चार दोषी अधिकाऱ्यांचं निलंबन व प्रत्येकी १८ लाख रुपये दंड अशी कार्यवाही झाली. त्या वेळी घेतलेल्या परखड भूमिकेमुळे जमीनखरेदीच्या पुढील प्रक्रियेत भ्रष्टाचाराला आळा बसला. परंतु याचे परिणाम म्हणून नवीन खरेद्याही बंद झाल्या. कोणालाही कशात अडकायचं नाही म्हणून पुनर्वसनासाठी जमीन उपलब्ध असतानाही खरेदीप्रक्रिया बंद झाल्याचं भासवलं जाऊ लागलं. या सगळ्यात नव्याने मार्ग काढत प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संपर्क साधत, त्यांनाही त्यांच्या अधिकाराबाबत जागृत करत जमिनी उपलब्ध करून देण्यात चेतनचं मोठं योगदान राहिलेलं आहे.

पुनर्वसनाच्या या लढाईबरोबरच आदिवासी क्षेत्रातले रेशन, रोजगार, आरोग्य, शिक्षण, वन अधिकार हे ऐरणीवरचे प्रश्न होतेच. यातही सातत्याने लोकांकडून येणारे मुद्दे आणि ते सोडवण्याची त्याची धडपड राहिली आहे.

नर्मदा आंदोलनाच्या नवनिर्माणाच्या कामाचा महत्त्वाचा भाग राहिल्या त्या जीवनशाळा. जिल्हा परिषदेच्या शाळा केवळ कागदोपत्री भरत असताना व नर्मदेकाठच्या गावांत शिक्षणाचं काहीच साधन उपलब्ध नसल्याने आंदोलनाला जीवनशाळा सुरू कराव्या लागल्या. निमगव्हाण व मणीबेली या दोन गावांत लोकांच्या आग्रहास्तव व गरजेपोटी शाळा सुरू झाल्या. नंतर इतर गावांतूनही शाळा सुरू करण्याची मागणी येऊ लागली. नर्मदेकाठच्या डनेल या गावातही शाळा सुरू करण्यासाठी चेतनने पुढाकार घेतला. गावामधे या संदर्भात बैठक घेऊन लोकांचा सहभाग कसा असावा यावर चर्चा करत अवघ्या ८ दिवसांत १०० टक्के लोकांच्या सहभागाने व श्रमदानाने एकही रुपया खर्च न करता ही शाळा उभी केलेली आहे. शाळेचा डोलारा उभा केला, पण छत नाही, मग कसं करायचं? तर शासनाने बनवलेल्या मदत केंद्रांच्या (ज्यांत लोकांना मदत कमी व पर्यटन जास्त) शेडचे पत्रे वापरायचे का अशी चर्चा झाली. पत्र्याचे शेड्स म्हणजे केवळ मदतीच्या नावाने बनवलेले हे इमले असेही काही कामाचे नाहीत म्हणून व संकट आलं तर गुरंढोरंही त्यात मावणार नाहीत. तेव्हा त्यावरचे पत्रे काढून शाळेवर चढवायचे ठरवलं. शाळा बांधली खरी, पण शाळेत मास्तर म्हणून शिकवायला यायला कोणी उपलब्ध होईना. तेव्हा ६ डिसेंबर १९९९ रोजी चेतनने स्वत: ही धुरा हाती घेऊन दोन महिने या मुलांना शाळेत राहून शिकवलं. ही शाळा चालवण्यासाठी गावातून शिधा गोळा करण्यात आला. घरी जायची ओढ लागलेली काही मुलं रात्री जंगलात पळून जायची. त्यांना शोधायला जाऊन परत शाळेत घेऊन येणं या कसरतीही केल्या. शिक्षकाचा शोध घेण्यासाठी गावोगावी तपास केल्यानंतर

जेव्हा एक १२वी पास झालेला युवक मिळाला तेव्हा त्याच्यावर शाळेचा भार सोपवून शाळेचं काम चालू ठेवलं. आजही त्या पहिल्या बॅचची मुलं चेतनला 'गुरुजी' म्हणूनच ओळखतात. त्यांतील कोणी पोलीस झाले, कोणी वन विभागात अधिकारी झाले. पुढे या जीवनशाळा एक एक करत आता ९ झाल्या आहेत. आजही शाळांना धावत्या भेटी देणं, शिक्षकांचे प्रश्न सोडवणं यासाठी धडगावला चेतन नेहमी उपलब्ध असतो.

आम्ही सर्व कार्यकर्ते मुली-मुलं एकत्र काम करत असताना 'एक महिला कार्यकर्ती' म्हणून मला आवर्जून सांगावंसं वाटतं की, 'पुरुष कार्यकर्ता' म्हणून चेतनने कधीच पुरुषी इगो बाळगला नाही. आपल्या महिला सहकार्यकर्त्यांबरोबर त्याचं वागणं नेहमीच अदबीचं आणि समानतेचं राहिलेलं आहे.

रोजगार हमीच्या कामातील मोठ्या प्रमाणावर झालेले गैरव्यवहार आम्ही अनेक वेळा काढले. पौला या गावच्या लोकांच्या बेरोजगार भत्ता बुडवल्याच्या प्रकरणात एकदा चेतनला वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडं गाठून हे प्रकरण मागं घेण्यासाठी पैशाची ऑफर दिली. त्यावर त्यांना सुनवताना चेतन म्हणाला की, 'तुम्ही जिल्हा परिषद, तहसील ऑफिस, कलेक्टर ऑफिस व कुठलाही सरकारी अधिकारी / कर्मचारी यांपैकी कोणतीही एक व्यक्ती अशी शोधून आणून द्या जी सांगेल की, आम्ही पैसे देऊन एन.बी.ए. मधे सेटलमेंट केली. अशा प्रकारची सेटलमेंट आम्ही करत नाही. त्यापेक्षा तुम्ही लोकांना त्यांचे बेरोजगार भत्त्याचे पैसे देऊन टाका म्हणजे प्रश्न आपोआप मिटेल'. हा बाणा आंदोलनाच्या खऱ्या कार्यकर्त्यांचा नेहमी राहिला आहे आणि तो चेतनमध्येही होता आणि आजही आहे.

आंदोलनाच्या कामात सातत्यपूर्ण इतकी वर्षं संघर्षाचं काम करत असताना आपल्यातील कलाकारालाही त्याने जिवंत ठेवलं आहे. तो उत्तम गायक आहे आणि चळवळीसाठी त्याने गाणीही लिहिलेली आहेत. सध्या चेतनने 'व्हीडिओ वॉलंटीअरिंग'च्या माध्यमातून एक वेगळी वाट निवडत लोकांचे मुद्दे सोडवण्याचं काम चालू ठेवलेलं आहे. त्याच्या व्हीडिओंना राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

या ३५ वर्षांच्या संघर्षात १५००० विस्थापित परिवारांना जमिनीच्या बदल्यात जमीन देऊन पुनर्वसन करण्यात आलं. जीवनशाळांच्या निमित्ताने ७००० आदिवासी मुलांना शिक्षणाच्या वाटा उघडून दिल्या गेल्या. १० सहकारी संस्था स्थापन करून विस्थापितांना नर्मदेच्या जलाशयावर मासेमारीचे अधिकृत हक्क देण्यात यश आलं आहे. रोजगाराच्या, रेशनच्या, आरोग्याच्या बाबतीत लोकांमधे केलेल्या जन-जागृतीने लोक आपल्या हक्काचे मुद्दे स्वत: मांडायला सक्षम झाले आहेत. 'पूर्ण वेळचा कार्यकर्ता' म्हणून आंदोलनाच्या या सर्व कामांत चेतनचं महत्त्वाचं योगदान राहिलेलं आहे.

चेतनचं काम पाहण्यासाठी नर्मदा खोऱ्यात तुम्हाला यावं लागेल. तसं आमचं आग्रहाचं आमंत्रण आहेच.

– योगिनी खानोलकर

yoginikhanolkar2@gmail.com/9423944390

# चळवळीतली बाळं आणि चळवळीचं बाळकडू



**चेतन साळवे** यांनी
या निमित्ताने
व्हीडिओवर केलेलं भाषण

मी आधी ठरवलं होतं की, आपण लग्नच करायचं नाही. कारण मला तेव्हा सुरुवातीला फक्त १५००रुपये मानधन मिळायचं. एवढ्याशा अल्प मानधनावर संसार कसा चालवायचा हा प्रश्न होता. आमच्या बाजूला रिचर्ड अंकल राहायचे, एकटेच. ते आधी विनोबांच्या भूदान चळवळीत कार्यकर्ता म्हणून काम करायचे या भागात. त्यांचं एका मुलीवर प्रेम होतं. परंतु ती वेगळ्या जातीची असल्यामुळे त्यांचा विवाह झाला नाही आणि त्यांनी अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला. कालांतराने चळवळ बंद झाली, चळवळीतले सोबती कुठे कुठे स्थायिक झाले. रिचर्ड अंकल मात्र धडगावलाच राहिले. त्यांना मेकॅनिकचं काम येत असल्याने त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालू झाला. मिळालेल्या पैशाने जेवण व २४ तास दारूच्या नशेत अंकल जीवन जगत होते. एके दिवशी ते आजारी पडले. मी त्यांना गोळ्या आणून दिल्या व त्यांचे हात-पाय दाबून देत होतो. त्यांचा स्वत:चा परिवार राहिला असता तर ते आज म्हातारपणी असे एकटे पडले नसते. तेव्हा विचार आला की, कालांतराने नर्मदा आंदोलनही बंद होईल, आपल्या सोबत असलेले कार्यकर्ते त्यांच्या डिग्रीमुळे कुठेतरी कामाला लागतील. आपलं काय? कारण माझी डिग्री ही पूर्ण झाली नव्हती. मग मी निश्चय केला लग्न करण्याचा.

लग्न करायचं तर एकतर ती नोकरीवाली असावी किंवा तिची लग्नानंतर नोकरी करण्याची तयारी असली पाहिजे. तरच संसार करणं शक्य होतं. माझ्या थोरल्या बहिणीने एक मुलगी सुचवली. ती नगरपालिकेत नोकरीला देखील आहे. माझ्यापेक्षा एक वर्षाने मोठी होती. मी म्हटलं, ठीक आहे. दरवेळी मुलगाच कशाला वयाने मोठा असला पाहिजे? मी पोरगी पाहिली. मी तिला पसंत पडलो. ती मला पसंत पडली. परंतु तिच्या आई-वडिलांना कोणीतरी मनात भरवलं की, 'तुमची मुलगी तर पगार कमावते व तो मुलगा काखेत झोला घेऊन गावोगाव हिंडतो. त्याला कशाला देताय?' मग त्या मुलीच्या आई-बाबांकडून नकार मिळाला.

दुसरी मुलगी शहाद्याच्या बहिणीनेच पाहिली. मला सांगितलं, 'मुलगी आणि तेथील माणसं चांगली आहेत.' मग आरतीबरोबर विवाह करण्याचा निर्णय घेतला. आमचा साखरपुडा झाला व एका महिन्याच्या आत लग्न करण्याचा निर्णयही. त्याच वेळी इकडे दिल्लीला मोर्चा काढायचं देखील ठरलं. मी निघालो मोर्च्याला. आम्हाला वाटलं होतं की, दिल्लीहून तीन-चार दिवसांत परत येऊ. दादर-अमृतसर या गाडीने आम्ही दिल्लीला निघालो. चारपाचशे लोक होते सोबत महाराष्ट्राचे. त्यांना निझामुद्दीन रेल्वेस्टेशनवर उतरवत असताना एक म्हातारा उतरायचा बाकी होता. तेवढ्यात गाडी सुरू झाली. मग मी घाईत त्या म्हाताऱ्यासकट चालत्या गाडीतून उडी टाकली. या धांदलीत माझी कागदपत्रांची एक बॅग आणि माझी फोन डायरी आतच राहिली. (त्या वेळी माझ्याकडे मोबाइल नव्हता.) मेधाताईंना ही गोष्ट सांगितली. ताईंनी मला सिमप्रीत सिंगला फोन करायला सांगितलं. त्याने कुरुक्षेत्राला राहणाऱ्या त्याच्या मित्राला फोन केला. त्या मित्राने मी सांगितलेल्या डब्यातून माझी कागदांची बॅग स्टेशन मास्टरकडे जमा केली. इकडे आंदोलन जास्तच वाढत चाललं होतं. शासन ऐकायला तयार नसल्यामुळे मेधाताईसह चार जणांनी अनिश्चितकालीन उपोषण करण्याचा निर्णय घेतला. २१ दिवस उपोषण चाललं, त्या काळात चार वेळा आम्हाला पोलिसांनी उचलून नेलं. परत जागेवर येऊन जंतरमंतरला धरणं सुरू. इकडे घरच्यांना आणि मुलीकडल्यांना वाटायचं की, हा का लग्न करायचं नाही म्हणून फरार झाला. कारण माझ्याकडे फोन नाही व घरचे व सासुरवाडीचे लँडलाईन नंबर फोन डायरीत होते आणि फोन डायरी कुरुक्षेत्रला राहिली होती. ३२ दिवस आंदोलन चाललं दिल्लीत, आमच्या मागण्या मान्य झाल्यानंतर आम्ही परतलो. घरी आल्यानंतर लगेच मला पकडून माझं लग्न लावून देण्यात आलं.





लग्नानंतर आरतीने नर्सिंगचा कोर्स करायचा निर्णय घेतला. कोर्स केल्यानंतर तिला धडगावलाच एनआयएचएमअंतर्गत कंत्राटी आरोग्य सेविका म्हणून नोकरी लागली. ३० सप्टेंबर २०१०ला आम्हाला पहिला मुलगा झाला, त्याचं नाव आम्ही 'संघर्ष' ठेवलं. आरती अगदी दीड महिन्यापासून संघर्षला बसमध्ये रोज सोबत घेऊन जायची. थोडा मोठा झाल्यावर मग मी सोबत घेऊन जायचो, कधी आमच्या ऑफिसला, कधी तहसील कार्यालयात, कधी बीडीओत, तर कधी पोलीस स्टेशनला तो कायम सोबतच असायचा.जेव्हा जुन्या धडगावच्या जि.प. शाळेत पहिलीत नाव टाकलं आणि पहिल्या दिवशी आरती त्याला घ्यायला गेली तेव्हा शाळेतून बाहेर आलेला संघर्ष आईला म्हणाला, ''चल मम्मी, आमची मिटिंग संपली.'' आता संघर्ष पाचवीला आहे. परंतु दुसरा मुलगा 'सम्यक' हा आता चार वर्षांचा आहे. त्यालाही कधी आरती सोबत घेऊन जाते, तर कधी मी. कोणतेही सरकारी कार्यालय असो वा मोर्चा – सम्यक सोबत असतो.

अशाच एका मोर्चावेळी सम्यक सोबत होता, घोषणाबाजी जोरात सुरू होती, पोलीस भरपूर होते. एसपीसाहेब आले. ते म्हणाले, ''तुम्ही मोर्चाची परवानगी घेतली नाही, त्यामुळे तुम्हां सर्वांना अटक करून जेलमध्ये पाठवावं लागेल.'' मलाही सम्यक कडेवर असताना पोलीस-गाडीत बसवण्यात आलं. आम्हाला ५७ जणांना अटक करण्यात आली आणि आधी पोलीस-ठाण्यात आणण्यात आलं. पोलिसांनी आम्हाला जेलमध्ये पाठवण्याचा निर्णयच घेतला होता. दोन दिवसांनंतर आदिवासींचा प्रमुख सण असतो होळी.परंतु तरीही आम्हाला जेलमध्येच पाठवण्याचा निर्णय पोलिसांनी घेतलाच होता. रात्र होत चालली. सम्यक सोबतच होता. त्याला भूकही लागली होती. आरती धडगावला. तिला फोन करून सांगितलं की, आम्हाला अटक झाली व उद्या जेलमध्ये टाकतील. आता या गोष्टी तिला नवीन नव्हत्या, कारण याआधीही मी आंदोलनात दोन वेळा धुळे जेलमध्ये होतो. ती म्हणाली, ''सम्यकच कसं करणार?'' माझ्याही पुढे हा प्रश्न होता. मग मी माझ्या मोठ्या बहिणीला फोन केला, व तिला पोलीस स्टेशनमध्ये येऊन सम्यकला घेऊन जाण्यास सांगितलं. सुदैवाने ती आली, नाहीतर सम्यकला इतक्या लहानपणीच बालसुधारगृहात पाठवलं गेलं असतं.

चळवळीत असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मुलांना लहानपणापासूनच चळवळीचं बाळकडू मिळालेलं असतं, ते असं.

*narmada.chetan@gmail.com/9307579904*

# निवड समिती

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
  (भारतातील)

  आसाराम लोमटे (अध्यक्ष)

  रमेश इंगळे-उत्रादकर
  नीरजा
  किशोर बेडकीहाळ

  **रा. शं. दातार नाट्य पुरस्कार समिती**
  (भारतातील)

  ओंकार गोवर्धन
  चिन्मय केळकर
  मनस्विनी ल. र.

- **साहित्य पुरस्कार निवड समिती**
  (अमेरिकेतील)

  सुनील देशमुख
  विद्युल्लेखा अकलूजकर
  शोभा चित्रे

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
  (भारतातील)

  विजया चौहान (अध्यक्ष)
  मनीषा गुप्ते
  उल्का महाजन

- **समाजकार्य पुरस्कार निवड समिती**
  (अमेरिकेतील)

  सुनील देशमुख
  शिरीष गुप्ते
  शैला विद्वांस
  मनीषा केळकर
  अरुंधती विनोद
  रजनी शेंदुरे

**महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार समन्वय समिती**

मनीषा गुप्ते (मासूम)
रमेश अवस्थी (मासूम)
मुकुंद टाकसाळे
विनोद शिरसाठ (संपादक, साधना साप्ताहिक)
गोपाळ नेवे

# महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार सन्मानित व्यक्ती व संस्था

## ▪ जीवनगौरव पुरस्कार ▪

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगावकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७
शांता गोखले २०१८
वसंत आबाजी डहाके २०१९

## ▪ विशेष पुरस्कार ▪

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा : संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७
सानिया : कथा या वाङ्मयप्रकारासाठी २०१८

## ▪ प्रकाशन संस्था ▪

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

## ▪ नियतकालिके / अनियतकालिके ▪

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज, मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

## ▪ ग्रंथ पुरस्कार : ललित ▪

ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता – दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद – मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा : अनुवाद : जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता : अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३

येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत : श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही २००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर २००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय : अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा : प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन : मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट : आनंद विंगकर २०१२
निरर्थकाचे पक्षी : नीरजा २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७
उजव्या सोंडेच्या बाहुल्या : प्रवीण बांदेकर २०१८
रिंगाण : कृष्णात खोत २०१९

## ▪ ग्रंथ पुरस्कार : वैचारिक ▪

आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी : गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लीम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद : रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत : गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार : श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना : संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००

मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती : म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट : जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे : म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश : आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर २०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५

## ▪ ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक ▪

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना : अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : उर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे २००७
तमाशा : एक रांगडी गंमत : संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची : नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर २०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे २०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत्‌चित्रव्यूह : अरुण खोपकर २०१४
प्रतिमा-प्रचीती : नितीन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७
लीळा पुस्तकांच्या : नीतीन रिंढे २०१८

## ▪ रा. शं. दातार नाट्य पुरस्कार ▪

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याशा सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६

निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिंमाशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७
हंडाभर चांदण्या : दत्ता पाटील २०१९

## ■ नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार ■

### रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३
राजीव नाईक २०१८

## ■ समाजकार्य सन्मान पुरस्कारांचे मानकरी – व्यक्ती व संस्था ■

**१९९६**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  विलास वाघ, पुणे
- पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) :
  वासुदेवराव चित्रे, पालघर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  विजया चौक, धुळे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

**१९९७**

- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे
- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकविज्ञान संघटना, पुणे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  शुभदा देशमुख, गडचिरोली
- पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
  विजय नारकर, देवरूख
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  लीला पाटील, कोल्हापूर

**१९९८**

- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  जयंत गडकरी, मुंबई
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  हुमायून अब्दुलअली, मुंबई
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती)
  सुरेखा दळवी, पेण

**१९९९**

- प्रबोधन (संस्था) :
  समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी

- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रेहाना बैलिम, अमरावती
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  कुसुम कर्णिक, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  भरत कावळे, नाशिक

**२०००**
- स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
  महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मनोहर कदम, मुंबई
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (व्यक्ती) :
  चिं. धों. आसवले, पुणे
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  संजय संगवई, पुणे.

**२००१**
- पर्यावरण-संतुलन/संरक्षण (संस्था) :
  ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत
- समाजप्रबोधन (व्यक्ती) :
  मु. ब. शहा, धुळे
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  कुमुद पावडे, नागपूर
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  काळुराम दोधडे, पालघर
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

**२००२**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  भुरीबाई मानसिंग शेळे, नंदुरबार
- वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
  रजिया सुलताना, अमरावती
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  दत्ता इस्वलकर, मुंबई,
  डॉ. विवेक मॉंटेरो, मुंबई,
  डॉ. राम पुनियानी, मुंबई

**२००३**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना,
  कोरेगाव, सातारा
- स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
  रझिया पटेल, पुणे
  शेख वजीर पटेल, अमरावती
  सुरेश शिपूरकर, कोल्हापूर
  आनंद पटवर्धन, मुंबई
  उल्का महाजन, रोहा, रायगड

**२००४**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  समाज विज्ञान अकादमी, पुणे
  मासूम, पुणे
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  तिस्ता सेटलवाड, मुंबई
  रमेश हरळकर, मुंबई
  पोपटराव पवार, अहमदनगर
  डॉ. मोहन देशपांडे, पुणे
  विलास भोंगाडे, नागपूर

**२००५**
- समाजप्रबोधन (संस्था) :
  लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर
  श्रमिक महिला विकास संघ, वसई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  श्री. लीलाधर हेगडे, मुंबई

- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रा. यशवंत संत, पुणे
  श्री. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा
  श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार
  श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर
  श्रीमती सुषमा शर्मा, वर्धा
  सत्कार : श्री. सुरेश खोपडे, मुंबई

**२००६**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  आंबेडकर अकादमी, सातारा
  पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  पन्नालाल सुराणा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  रूपा कुळकर्णी, नागपूर
  अनंत फडके, पुणे
  वाहरू सोनवणे, नंदुरबार
  सत्कार : मनीषा वर्मा

**२००७**

- समाजप्रबोधन (संस्था) :
  हॅलो मेडिकल फाउण्डेशन, अणदूर, जि. उस्मानाबाद
  स्त्री मुक्ती संघटना, मुंबई
- समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
  प्रा. एन. डी. पाटील, सातारा
- समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
  प्रदीप प्रभू, डहाणू
  अन्वर राजन, पुणे
  राजन इंदुलकर, चिपळूण
  सत्कार : प्रकाश विश्वासराव

**२००८**

- समाजकार्य जीवनगौरव (व्यक्ती) :
  डॉ. बाबा आढाव, पुणे
- समाजप्रबोधन (व्यक्ती)
  डॉ. आनंद तेलतुंबडे
- पर्यावरण संरक्षण संवर्धन (व्यक्ती) :
  कुंजबिहारी
- परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य (व्यक्ती) :
  अर्जुन कोकाटे
  दलितांचे प्रश्न : व्यंकप्पा भोसले
  सामाजिक सलोखा : सुरेश खैरनार
- युवा कार्यकर्ता : सिम्प्रित सिंग

**२००९**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  व्यंकटअण्णा रणधीर
- समाजप्रबोधन : सुभाष वारे
- सामाजिक प्रश्न : बंड्या साने
- असंघटित कष्टकरी : श्रीनिवास कुलकर्णी
- युवा कार्यकर्ता : योगिनी खानोलकर

**२०१०**

- जीवनगौरव (व्यक्ती) :
  नागनाथअण्णा नायकवडी
- विशेष कार्य : चंद्रकांत केळकर
- समाजप्रबोधन : सत्यपाल महाराज
- असंघटित कष्टकरी : बस्तू रेगे
- सामाजिक प्रश्न : हरीष सदानी
- युवा कार्यकर्ता : नीलेश निमकर
- लक्षवेधी प्रशासकीय कार्य :
  लक्ष्मीकांत देशमुख

**२०११**

- समाजकार्य जीवनगौरव
  जी. जी. परीख
- समाजप्रबोधन : सुनीती सु. र.
- असंघटित कष्टकरी : सुभाष लोटे
- सामाजिक प्रश्न : ब्रायन लोबो

- विशेष कार्य : ज्योती म्हापसेकर
- विशेष कार्य : नीलिमा मिश्रा

**२०१२**

- समाजकार्य जीवनगौरव
  ठाकूरदास बंग
- समाजप्रबोधन : माधव बावगे
- सामाजिक प्रश्न : बाळकृष्ण रेणके
- असंघटित कष्टकरी : शिवाजी कागणीकर

**२०१३**

- समाजकार्य जीवनगौरव :
  रयत शिक्षण संस्था
- समाजप्रबोधन : गजानन खातू
- असंघटित कष्टकरी : धनाजी गुरव
- सामाजिक प्रश्न : डॉ. अशोक बेलखोडे

**२०१४**

- समाजकार्य जीवनगौरव :
  पुष्पा भावे
- समाजप्रबोधन : रमेश गावस
- सामाजिक प्रश्न : बिंदुमाधव खिरे
- असंघटित कष्टकरी : मनीषा तोकले

**२०१५**

- समाजकार्य जीवनगौरव :
  विद्या बाळ
- समाजप्रबोधन : भीम रासकर
- असंघटित कष्टकरी : पल्लवी रेणके
- सामाजिक प्रश्न : कृष्णा चांदगुडे

**२०१६**

- समाजकार्य जीवनगौरव :
  हमीद दलवाई (मरणोत्तर)
- समाजप्रबोधन : देवजी तोफा
- सामाजिक प्रश्न : विजय दिवाण
- असंघटित कष्टकरी : सुशीला नाईक

**२०१७**

- समाजकार्य जीवनगौरव :
  गंगाप्रसाद अग्रवाल
- समाजप्रबोधन : रुबिना पटेल
- असंघटित कष्टकरी : चेतना गाला-सिन्हा
- सामाजिक प्रश्न : अरुण जाधव

**२०१८**

- समाजकार्य जीवनगौरव :
  आनंदवन
- समाजप्रबोधन : हरी नरके
- असंघटित कष्टकरी : निशा शिवूरकर
- सामाजिक प्रश्न : मतीन भोसले

## डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार

विवेक सावंत / २०१३
निखिल वागळे / २०१४
उत्तम कांबळे / २०१५
अतुल पेठे / २०१६
अरविंद गुप्ता / २०१७
तर्कशील सोसायटी पंजाब / २०१८
केरळ शास्त्र साहित्य परिषद / २०१९

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)

# पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो. अशाच प्रकारे एक वाङ्मयप्रकार पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारांसाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : ललित साहित्याच्या संदर्भात...**

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे,
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचं समर्थ दर्शन घडवलं गेलं आहे,
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे,
- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचं साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचं ठरलं आहे.

**जीवनगौरव व वाङ्मयप्रकार पुरस्कार : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यकारांनी नि:स्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचं लेखन महत्त्वाचं ठरलं आहे.

**ग्रंथांसाठी पुरस्कार :**

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून ललित आणि वैचारिक वा अपारंपरिक मराठी ग्रंथांना पुरस्कार दिला जातो. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षांतील पुस्तकांचा विचार केला जातो.

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार :**

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी आशयसंपन्न नाट्यसंहिता लिहिणाऱ्या नाटककारास हा पुरस्कार देण्याची योजना आहे. दीर्घकाळ अशी नाटकं रंगभूमीवर सादर करणाऱ्या रंगकर्मीलाही हा पुरस्कार दिला जाऊ शकतो.

**समाजकार्य पुरस्कार :**

१९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचं मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन व संरक्षण तसंच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५ पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला वा संस्थेला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. त्याचबरोबर प्रबोधन, रचना व संघर्ष यांपैकी एका प्रकारचं विशेष कार्य करणाऱ्या व्यक्तींना एक पुरस्कार दिला जातो. या पुरस्कारांसाठी व्यक्तींच्या व संस्थांच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात :

१. ज्या व्यक्ती वा संस्था आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्यं रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचं कार्य करत आहेत,
२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करत आहेत,
३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे,

पुरस्काराची संख्या एखाद्या वर्षी कमी-जास्त होऊ शकते. पुरस्कार समिती (अमेरिका) यांनी तो हक्क राखून ठेवलेला आहे.

**महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रातील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.**

# ‘महाराष्ट्र फाउंडेशन’विषयी

- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचं निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभं करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली ३७ वर्षं करत आहे. आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचं पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचं साहाय्य ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ या संस्थेद्वारे होत असतं.

- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केलं आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावं दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड इथे ‘एड्स चिकित्सा प्रयोगशाळा’ स्थापन केली आहे. ‘पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन’साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचं, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचं साहाय्य केलं आहे.

- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने स्त्रियांचं सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

- ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ने ‘भारत-वैद्य’ (अनवाणी डॉक्टर) व ‘मैत्रीण’ हे दोन नवे प्रकल्पही हाती घेतले. तर ‘समाजपरिवर्तनासाठी माहिती-तंत्रज्ञान’ हा ‘फाउंडेशन’चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. ‘एक गाव - एक संगणक’ हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

- अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ पुढील प्रकल्प हाती घेत आहे :

  १) मानवी अपव्यापाराचं नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्या व्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४० टक्के प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचं आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणं व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली / स्त्रियांचं पुनर्वसन करणं या हेतूने हा प्रकल्प योजला आहे.

  २) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या ‘ग्रामीण विकास लोकसंस्था’च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही सुरू केला आहे.

३) निराधार महिला पुनर्वसन / ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसमवेत राहून त्यांना साथ देणं व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणं यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

- 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या समाजपरिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने १९९६ साली समाजकार्य पुरस्कार योजना सुरू केली.
- समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचं हे ऋण अल्पाशांने फेडावं, या भावनेने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने १९९४ साली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना'सुरू केली आहे.
- विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउंडेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future of those with no future... So they can reinvest हे 'महाराष्ट्र फाउंडेशन'चं घोषवाक्य आहे.